
सोलापूर तरुण भारत
आसमंत



अर्थापासून भावनाचक्रापर्यंत प्रत्येक क्षेत्राला गती देणारा पाऊसकाळ सुरू होणे आणि त्यातही आषाढातील त्याचे वैभव अनुभवायला मिळणे ही एक वार्षिक पर्वणीच म्हणायला हवी. पावसाळा चार महिने असला तरी जम बसवेपर्यंतच पहिला महिना सरतो. श्रावणातला पाऊस नावासारखाच नाचरा असतो तर भाद्रपदात त्याला परतण्याचे वेध लागलेले असतात. त्यामुळेच त्याचे खरे आणि गहिरे रूप आषाढातच अनुभवायला मिळते.

# सजला आषाढ सोहळा

**प्रासंगिक** **स्वाती पेशवे**

यंदा अतितीव्र झळांनी भाजून काढणारा उन्हाळा अनुभवत असतानाच गत वर्षी प्रमाणे लवकर मान्सून सर्वांना सुखावेल असे वाटत होते. मात्र, आषाढ सुरू होईपर्यंत पावसाने म्हणावी तसी हजेरी लावलेली दिसत नाही. आषाढ सुरू झाला तसा पावसाने कुठे कुठे बरसायला सुरूवात केली. त्यातच यंदाचा मान्सून सरासरीइतका नसणार या भाकीतानेही अनेकांच्या मनात धडकी भरवली आहे. असे असले तरी आता पावसाची झड असणारा आषाढ सुरू झाला आहे. त्यामुळेच हा ओलाकंच महिना उत्तम पावसाचा असेल, अशी आशा करायला हरकत नाही. भरगच्च हिरवेपणा, संततधार, पाय पडला तर घसरण्याची भीती वाटावे इतक्या प्रमाणात साठलेले शेवाळे, चार-चार दिवस सुकवले तरी ओलसर राहणारे कपडे, साचलेपणाचा तो समृद्ध सुवास हीच तर आषाढाची खरी ओळख आहे. आषाढात पाऊस लयदार तरीही बेफाम असतो. त्या कोसळधारांमध्ये सातत्य असते. त्याचे आगळे देखणेपण असतो. सूर्यकिरणांची वाट अडवण्याची, आसमंतावर ओलेती झिलाई निर्माण करण्याचे, जमिनीतील रिते जलकुंभ काठोकाठ भरवून टाकण्याचे, प्रवाहमार्ग प्रवाहित करण्याचे, धबधब्यांना अनिवार ओढीने दरीत उडी घेण्यास भाग पाडण्याचे कसब आणि ताकद त्याच्यामध्ये आहे. म्हणूनच आषाढातला पाऊस दमदार भासतो. त्याचा आवेग अनुभवण्याजोगा असतो. उडत्या पक्ष्यांना आणि हुंदडणाऱ्या पशूंनाही चिडीचूप होत आडोसा शोधायला लावण्याचे सामर्थ्य त्याच्या दिमाखदार कोसळण्यात असते. तीदेखील निमूट त्याचा आदेश पाळतात आणि आधीच बांधून ठेवलेल्या घरट्यांमध्ये वा शोधलेल्या आडोशामध्ये आसरा घेत बाहेरचे जलसुक्त शांतपणे ऐकत राहतात. खरे सांगायचे तर आषाढातल्या अतिवृष्टीत वेडे धाडस करणाऱ्या अतिउत्साही पर्यटकांनी त्यांच्यापासून तरी धडा घेणे गरजेचे आहे.

एकंदरच हा ओलाचिंब महिना येणाऱ्या समृद्धीची पेरणी करणारा असतो. शेतशिवारात पेरलेलं बी-बियाणं रुजण्यासाठी आभाळीच्या जलधारांचं सिंचन कामी येत असतं. या काळ्या आईच्या अंगावरील मुरमाड भेगाळलेपण कमी होत असल्याने जीव भांड्यात पडलेला असतो. बहरू पाहणाऱ्या या ऋतुपर्वात भक्तीला धुमारे फुटले नाहीत तरच नवल! दुसरीकडे याचीही सज्जता सुरू असते. गावोगावीचे वारकरी भागवत धर्माची पताका नाचवत आनंदाने पंढरीच्या वाटेवर चालत असतात. असंख्य भक्तगणांनी उच्चारवात केलेला हा विठूचा जागर आपल्याही मनात घुमत असतो. एक प्रकारे ही सणांच्या आगमनाची सज्जताच असते. दरवर्षी याच भारलेपणाने आषाढ साजरा होतो. पावसाच्या एका सरीमध्ये आधीच्या सगळ्या व्यथा-वेदना विसरायला लावण्याचं सामर्थ्य असतं हे आपण अनुभवलेलं आहे. म्हणूनच ग्रीष्मातल्या तलखीवर पावसाची हळुवार फुंकर पडताच आपण सगळे कष्ट विसरतो. एका अर्थाने पाहता दु:स्वप्न न उगाळण्याची ऊर्मी आपल्याला आषाढाच्या स्वागतासाठी सिद्ध करते. मग या आनंदापोटीच कुठे सामिष भोजनाचे बेत रंगू लागतात. येणाऱ्या चातुर्मासात या आनंदाला मुकावं लागणार, या जाणिवेने बेचैन झालेले लोक आषाढात मनसोक्त 'खाण्या-पिण्या'ची चैन भागवून येतात. पाहुणे-राऊळे बोलावून जेवणाचे कार्यक्रम पार पडतात. घरात खमंग आषाढ तळला जातो. बाहेरच्या चिंब वातावरणात भजी, तळण अथवा आषाढात तळले जाणारे खास गोड पदार्थ लज्जत वाढवतात. ऋतू कूस पालटताना घरोघरी साजरे होणारे हे मनभावन सोहळे... नेहमीप्रमाणे ते यंदाही साजरे होतील. तोच उत्साह आणि आनंद झरझर बरसताना दिसेल. पण आता आपल्या विचारांची आणि कृतीची व्याप्ती थोडी वाढवायला हवी. 'भोगातून योगाकडे' या उक्तीप्रमाणे आषाढात मनसोक्त खात-पीत असतानाच बरसणार्या या जलधारा संचित करण्याचे उपाय शोधायला हवेत. पाऊस बरसत असताना पाण्याचा प्रत्येक थेंब साठवण्याचा संकल्प करून प्रत्येकाने आषाढ साजरा करायला हवा. माणूस मुळात उत्सवप्रिय आहे. त्याला निसर्गाची साथ लाभली तर आनंदाचं भरतं आल्याशिवाय राहात नाही. एवढी प्रचंड लोकशक्ती एका सुरात आनंदगीत गाताना बघणं हा अवर्णनीय आनंद आहे, यात शंका नाही. पण बदलत्या परिस्थितीत व्यक्तिगत सुखाला मागे सारून सामूहिक सुख-समाधानावर लक्ष केंद्रित करायला हवं.

भीषण दुष्काळाच्या पृष्ठभूमीवर पुढे अशा विनाशवेळा टाळता याव्यात, यासाठी अनेक ठिकाणी जलयुक्त शिवारांचे कार्यक्रम राबवणे गरजेचे आहे. तसेच पाणी जपून वापरण्याचे उपक्रम हाती घेतले पाहिजेत. वृक्षारोपणाचे कार्यक्रम ही साजरे व्हायला हवेत. या उपक्रमात सहभागी होऊन आपली जबाबदारी उचलण्याचे, न पेक्षा या योजना जाणून घेण्याचे हेच दिवस आहेत. या कार्यक्रम आणि उपक्रमांपासून धडा घेत आपण आपल्या परिसरात, गृहसंकुलामध्ये त्यातील काही फायदेशीर उपक्रमांची अंमलबजावणी करू शकतो. सगळीकडे दुष्काळाचा प्रकोप अनुभवायला मिळत असतो. काही द्रष्ट्या लोकांनी राहत्या घरात पावसाचे पाणी साठवणारा एक हौद बांधला आणि दोन पावसातच त्यांना पुढचे २४ महिने पुरेल इतकं पाणी मिळाल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. वर्षाविहाराचे कार्यक्रम आखताना एखाद वेळी अशा स्वागतार्ह उपक्रमांचा मागोवा घेणंही उपकारक ठरेल.

(पान ४ वर)





# पालख्या निघाल्या...

**यंदा आषाढी एकादशी २५ जुलै रोजी आहे. आपल्या लाडक्या विठ्ठलाच्या दर्शनाच्या ओढीने लाखो वारकरी विविध पालख्यांसोबत पंढरीच्या दिशेने निघाले आहेत. राज्यातील प्रमुख दहा मानाच्या पालख्या पंढरपूरकडे निघाल्या आहेत. ८ जुलै रोजी संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आळंदीतून निघाली. मात्र पावसामुळे अनेक वारकर्यांना आळंदीत प्रस्थानावेळी पोहचता आले नाही. पंढरीचे आमंत्रण असल्यासारख्या ओढीने मोठा समुदाय या सोहळ्यात सहभागी होतो आणि एकजीवाने, एकदिलाने, पांडुरंग भेटीच्या ओढीने अभंग- ओव्यांच्या साथीत वाट कापू लागतो. या सर्व पालख्या सोलापूर जिल्हयात १६ ते २० जुलै दरम्यान पोहचणार आहेत. देवाच्या प्रत्यक्ष दर्शनाबरोबरच त्याच्या भक्तांचा हा पंढरीच्या वाटेवरचा सागरही मन मोहवून टाकतो.**

**निमीत्त** **पंकजा देव**

पंढरीचा पांडुरंग हा अनेक भक्तांच्या जीवनाशी जोडलेला देव. जणू देहाचाच एक भाग असल्यासारखा... अभंग! केवळ राज्यातीलच नव्हे तर देश आणि परदेशातील अनेक जीवांच्या आवडी त्याच्या सावळ्या रूपामध्ये गुंतून गेलेल्या... विठ्ठलच त्यांचा सखा आणि विठ्ठलच त्यांची माता...! असे एकरूपत्व फार कमी वेळा, खूप कमी ठिकाणी पाहायला मिळते.

या विठूची अनेकांवर अशी काही मोहिनी आहे की, केवळ कळसाच्या दर्शनमात्रेही गात्रांमध्ये अनुपम ऊर्जा साकारल्याचा भास होतो. ती मनोरम मूर्ती बघताच भावनातिरेक, अंतरीचा उमाळा, पराकोटीची श्रद्धा, अफाट विश्वास आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे एकत्वाचा, अजोडतेचा भाव या सगळ्यांच्या एकत्रित संगमाने जणू शरीराचाच गाभारा होऊन जातो आणि देवाच्या गाभार्यातली ती मूर्ती पंचप्राणांमध्ये प्रवेश करते. त्या मंगल चरणांचा स्पर्श अंगामध्ये जणू चैतन्याचे मळे फुलवून जातो. देवाचे ते देखणे रूप भक्ताचे भान हरपवून टाकते. अवघ्या क्षणभराची ती भेट, पण त्याचा प्रभाव पुढचे अनेक दिवस राहतो. जगण्यासाठी मूलभूत गरजांच्या पूर्तीची आवश्यकता असावी तशीच विठ्ठलनामात गुंतलेल्या, रमणाऱ्या भाविकांना श्वास घेण्यासाठी त्याच्या दर्शनाखेरीज तरणोपाय नसतो. अशी आगळी जवळीक, स्नेह आहे, इतके मर्मज्ञ ऋणानुबंध आहेत, म्हणूनच पिढ्यांपिढ्या भाविक पांडुरंगाच्या दर्शनासाठी मजल-दरमजल प्रवास करत येत असतात.

संतश्रेष्ठी, विद्वानांपासून सर्वसामान्य व्यक्तींपर्यंत सर्वजण या परमात्म्याच्या चरणांपाशी एक होऊन जातात. दरवर्षी पंढरीच्या दरबारी भक्तभेटीचा हा देखणा सोहळा रंगत असतो. या दिवसांमध्ये एकीकडे तप्त उन्हाने धरणीमाता तापलेली असते. तिला भेटून आणि भिजवून पाऊस हवेत गारवा निर्माण करू लागलेला असतो. त्यातून अनेकांची मने प्रसन्न होतात. अशा वातावरणात संपूर्ण भारतातून भाविक पंढरीनाथाच्या दर्शनासाठी येतात. या सगळ्यांनाच वेध असतात ते पंढरीच्या वारीचे. पंढरपूरची पायी वारी म्हणजे नामयज्ञ. त्यायोगे सहज- सुलभपणे, समता आणि बंधुता टिकवून एकत्रितपणे कापला जाणारा १८ ते २० दिवसांचा कालावधी म्हणजे विठ्ठलभेटीला निघालेला संकीर्तन सोहळाच! या सार्यांचे आराध्यदैवत, लोकदेवता असणाऱ्या पांडुरंगाचे यथार्थ वर्णन विविध संतांनी केले आहे. दरवर्षी आषाढी एकादशीसाठी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउली आणि जगद्गुरू संत तुकाराम यांच्यासह अनेक संतांच्या पालख्या लाखो भक्तांसमवेत पंढरपूरकडे मार्गस्थ होतात. हा सारा प्रवास उत्साहवर्धक, आनंददायी आणि डोळ्यात साठवून ठेवणारा ठरतो.

(पान ४ वर)

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंडोनेशिया दौऱ्यामुळे भारत-इंडोनेशिया संबंधांना नवे सामरिक परिमाण लाभले आहे. 'ब्रह्मोस' आणि 'अस्त्र' क्षेपणास्त्रांवरील संरक्षण सहकार्य, सागरी सुरक्षेतील समन्वय आणि इंडो-पॅसिफिकमधील वाढती भागीदारी यामुळे या संबंधांचे महत्त्व द्विपक्षीय चौकटीपलीकडे जाऊन आशियातील बदलत्या सत्ता-संतुलनाशी जोडले गेले आहे.........................................................**

# इंडो-पॅसिफिकमध्ये भारताचे ब्रह्मास्त्र

**लक्ष्यवेध** **प्रतिनिधी**

भारत आणि इंडोनेशिया या दोन देशांना जोडणारा धागा हा आधुनिक राजकारणाचा नसून, हजारो वर्षांच्या सांस्कृतिक देवाणघेवाणीचा आहे. आज या ऐतिहासिक नात्याला संरक्षण, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था आणि सागरी सुरक्षेची नवी दिशा मिळालेली दिसते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा इंडोनेशिया दौरा या बदलत्या समीकरणांचा महत्त्वपूर्ण टप्पा ठरावा. कारण, बदलत्या जागतिक व्यवस्थेत भारत इंडो-पॅसिफिक प्रदेशातील आपल्या भूमिकेला नव्याने आकार देत आहे. या प्रक्रियेत इंडोनेशियाचे स्थान अनन्यसाधारण असेच. हिंदी महासागर आणि प्रशांत महासागर यांना जोडणाऱ्या सागरी मार्गांच्या मध्यभागी वसलेला हा देश व्यापार, ऊर्जासुरक्षा आणि समुद्री वाहतुकीच्या दृष्टीने जगातील सर्वात महत्त्वाच्या भौगोलिक स्थानांपैकी एक मानला जातो. पण, मोदींच्या इंडोनेशिया दौऱ्याचे फलित म्हणजे ब्रह्मोस सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्र आणि अस्त्र या क्षेपणास्त्रांबाबतचे झालेले संरक्षण सहकार्य. ब्रह्मोसची वैशिष्ट्ये त्याला जगातील सर्वाधिक प्रभावी सुपरसॉनिक क्षेपणास्त्रांपैकी एक बनवतात.

ध्वनीच्या जवळपास तीनपट वेगाने लक्ष्याचा अचूक वेध घेण्याची क्षमता, विविध प्रक्षेपण मंचांवरून वापरता येण्याची लवचीकता आणि समुद्री, तसेच भूपृष्ठावरील लक्ष्यांवर अचूक प्रहार करण्याची क्षमता, यामुळे अनेक देशांचे या प्रणालीकडे लक्ष वेधले गेले आहे. अस्त्रने भारतीय हवाई दलाच्या स्वदेशी क्षमतांना नवे बळ दिले आहे. त्यामुळे हा करार भारताच्या संरक्षण कूटनीतीच्याही दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. या संपूर्ण समीकरणात इंडोनेशियाचे भू-राजकीय स्थान विशेष लक्ष वेधून घेते.

मलाक्का सामुद्रधुनी ही जगातील सर्वाधिक वर्दळीच्या समुद्रीमार्गांपैकी एक. पूर्व आशिया, मध्य-पूर्व आणि युरोप यांना जोडणाऱ्या जागतिक व्यापारातील मोठा हिस्सा या मार्गातून प्रवास करतो. चीनच्या ऊर्जा आयातीचा आणि निर्यात व्यापाराचा मोठा भागही याच मार्गावर अवलंबून. त्यामुळे मलाक्का सामुद्रधुनीचे सामरिक महत्त्व थेट जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडलेले आहे. चीनने अनेक वर्षांपूर्वी व्यक्त केलेले 'मलाक्का डायलेमा' हे या वास्तवाचेच प्रतिबिंब. कोणत्याही संभाव्य संघर्षाच्या परिस्थितीत या समुद्रीमार्गाची सुरक्षितता चीनसाठी निर्णायक ठरू शकते. म्हणूनच, भारत आणि इंडोनेशियाचे हितसंबंध एकमेकांना पूरक असे ठरतात. भारताकडे अंदमान-निकोबार द्वीपसमूहाच्या रूपाने हिंदी महासागरातील सामरिक उपस्थिती आहे; तर इंडोनेशियाकडे मलाक्का सामुद्रधुनीच्या प्रवेशद्वारालगतचे महत्त्वाचे भौगोलिक स्थान आहे.



या दोन देशांतील सागरी सहकार्यामुळे इंडो-पॅसिफिक प्रदेशात नियमाधारित व्यवस्था अधिक बळकट होण्यास मदत होऊ शकते. या भागीदारीचा उद्देश मुक्त, सुरक्षित आणि सर्वसमावेशक सागरी वाहतूक सुनिश्चित करणे हा आहे, हेही समजून घ्यायला हवे. एकूणच इंडो-पॅसिफिकमध्ये चीनच्या वाढत्या सक्रियतेमुळे या भागीदारीचे महत्त्व अधिक वाढते. गेल्या काही वर्षांत चीनने दक्षिण चीन समुद्रात कृत्रिम बेटे उभारणे, लष्करी तळ विकसित करणे आणि समुद्री सीमांवर आक्रमक दावे करणे, या माध्यमातून आपला प्रभाव वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर स्ट्रिंग ऑफ पर्ल्स या धोरणाअंतर्गत हिंदी महासागर परिसरातील विविध बंदरांमध्ये गुंतवणूक करून दीर्घकालीन सामरिक उपस्थिती निर्माण करण्याचाही प्रयत्न सुरू आहेत. असे असतानाही, भारताने संघर्षाचा मार्ग स्वीकारलेला नाही. त्याउलट, विश्वासार्ह भागीदारी, सागरी सहकार्य आणि संरक्षण क्षमतांच्या बळकटीकरणातून संतुलन निर्माण करण्याचा मार्ग स्वीकारला आहे. इंडोनेशियाशी वाढणारे संबंध हे त्याच व्यापक धोरणाचा भाग आहेत.तसेच भारताच्या 'ॲट ईस्टफ' धोरणाला आता अधिक व्यापक इंडो-पॅसिफिक दृष्टी लाभली आहे. 'आसियान' देशांशी संबंध दृढ करणे, सागरीसुरक्षा वाढविणे, पुरवठा साखळी अधिक लवचीक बनविणे, 'ब्ल्यू इकोनॉमी'चा विकास आणि तंत्रज्ञानाधारित सहकार्य वाढविणे ही या धोरणाची प्रमुख उद्दिष्टे. या सर्वच क्षेत्रांमध्ये इंडोनेशिया हा भारताचा नैसर्गिक भागीदार ठरतो.

इंडोनेशिया ही आसियानमधील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असून, निकेलसारख्या महत्त्वपूर्ण खनिज संसाधनांमध्ये तिचे जागतिक स्थान महत्त्वाचे आहे. इलेट्रिक वाहन उद्योग, बॅटरी उत्पादन, हरितऊर्जा आणि महत्त्वपूर्ण खनिजांच्या पुरवठा साखळीत भारत आणि इंडोनेशिया एकमेकांचे पूरक भागीदार ठरू शकतात. जागतिक उत्पादन व्यवस्थेचे पुनर्संतुलन सुरू असताना आणि पुरवठा साखळ्यांचे विविधीकरण हे अनेक देशांचे धोरणात्मक उद्दिष्ट बनले असताना, या सहकार्याला नवे आर्थिक महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे संरक्षण, व्यापार, ऊर्जा आणि तंत्रज्ञान यांची सांगड घालणारे हे संबंध आगामी दशकात अधिक व्यापक स्वरूप धारण करू शकतात.

या दौऱ्यातील आणखी एक उल्लेखनीय घटना म्हणजे इंडोनेशियाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बहाल केलेला सर्वोच्च नागरी सन्मान. अशाप्रकारचे सन्मान हे संबंधित देशाच्या जागतिक भूमिकेची आणि द्विपक्षीय संबंधांच्या दर्जाची घेण्यात आलेली नोंद असते. गेल्या काही वर्षांत विविध देशांनी भारतीय पंतप्रधानांना दिलेले सर्वोच्च नागरी सन्मान हे भारताच्या वाढत्या आंतरराष्ट्रीय प्रभावाचे द्योतक मानले जातात. भारत आणि इंडोनेशिया या दोन्ही देशांमध्ये लोकशाही व्यवस्था, बहुविध समाजरचना आणि सागरी अर्थव्यवस्थेचे महत्त्व ही अनेक समान वैशिष्ट्ये आहेत. दोन्ही देश दहशतवादाविरोधात सहकार्याचे समर्थन करतात,

(पान ४ वर)

# प्रतिरोधाचे पुनर्लेखन




राष्ट्ररक्षा हेमंत महाजन (नि.) ब्रि.

**सामरिक धोरणांमध्ये स्थैर्य महत्त्वाचेच; परंतु स्थिरता आणि जडत्व यात सूक्ष्म फरक असतो. बदलत्या भू- राजकीय वास्तवाकडे डोळेझाक करणारे धोरण कितीही उदात्त असले, तरी ते सुरक्षिततेची हमी ठरत नाही. भारताने दीर्घकाळ 'नो फर्स्ट यूज' या तत्त्वाशी बांधिलकी दाखवली. मात्र, शेजारी देशांची बदलती भूमिका, तंत्रज्ञानात झपाट्याने होणारी प्रगती यामुळे भारताने त्याच्या 'आण्विक' धोरणात पुढचे पाऊल टाकले आहे. 'सिप्री'च्या निरीक्षणांतून समोर आलेल्या भारताच्या बदलत्या धोरणांचा आढावा घेणारा लेख...**

भारताकडील अण्वस्त्रे आता केवळ प्रतिरोधासाठी साठवलेली शस्त्रे राहिली नसून, प्रथमच भारताने अण्वस्त्रांचा काही भाग सक्रिय सज्जतेच्या अवस्थेत ठेवला आहे. यामुळे पाकिस्तान, चीन किंवा इतर कोणत्याही शत्रूविरुद्ध गरज पडल्यास, भारत तत्काळ अणु प्रत्युत्तर देण्यास सक्षम झाला. अलीकडेच 'स्टॉक होम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूट' अर्थात, 'सिप्री' या प्रतिष्ठित संस्थेने जागतिक अण्वस्त्रांबाबतचा त्यांचा वार्षिक अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालानुसार, भारताकडे सुमारे १९० अणू 'वॉरहेड्स' आहेत. त्यांपैकी किमान १२ 'वॉरहेड्स' पूर्णपणे सज्ज असून, भारताने ते तैनात स्थितीत ठेवले आहेत. भारताच्या अणू इतिहासात अण्वस्त्रे सक्रिय अवस्थेत ठेवण्याची ही पहिलीच वेळ आहे.

'सिप्री' ही जगातील सर्वाधिक विश्वासार्ह आणि स्वायत्त संशोधन संस्था मानली जाते. आंतरराष्ट्रीय सुरक्षा, संरक्षण खर्च, शस्त्रास्त्र व्यापार आणि अण्वस्त्र नियंत्रणाबाबतचे या संस्थेचे संशोधन जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त आहे. अण्वस्त्र संपन्न राष्ट्र त्यांची खरी युद्ध सज्जता कधीही सार्वजनिक करत नसल्याने, 'सिप्री' सारख्या संस्थांचे मूल्यांकनाचे महत्त्व अधिक वाढते.

### 'सिप्री'च्या अहवालातील महत्त्वाचे निष्कर्ष

या अहवालातून काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष समोर आले आहेत. भारताचे बदललेले लष्करी धोरण आता 'आक्रमक संरक्षण' या दिशेने वाटचाल करत असल्याचे हा अहवाल नमूद करतो.

### 'नो फर्स्ट यूज'

भारताच्या अण्वस्त्रांच्या प्रथमवापर न करण्याच्या धोरणाबाबत देशात नव्याने चर्चा सुरू झाली आहे. अण्वस्त्रसज्जता हा भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा धोरणाचा सर्वाधिक महत्त्वाचा भाग झाला आहे. तसेच 'अरिहंत' वर्गातील आण्विक पाणबुड्यांमुळे भारताने विश्वासार्ह 'सेकंड स्ट्राईक कॅपेबिलिटी' ही प्राप्त केली आहे. या सर्वच घडामोडी, भारताच्या अणू धोरणाच्या परिपक्वतेचे द्योतक ठरतात.

### आक्रमक संरक्षण धोरणाकडे भारताची वाटचाल

यापूर्वी, भारताच्या अण्वस्त्रांचा उल्लेख 'साठा म्हणून केला जाई. मात्र, आता भारताने काही अण्वस्त्रे सक्रिय तैनातीमध्ये ठेवली आहेत. यामध्ये मोठाच फरक आहे. साठा म्हणून असलेल्या अण्वस्त्रांना कार्यान्वित करण्यासाठी वेळ लागतो. परंतु, सक्रिय अण्वस्त्रे काही मिनिटांतच वापरासाठी सज्ज असतात. यामुळेच भारताच्या क्षमतेची विश्वासार्हता मोठ्या प्रमाणात वाढते. सिप्री'च्या अहवालानुसार, भारतीय युद्धनौका, अणू पाणबुड्या आणि क्षेपणास्त्र प्रणालींवर काही अण्वस्त्रे सतत तैनात करण्यात आली आहेत. याचाच अर्थ असा की, भारतावर जर अणुहल्ल्याचा प्रयत्न झाल्यास, त्याला भारताकडून त्वरित आणि विध्वंसक प्रत्युत्तर दिले जाऊ शकते. अनेक तज्ज्ञांनी अनेक वर्षांपासून अशाच प्रकारच्या धोरणात्मक बदलाची भूमिका मांडली होती. पाकिस्तानसारख्या शत्रूला रोखण्यासाठी, त्याला ठोस आणि तत्काळ प्रत्युत्तराची भीती वाटणे आवश्यक आहे, असेच त्यांचे मत होते.

### जगातील प्रमुख अणुशक्ती

अमेरिका, रशिया, ब्रिटन, फ्रान्स आणि चीन हे सद्यस्थितीमध्ये जगातील मोठे अण्वस्त्रसंपन्न देश असून, अनेक दशकांपासून ते अण्वस्त्रांचा मोठा भाग सक्रिय तैनात ठेवत आहेत. भारताचे धोरणही आता त्याच दिशेने पाऊल टाकत आहे.

### वाढत्या चिनी अण्वस्त्रसज्जतेला भारताचे प्रत्युत्तर

भारतासमोरील सर्वांत मोठे दीर्घकालीन सुरक्षा आव्हान म्हणजे चीन! 'सिप्री' च्या आकडेवारीनुसार, चीनकडे सध्या सुमारे ३४ सक्रिय तैनात अण्वस्त्रे आहेत, जी भारताच्या तुलनेत जवळपास तीनपट आहेत. याशिवाय, चीन त्याच्या अण्वस्त्र क्षमतेत सातत्याने वृद्धी करत आहे. गेल्या तीन वर्षांत चिनी अण्वस्त्रांची संख्या ५०० वरून ६२० पर्यंत वाढली. याच काळात भारतानेही आपल्याकडील अण्वस्त्रांचा साठा १६४ वरून १९० पर्यंत वाढवला आहे.

चीन भारताच्या सीमेजवळच क्षेपणास्त्र तळ उभारत आहे. किंगहाई प्रांतातील 'गोलमूड तळ' हे त्याचे महत्त्वाचे उदाहरण! हा तळ भारतीय सीमेजवळ असून, येथूनच सुमारे चार हजार किमीची क्षमता असलेली 'डीएफ- २६' अणुसक्षमक्षेपणास्त्रे डागता येऊ शकतात. त्यामुळे चीनकडून अचानक हल्ला झाल्यास, भारताची सध्याची अण्वस्त्र सक्रियता त्याला त्वरित प्रत्युत्तर देण्यास सक्षमबनवते.

### सेकंड स्ट्राईक क्षमता

ही शक्ती भारताची सर्वांत मोठी ताकद आहे. अणू प्रतिरोधाचा मूलभूत सिद्धांत म्हणजे, शत्रूच्या पहिल्या अणुहल्ल्यानंतरही प्रत्युत्तर देण्याची क्षमता. यालाच 'सेकंड स्ट्राईक कॅपेबिलिटी' म्हणतात. भारताने ही क्षमता स्वदेशी अणुऊर्जेवर चालणाऱ्या पाणबुड्यांमुळे प्राप्त केली. 'आयएनएस अरिहंत' आणि 'आयएनएस अरिदमन' या पाणबुड्या भारताच्या अणू त्रिसूत्रीचा महत्त्वाचा भाग आहेत. जर शत्रूने भारताचे आण्विक तळ जरी नष्ट केले, तरी समुद्रातील पाणबुड्यांच्या मार्फत भारत विनाशकारी प्रत्युत्तर देऊ शकतो. यामुळे कोणत्याही शत्रूला भारतावर अणुहल्ला करण्यापूर्वी अनेक वेळा विचार करावा लागतो.

### पाकिस्तानचे अणू आव्हान

पाकिस्तानने अणुयुद्धाच्या धमक्या देणे, ही काही नवीन बाब नाही. भारत- पाकिस्तान तणावाच्या काळात पाकिस्तानने वारंवार अण्वस्त्रांचा उल्लेख करून दबाव निर्मितीचा प्रयत्न केला. त्यामुळे भारतासाठी अशी व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. याशिवाय, भारताच्या अणू पाणबुड्यांवरील क्षेपणास्त्रे आणि 'वॉरहेड्स' कायम वेगळे ठेवणे शक्य नसते. त्यामुळेच सज्जता नैसर्गिकरीत्या अधिक असते. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारताच्या सुरक्षा धोरणांमध्ये हा मुद्दा अधिक महत्त्वाचा ठरतो आहे.

### तुर्कीये हा नवीन धोरणात्मक घटक

अलीकडे तुर्कीये पाकिस्तानची उघड बाजू घेणारा देश म्हणून पुढे आला आहे. ऑपरेशन सिंदूर दरम्यानही पाकिस्तानने तुर्कीयेच्याच ड्रोनचा वापर भारताविरोधात केला होता. त्यामुळेच भारताने तुर्कीयेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. तुर्कीये भौगोलिकदृष्ट्या भारतापासून दूर असला, तरी भारताच्या 'अग्नी-४' आणि 'अग्नी-५' क्षेपणास्त्रांच्या मारक क्षेत्रात आहे. तरीही, पाकिस्तान- तुर्कीये संरक्षण सहकार्य भारतासाठी दीर्घकालीन चिंतेचा विषय होण्याची शक्यता आहे.

### भारताने 'नो फर्स्ट यूज' धोरणाचा पुनर्विचार करावा का?

सध्या भारतामध्ये सर्वाधिक चर्चिला जाणारा विषय म्हणजे, त्याचे 'नो फर्स्ट यूज' धोरण. या धोरणानुसार, भारत अण्वस्त्रांचा प्रथम वापर करणार नाही. मात्र, भारतावर अणुहल्ला झाल्यास, तो त्याचे विध्वंसक प्रत्युत्तर देईल. तज्ज्ञांच्या मते, बदलत्या परिस्थितीत या धोरणाचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे. जर भारतीय नेतृत्वाकडे शत्रूच्या अण्वस्त्र- हल्ल्याची खात्रीशीर माहिती असल्यास, सध्याच्या धोरणानुसार भारताला प्रथम हल्ला सहनच करावा लागेल. त्यानंतरच त्याला प्रत्युत्तर देता येईल. बदलत्या काळात या धोरणामुळे भारताला मोठ्या प्रमाणावर हानी सहन करावी लागू शकते. त्यामुळेच काही तज्ज्ञ, प्रथमवापर करण्याचा पर्याय खुला ठेवण्याचा आग्रह धरत आहेत.

### मनोहर पर्रिकर यांचे मत

२०१६ मध्ये तत्कालीन संरक्षणमंत्री मनोहर पर्रिकर यांनी 'नो फर्स्ट यूज' धोरणाच्या कठोरतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. त्यांचे मत असे होते की, भारताने स्वतःला 'नो फर्स्ट यूज' या बंधनात अडकवण्याऐवजी 'जबाबदार अणुशक्ती' म्हणून स्वतःची ओळख निर्माण करावी. त्यांचे हे मत अधिकृत धोरण नव्हते. मात्र, त्यामुळे भारताच्या अणू धोरणावर महत्त्वपूर्ण चर्चेची सुरुवात झाली.

### अण्वस्त्रांवरील वाढता जागतिक खर्च

अलीकडे अनेक देश स्वत:कडील अण्वस्त्रांचा साठा वाढवत असून, अण्वस्त्रांवरील जागतिक खर्च विक्रमी पातळीवर पोहोचला आहे.

'आय-कॅन'च्या अहवालानुसार, २०२५ मध्ये जगभरातील अण्वस्त्र खर्च ११९ अब्ज डॉलर्सवर पोहोचला. त्यामध्ये अमेरिकेने ६९.२ अब्ज डॉलर्स, चीनने १३.५ अब्ज डॉलर्स आणि भारताने सुमारे २.८ अब्ज डॉलर्स खर्च केले होते. भारताचा खर्च तुलनेने कमी असला, तरीही त्यामध्ये झालेली वाढ अण्वस्त्रांच्या आधुनिकीकरणाला दिले जाणारे महत्त्व दर्शवते. (पान ६ वर)

**दिव्यांग पालक म्हणजे अक्षम पालक नव्हेत. अपंगत्व म्हणजे पालकत्वाची क्षमता संपली असा अर्थ होत नाही. लाखो दिव्यांग पालक अत्यंत प्रेमाने, जबाबदारीने आणि जिद्दीने आपल्या मुलांचं संगोपन करीत आहेत. अनेक मुलांसाठी त्यांच्या आई-वडिलांचा संघर्ष हा प्रेरणेचा स्रोत असतो. समस्या अपंगत्वात नाही; समस्या त्या व्यक्तीभोवती उभ्या राहणाऱ्या सामाजिक आणि प्रशासकीय अडथळ्यांमध्ये आहे.**

# दुहेरी संघर्षाचं अदृश्य वास्तव

पोरकी पोरं डॉ. तुषार सावरकर



सकाळची वेळ. शाळेला जाण्याची घाई सुरू आहे; पण १०-१२ वर्षांचा मुलगा आधी आपल्या वडिलांची व्हीलचेअर व्यवस्थित करतो, औषधांची डबी हातात देतो आणि मग स्वतःची शाळेची बॅग उचलतो. एका घरात दृष्टिदोष असलेल्या आईसाठी लहान मुलगी जेवण वाढते, कागदपत्रं वाचून दाखवते आणि नंतर स्वतःच्या अभ्यासाला बसते. ही दृश्यं क्वचित घडणारी नाहीत. आपल्या आजूबाजूला अशी हजारो मुलं आहेत, जी स्वतःचं बालपण जगण्यापूर्वीच इतरांच्या आयुष्याचा आधार बनलेली आहेत.

अपंगत्वाचा प्रश्न आपण प्रामुख्याने त्या व्यक्तीपुरता मर्यादित करू पाहतो; प्रत्यक्षात त्याचे पडसाद संपूर्ण कुटुंबावर उमटत असतात. विशेषतः मुलांच्या आयुष्यावर. ही मुलं केवळ आपल्या पालकांच्या अपंगत्वासोबत जगत नाहीत तर गरिबी, सामाजिक पूर्वग्रह, अतिरिक्त जबाबदाऱ्या आणि हरवत जाणारं बालपण अशा दुहेरी-तिहेरी संघर्षांचाही सामना करीत असतात. २०११ च्या जनगणनेनुसार भारतात सुमारे २.६८ कोटी म्हणजेच २.२१ टक्के लोकसंख्या दिव्यांग आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या (एनएफएचएस) आधारे काही अभ्यासक हे प्रमाण प्रत्यक्षात ४ टक्क्यांच्या आसपास असण्याची शक्यता व्यक्त करतात. विविध अभ्यासांनुसार देशातील सुमारे ५ टक्क्यांहून अधिक कुटुंबांमध्ये किमान एक दिव्यांग सदस्य आहे. याचा अर्थ लाखो मुलांचं बालपण या वास्तवाशी निगडित आहे. मात्र या मुलांकडे स्वतंत्र गट म्हणून फारसं लक्ष दिलं जात नाही.

अपंगत्वाचा पहिला आणि सर्वात तीव्र परिणामआर्थिक पातळीवर दिसून येतो. विविध अभ्यासांनुसार १५ ते ५९ वर्षे वयोगटातील दिव्यांग व्यक्तींपैकी केवळ निम्म्या व्यक्तींनाच नियमित किंवा काही प्रमाणात रोजगार उपलब्ध होतो. अनेकांना शारीरिक मर्यादा, कौशल्य विकासाच्या संधींचा अभाव किंवा सामाजिक पूर्वग्रह यामुळे रोजगारापासून वंचित राहावं लागतं. परिणामी कुटुंबाच्या उत्पन्नावर मर्यादा येतात. याशिवाय, आरोग्यसेवा, औषधोपचार, सहायक उपकरणे, प्रवास आणि पुनर्वसन यांसाठीचा खर्चही मोठा असतो. काही आंतरराष्ट्रीय आणि भारतीय अभ्यासांमध्ये असे दिसून आले आहे की, दिव्यांग सदस्य असलेल्या कुटुंबांचे उत्पन्न तुलनेने कमी तर आरोग्यावरील खर्च अधिक असतो. त्यामुळे अशा कुटुंबांना गरिबीच्या दुष्टचक्रातून बाहेर पडणं अधिक कठीण होतं. या आर्थिक ताणाचा सर्वात मोठा परिणाममुलांच्या शिक्षणावर आणि विकासावर होतो.

कॅनेडियन रिसर्च डेटा सेंटर नेटवर्कच्या अभ्यासात एक महत्त्वाचा मुद्दा अधोरेखित करण्यात आला आहे. दिव्यांग पालकांच्या मुलांच्या शैक्षणिक मागासलेपणा मागे केवळ अपंगत्व हे कारण नसून त्यासोबत असलेली आर्थिक असुरक्षितता हे अधिक महत्त्वाचं कारण ठरतं. म्हणजेच समस्या अपंगत्वात नसून अपुरी सामाजिक सुरक्षा आण आर्थिक आधार व्यवस्थेत आहे. भारतात या विषयावर थेट आकडेवारी मर्यादित असली, तरी विविध अभ्यासांतून असे दिसून येते की, गंभीर स्वरूपाचं अपंगत्व असलेल्या पालकांच्या मुलांना शाळेत उशिरा प्रवेश मिळण्याची, वर्गात मागे पडण्याची किंवा शिक्षणात खंड पडण्याची शक्यता अधिक असते. काही मुलांना घरातील जबाबदाऱ्या सांभाळण्यासाठी शिक्षण बाजूला ठेवावं लागतं. विशेषतः ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांमध्ये ही परिस्थिती अधिक गंभीर असते, पण या मुलांचा संघर्ष केवळ आर्थिक किंवा शैक्षणिक नसतो. तो भावनिक आणि मानसिक पातळीवरही पोहोचलेला असतो.

जगभरात अशा मुलांना 'यंग केअरर्स' म्हणून ओळखलं जाऊ लागलं आहे. म्हणजे अशी मुलं जी लहान वयातच आपल्या पालकांच्या काळजीवाहूच्या भूमिकेत जातात. भारतात हा शब्द अजून फारसा परिचित नसला, तरी वास्तव मात्र सर्वत्र दिसून येतं. वयाच्या सातव्या- आठव्या वर्षापासूनच अनेक मुलं औषधं आणणं, घरकामकरणं, बँकेची कामं पाहणं, हॉस्पिटलमध्ये सोबत जाणं किंवा लहान भावंडांची काळजी घेणं अशा जबाबदार्या सांभाळत असतात. काही वेळा ही जबाबदारी प्रेमातून स्वीकारलेली असते; पण अनेकदा ती परिस्थितीमुळे आलेली अपरिहार्यता असते. अशा वेळी बालपण नकळत हरवू लागतं. विशेषतः मुलींची परिस्थिती अधिक गुंतागुंतीची असते. घरात मोठी मुलगी असेल तर तिच्यावर घरकाम, स्वयंपाक, लहान भावंडांची काळजी आणि अपंग पालकांची मदत अशा अनेक जबाबदाऱ्या येतात. त्यामुळे शिक्षणात खंड पडण्याची शक्यता वाढते. अनेक मुलींना स्वतःची स्वप्नं, आवडी किंवा करीअरच्या संधी बाजूला ठेवाव्या लागतात. या मुलांच्या मनात एक प्रकारचा अकाली प्रौढपणा नर्माण होतो. इतर मुलं खेळत असताना ही मुलं जबाबदाऱ्या सांभाळत असतात. त्यांना भावना व्यक्त करण्यासाठी वेळ किंवा जागा मिळत नाही. (पान ६ वर)

कथा सचिन चव्हाण



# पायवाट

गावाच्या टोकाला जाणारी एक जुनी पायवाट होती. लालसर मातीची, कधी हिरव्या गवताने अलगद झाकलेली तर कधी पावसाळ्यात चिखलाने घसरडी झालेली. गावाच्या सुख- दुःखाची ती मूक साक्षीदार होती. शेतावरून परतणाऱ्या शेतकऱ्यांच्या दमलेल्या पावलांचे आवाज, शाळेला जाणाऱ्या लेकरांच्या किलबिलाटाचे सूर, लग्नाच्या वऱ्हाडाची लगबग आणि अंत्ययात्रेतील शांत हुंदके सगळं तिने वर्षानुवर्षे आपल्या कुशीत जपलं होतं. त्या पायवाटेशी सर्वांत घट्ट नातं होतं गावातील गोपाळ काकांचं.

सकाळची कोवळी उन्हं पडली की, हातात काठी, डोक्यावर जुनी टोपी आणि खांद्यावर फाटकं उपरणं घेत गोपाळ काका त्या पायवाटेने शेताकडे निघत. गावातली लेकरं त्यांना पाहताच म्हणायचे,

गोपाळ का, थांबा ना! काका हसत म्हणत, 'अरे, एवढं धावताय कशाला? पाय घसरला तर? छोटा गणू म्हणाला, 'काका, तुम्ही रोज या पायवाटेनेच का जाता? मोठा डांबरी रस्ता आहे ना! गोपाळ काका थोडा वेळ शांत राहिले. त्यांनी मातीचा एक चिमूटभर कण उचलला आणि म्हणाले, गणू, ही फक्त वाट नाही रे... माझ्या आयुष्याची वही आहे. मुलं आश्चर्याने पाहतच राहिली. काका मंद हसले.

मी लहान होतो तेव्हा माझी आई माझा हात धरून याच वाटेने शाळेत न्यायची. शाळेला जायचा कंटाळा आला की मी रडायचो. आई म्हणायची गोपाळ, शिकशील तर मोठा होशील. मुलं खळखळून हसली. गोपाळ काका बोलतच होते...आणि वडिलांसोबत बैलगाडी हाकताना इथेच गाई-म्हशींच्या मागे धावत होतो.

उन्हाळ्यात माती तापलेली असायची. पाय भाजायचे. मग आई म्हणायची, 'अरे हळू चाल, जमीनही आपलीच आई आहे. त्यांच्या डोळ्यांत जुन्या आठवणी चमकू लागल्या. घरी गेल्यावर त्यांची बायको राधा म्हणायची, 'अहो, रोज एवढं चालता. थकत नाही का? काका हसून उत्तर द्यायचे, तुझ्याशी गप्पा मारत या वाटेने चाललो की थकवा कुठे राहतो?

राधा आता या जगात नव्हती. पण त्या पायवाटेवरून जाताना गोपाळ काकांना अजूनही तिचा आवाज ऐकू यायचा. काळ बदलत गेला. गावात डांबरी रस्ता आला. ट्रॅक्टर, मोटारसायकली, बस यांची वर्दळ वाढली. लोक म्हणू लागले, या जुन्या पायवाटेचा उपयोग काय आता?' एक दिवस गावचा तरुण रमेश हसत म्हणाला, काका, आता काळ बदललाय. या पायवाटेने चालून वेळ का घालवता.

गोपाळ काका शांतपणे म्हणाले, वेळ वाचतो रे, पण आठवणी कुठे मिळतात? रमेश काही बोललाच नाही. दरम्यान, गावच्या शाळेत 'जुने दिवस' या विषयावर कार्यक्रमहोता. शिक्षकांनी गोपाळ काकांना बोलावलं. शाळेच्या पटांगणात मुलं बसली होती.

मुख्याध्यापक म्हणाले, मुलांनो, आज गोपाळ काका तुम्हाला एका वाटेची गोष्ट सांगणार आहेत. काका मंचावर उभे राहिले. त्यांच्या हातातली काठी हलकीशी थरथरत होती. तुम्हाला ती जुनी पायवाट माहीत आहे ना? त्यांनी विचारलं. काही मुलं म्हणाली, हो, पण आम्ही तिकडे जात नाही. काकांच्या चेहऱ्यावर हलकंसं दुःख उमटलं. का रे? त्या वाटेवर तुमच्या आजी- आजोबांच्या आठवणी आहेत. तुमच्या आई-बाबांच्या लहानपणीची पावलं आहेत. आम्ही पावसात घसरत- हसत चाललो, उन्हात भाजलो, पण एकमेकांची साथ सोडली नाही.

क्षणभर शांतता पसरली. काका पुढे म्हणाले, मोठे रस्ते आयुष्य सोपं करतात, पण पायवाट आपल्याला माणूस राहायला शिकवते. त्या दिवशी मुलं शाळा सुटल्यावर पायवाटेकडे गेली. कुणी गवताची पाती तोडून मुकुट बनवत होतं, कुणी मातीवर पायाचे ठसे उमटवत होतं. गणू आनंदाने ओरडला, 'अरे वा! इथे किती मजा आहे! काही दिवसांनी गोपाळ काका आजारी पडले. गावकरी भेटायला येऊ लागले.

एका संध्याकाळी त्यांनी मुलांना जवळ बोलावलं. गणू, सई, रमेश आणि इतर गावकरी त्यांच्या पलंगाजवळ बसले. काका मंद आवाजात म्हणाले, मुलांनो, एक वचन द्या, पायवाट जपा. मोठे रस्ते येतील, जग बदलेल, पण मातीशी नातं तुटू देऊ नका. त्यांच्या डोळ्यांत समाधान होतं. काही दिवसांनी गावावर दुःखाचा डोंगर कोसळला. गोपाळ काका गेले. त्यांची अंत्ययात्रा याच पायवाटेने निघाली. संपूर्ण गाव शांतपणे चालत होतं.

लालसर माती जणू त्यांच्या पावलांना अखेरचं वंदन करत होती. गणू रडत म्हणाला, काका गेले, पण त्यांची पायवाट आहे ना! दरम्यानच्या काळात शाळेच्या शिक्षकांनी मुलांना घेऊन पायवाटेच्या कडेला झाडं लावली. गावकऱ्यांनी साफसफाई केली. एक सुंदर फलक उभारण्यात आला...' गोपाळ काकांची पायवाट....

वळणावरच्या नोंदी
स्वाती काळे

# यी जिंग: एक दुर्लक्षित मुसाफिर

भारतात आलेले प्राचीन चिनी प्रवासी म्हटले की, आपल्याला फाहिआन आणि युआन च्वांग हीच नावे आठवतात. या दोघांनी भारतीय मनावर जणू गारुड केले. पण यांच्याशिवाय अनेक चिनी प्रवासी भारतात मठांमध्ये येऊन गेले. इ. स. पहिल्या शतकापासून नवव्या शतकापर्यंत दोन्ही देशांमध्ये व्यापाराची मोठी उलाढाल होती. वैचारिक आणि सांस्कृतिक वर्चस्व असलेल्या भारतात अनेक चिनी प्रवाशांनी भारतीय ग्रंथांचे भाषांतर केले आणि या ग्रंथांना प्राणापलीकडे जपत चीनच्या मठांमध्ये सामान्य जनतेसाठी उपलब्ध करून दिले.


अशाच अनेक चिनी प्रवाशांपैकी एक लक्षणीय चिनी प्रवासी म्हणजे यी जिंग (इ. स. ६३५- ७१३) ज्याचा प्रवास अभ्यासकांसाठी दुर्लक्षितच राहिला. यी जिंगने इ. स. ६७१ साली भारताच्या प्रवासास सुरुवात दृष्टिकोनामुळे तो प्राचीन भारतीय इतिहासातील एक महत्त्वाचा प्रवासी ठरतो. यी जंग म्हणतो की, सहाव्या व सातव्या शतकात चिनी प्रवासी मोठ्या संख्येने भारतात पोहोचले. काही प्रवासी मध्य आशिया आणि तिबेटहून भारतात पोहोचले तर काही प्रवासी समुद्रमार्गाद्वारे आशियातील दक्षिणपूर्व बंदरांतून भारतात पोचले.

अनेकजण भारतातच मरण पावले. काहींनी भारतातच राहण्याचे ठरवले. फक्त थोडेच पुन्हा चीनमध्ये परतले. यी जिंगने लिहिलेल्या झुआनझाओ प्रवाशाच्या चरित्रात वाचायला मिळते की, भारतात बरीच वर्षे काढल्यानंतर पुन्हा चीनला परतला होता. पण तांगच्या सम्राटाने त्याला दीर्घायुष्य प्राप्त करण्याची औषधे घ्यायला पुन्हा पाठविले. भारतातून वैद्य घेऊन येण्यासही सांगितले. झाओ भारतात पोहोचला.

औषधांची सामग्री व वैद्य घेऊन तो चीनला जायला निघाला; पण वाटेतच त्याचा मृत्यू झाला. एका संघवर्मा नावाच्या भिक्षूने बोधिवृक्षाखाली सात दिवस आणि सात रात्री नंदादीप लावून आराधना केली. चीनला परत आल्यावर दक्षिण जायला पाहिजे, असे त्याच्या मनाने ठरवले. वयाच्या ३६ व्या वर्षी यीचे स्वप्न पूर्ण झाले. प्रवासाचा खर्च उचलायला काही अमीर उमराव तयार झाले. पण आशियामधील राजकीय अंदाधुंदीमुळे खुष्कीच्या मार्गाने प्रवास करणे अशक्य होते. त्यामुळे त्याने समुद्रमार्गाने आग्नेय आशियातून भारतापर्यंत प्रवास केला. हा प्रवासदेखील अत्यंत खडतर होता. त्याच्याबरोबर ३७ यात्रेकरूंनी प्रवास करण्याचे त्याला वचन दिले होते.

कॅन्टन बंदरावर जेव्हा तो आला आणि जहाजावर चढला तेव्हा इतर यात्रेकरू कुठे आहे म्हणून चोहीकडे त्याची नजर भिरभिरू लागली; जहाजावर तो एकटाच होता. इतर सर्व यात्रेकरूंनी घाबरून या प्रवासातून पळ काढला होता. जहाजावर चढल्यावर त्याने लिहिलेल्या कवितेच्या पहिल्या काही ओळींमध्येच त्याचे घायाळ मन दिसून येते.

'माझ्या या प्रवासात असंख्य अवस्था पार केल्या आहेत... दुःखांच्या तलमधाग्यांच्या जाळ्यात, माझे विचार गुरफटून गेले आहेत. का बरं माझ्या शरीराची सावली एकटीच निघाली आहे प्रवासाला?' कॅन्टन




बंदरातून यी जिंग मलाय द्वीपसमूहातल्या कोंडोर बेटावर आला. तेथून सुमात्रामधल्या 'श्रीभोग' म्हणजेच इंडोनेशियाची राजधानी असलेल्या पेलेमबान्ग बंदरात तो आला. येथे तो सहा महिने संस्कृत व्याकरण शिकला. तेथून श्रीलंकेवरून ब्रह्मदेशाच्या किनार्‍याला आणि पुढे बंगालच्या उपसागरातल्या ताम्रलिप्त बंदरात पोहोचला. तेथे वराह अवताराचे मोठे देऊळ होते. तेथेच त्याला युआन च्वांगचा शिष्य 'ता-चेंग-चेंग' भेटला. हे दोघे भिक्षू व्यापार्‍यांच्या तांड्याबरोबर नालंदाला जाण्यासाठी निघाले, पण वाटेत यीला अस्वस्थ वाटू लागले. चालताचालता तो तांड्याच्या मागे पडला आणि हीच संधी दरोडेखोरांनी साधली.

खरे तर त्याचे सर्व सामान तांड्यातल्या गाड्यांवर होते. पण दरोडेखोरांनी त्याचे अंगावरचे वस्त्रसुद्धा काढून घेतले. अंगावर झाडांच्या फांद्या बांधून तो कसाबसा नालंदाला पोहोचला. नालंदामधील इमारती बांधण्याच्या प्रक्रियेने त्याला विस्मयचकित केले. तो म्हणतो की, तेथील विटांवर नाजूक नक्षीकामकेले आहे. यासाठी विटांवर गिलावा केला जातो. वस्त्रगाळ चुनखडी, तागाचे धागे, रेशीम, माती आणि तेल घोटून मिश्रण केल्यावर भिंतीवर गिलावा करतात. कोरडे करण्यासाठी हिरव्या गवताने झाकून ठेवून गुळगुळीत दगडाने चकचकीत करतात आणि नंतर नैसर्गिक रंगाने रंगवून तेलाने पॉलिश करतात. 'यी' म्हणतो, या प्रगत प्रक्रियेमुळे भिंती आणि जमिनी आरशाप्रमाणे चमकत असतात.

केली. चीनमध्ये तो तब्बल २५ वर्षांनी पोहोचला. 'रेकॉर्ड ऑफ बुद्धिझमअँज प्रॅक्टिस्ड इन इंडिया' आणि 'मेमोयर्स ऑफ एमिनंट मॉन्क्स हु विजिटेड इंडिया' त्याची ही दोन पुस्तके म्हणजे प्राचीन संस्कृतीतील दोन रत्ने आहेत.

भारतातील प्राचीन बौद्ध धर्माची सूत्रे त्याच्या पुस्तकात अभ्यासायला मिळतातच; पण विशेष म्हणजे सहाव्या आणि सातव्या शतकात भारतात प्रवास केलेल्या ५६ चिनी भिक्षूंचे चरित्र आपल्याला वाचायला मिळते. त्याच्या ग्रंथात त्याने भारतातील मठ परंपरा आणि चीनमधल्या मठ परंपरा यांचा तुलनात्मक अभ्यास केला. कारण मूळ परंपरेशी चुकीची फारकत घेतली असल्यास त्याला ती दुरुस्त करायची होती.

भारतातील जेवणानंतर हात धुण्याच्या पद्धतीपासून त्याने बारकाईने निरीक्षण केले आहे. तो म्हणतो, 'भारतातील लोक जेवताना उजव्या हाताचा वापर करतात. आजारपण किंवा इतर कारणांनी ते जेवणात क्वचित चमचादेखील वापरतात. आम्ही भारताच्या पाचही भागात 'चॉपस्टिक'चं नाव ऐकलं नाही. धर्मग्रंथांमध्येही त्याचा उल्लेख नाही. फक्त चीनमध्ये हा प्रकार दिसतो.

'तो पुढे म्हणतो की, 'भारतीय परंपरेत 'चॉपस्टिक' या प्रकाराला मान्यता दिली नाही, पण त्याला विरोधही कोणी केला नाही. जर आपण भारतीय परंपरेत त्याचा उल्लेख नाही म्हणून त्याच्या वापरावर निर्बंध घातले तर ते उचित ठरणार नाही.' यी जींगच्या व्यावहारिक व्हिएतनाममधल्या दुष्काळात त्याच्यावर अन्न वाटप करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. हळवा असल्याने त्याच्या डोळ्यातून सतत अश्रू येत. 'रड़का बोधिसत्व' असेच त्याचे नाव पडले. अशा अनेक गमतीशीर गोष्टी 'यी' ने टिपून ठेवल्या आहेत. असे वाटते की, एवढ्या मोठ्या संख्येने चिनी प्रवासी कोणत्या आंतरिक ओढीने भारतात येत असावेत? रसातळाला गेलेल्या मूल्यव्यवस्थेमुळे तेथील चिनी समाजाला बौद्ध तत्त्वज्ञानाचे आकर्षण वाटले असावे.

वादविवादाची भारतीय परंपरा, भिक्षूंच्या सिद्धी चिनी समाजाने जवळ केल्या. त्यामुळे भारतभूमी त्यांना आपली वाटू लागली. चीनच्या स्युयी आणि तांग राजवटींनीदेखील भारतीय संस्कृतीला आपलेसे केले. तांग राजवटीत 'वु' नावाची राणी होती. तिने तर एक भविष्यवाणी लिहून घेतली होती की, भविष्यात जन्म घेणारा मैत्रेय बुद्ध हा चीनमध्ये स्त्रीच्या रूपात जन्माला येणार आहे. तिने स्वतःलाच मैत्रेय बुद्ध म्हणवून घेतले आणि ती बुद्धाप्रमाणेच वेश करू लागली.

इ. स. ६४५ मध्ये युआन च्वांग जेव्हा चीनमध्ये परतला तेव्हा यी जिंग फक्त १० वर्षांचा होता. युआनच्या थरारक प्रवासाचे पडसाद यीच्या कोवळ्या मनावर उमटले. वयाच्या सातव्या वर्षीच तो मठात दाखल होऊन १४ व्या वर्षी त्याने दीक्षा घेतली. त्याचे गुरू सांगायचे, गौतमबुद्धाच्या मूळ शिकवणुकीप्रमाणे आपले आचरण असले पाहिजे.

बुद्धांची मूळ शिकवणूक समजण्यासाठी भारतातच

(पान ६ वर)

आनंद स्पंदन
डॉ. अविनाश मोहरील

# पंगु लंघयते गिरिम्

आरशासमोर बसून आरती स्वतःला न्याहाळत होती. आज ती जरा जास्तच सुंदर दिसत होती. काल मैत्रिणींच्या आग्रहावरून फेशियल, ब्लीच वगैरे प्रकार करून घेतले होते. खास मेकअप करायला आलेल्या त्या मुलीने आरतीचे सौंदर्य आणखीनच खुलविले होते. खास आईच्या पसंतीने घेतलेला भरजरी शालू आरतीला शोभून दिसत होता. यात भर म्हणजे मैत्रिणी काहीतरी खट्याळ बोलून कानात काहीतरी कुजबुजत होत्या. त्या हव्याहव्याश्या चिडवण्यामुळे आरती लाजून चूर होत होती. पण एक गोड अनुभूती तिच्या सबंध शरीरातून सैरावैरा धावत होती.

ते सारे खूप छान होते. कपाळावर लावलेल्या मुंडावळ्यांनी तिला रोमांचित करून टाकले होते. मधूनच आई किंवा मावशी खोलीत डोकावून जायची. आरतीकडे भरल्या डोळ्यांनी बघून समाधान व्यक्त करायची. मावशीने तर चक्क मीठ- मोहरी घेऊन दृष्टदेखील काढली... या सर्व कोलाहलात आरतीचे मन रमून गेले होते.



आज ती या सर्व समारंभाच्या केंद्रस्थानी होती. अचानक कुणीतरी म्हणाले- 'वरात आली.' कुणीतरी सांगितले, 'नवरा मुलगा तर घोड्यावर बसून राजपुत्रच वाटतो आहे...' हे वाक्य ऐकल्यावर आरती लाजून लालबुंद झाली. तिने गच्च डोळे मिटून घेतले. डोळे उघडले... बघते तर काय? खिडकीत आपल्या मैत्रिणींसोबत नटून थटून अबोली उभी होती. सर्व मैत्रिणींसोबत ती वरात न्याहाळत होती; आणि आरती? आरती आपला कृत्रिमपाय न लावल्यामुळे अडखळू पडली होती आणि पूर्णपणे भानावर आली होती. ते लग्न मुळात तिचे नव्हते तर तिच्या लहान बहिणीचे अबोलीचे होते. 'अबोलीसाठी मुले येत आहेत' असे सूचक वाक्य आरतीला ऐकू जावे, या पद्धतीने घरात बोलले गेले.

आरती अबोलीपेक्षा तीन वर्षांनी मोठी व जास्त शिक्षण घेतलेली होती. मानसशास्त्र विषयात पद्व्युत्तर शिक्षण तिने पूर्ण केले होते. दिसायला छान होती. परंतु एका पायाने अपंग होती. डावा पाय गुडघ्यापर्यंतच होता. त्यामुळे कृत्रिमपाय लावूनदेखील नीट चालता यायचे नाही. सारे काही ठीक असूनही लग्नाच्या बाजारात हा एक मोठा अडसर होता. तिला ते समजत होते. दोनच पोरी आहेत त्यामुळे सासरचे सारे काही आपल्याला मिळेल या हव्यासापोटी एक स्थळ एक वर्षापूर्वी चालून आले होते; पण त्यांचा पैशासाठीचा लोभ पाहून आरतीनेच नकार दिला होता. त्यावेळी मामाने तिला समजावले होते की, तुझ्याशी कुणीही पैशासाठीच लग्न करेल नाहीतर तुझे लग्नच होणारच नाही. मामाने आणलेले स्थळ होते त्यामुळे चिडून तो असे जिव्हारी लागणारे बोल बोलला होता. दुर्दैवाने ते खरे ठरले होते. त्यानंतर आरतीसाठी स्थळ आले नाही. अबोलीसाठी येणारी स्थळे बघून तिने मी लग्नच करणार नाही, असा निर्णय घरच्यांना सांगितला. त्वरित अबोलीचे लग्न ठरविण्यात आले आणि आरती सर्वांच्या लेखी त्यागमूर्ती ठरली... आरतीला सारे आठवून गेले.

आपला कृत्रिमपाय बसवून तीही मांडवात आली. मधेच एखादी मावशी तिच्या जवळ यायची, आस्थेने चौकशी करायची, तिने केलेल्या त्यागाबद्दल डोळ्यातून अश्रू काढायची आणि निघून जायची. मी आरतीच्या परिवाराशी संबंधित असल्याने मला तिच्याबद्दल सहानुभूती वाटत होती, परंतु मी ती व्यक्त करण्याचे टाळत होतो. कारण मला आरतीच्या मनात मोठी खळबळ सुरू आहे, असे जाणवत होते. ती मोठ्या कसोशीने हा संपूर्ण प्रसंग निभावून नेत होती, असेच वाटत होते. लहान बहिणीच्या लग्नातील ती त्याग मूर्ती असली, तरी या सगळ्या भावना तिच्या स्वप्नांमध्ये येत असणार त्याचे काय? विहिणीच्या पंगतीत वाढताना अबोलीला नाव घेण्यास सांगण्यात आले. तिला आठवेच ना. मुळातच कवी मनाच्या आरतीने तिला लगेच उखाणा सुचविला. अतिशय अप्रतिम उखाणा होता तो. सर्वांनी अबोलीपेक्षा आरतीची तारीफ केली. आरती काही न बोलता निघून गेली. कारण कदाचित तो उखाणा स्वतःसाठी स्वप्नांमध्ये तिने बरेच वेळा म्हटला असणार.

लहान बहिणीचे लग्न व्हावे म्हणून आपण अडसर ठरतोय, याची जाणीव झाल्यावर स्वतःहून लग्न न करण्याचा निर्णय तिने केला होता खरा; पण तिच्या वयानुसार मनात उठणारे तरंग ती कशी थांबवू शकणार होती! तिच्या दुर्दैवाने ते कुणीच समजून घेतले नव्हते. पूर्ण लग्न सोहळ्यात लोकांनी तिला तिच्या त्यागाबद्दलच्या पावत्या देऊन देऊन अक्षरशः गुदमरून टाकले होते. ती मात्र मोठ्या धिराने आपल्या मनातल्या भावना कुणालाही कळू न देण्याचा पूर्ण प्रयत्न करीत होती. वरातीची वेळ झाली. सर्वांची भेट झाल्यावर अबोली आरतीजवळ आली. आपल्या बहिणीमुळेच आपले लग्न होऊ शकले, याची पुरेपूर जाणीव तिला होती. आपल्या ताईला बिलगून ती रडायला लागली.

आरतीच्या डोळ्यात मात्र पाणी नव्हते. धिराने, चेहरा गंभीर ठेवून ती अबोलीला समजावत होती. अबोलीला तिने शांत केले. अबोली निघाली. आम्ही सगळे तिला सोडायला मंडपाच्या बाहेर जाण्यास निघालो. आरतीची आई तिला म्हणाली, 'बेटा दिवसभर तू कामकरून थकली असशील, तू येथेच बस.' आरतीने तिचे म्हणणे ऐकले. खरोखरीच तिच्या पायातून बहुदा कळा येत असणार.

(पान ६ वर)

विवेचन
श्रीरंग श्री. हिर्लेकर

# पातंजल योगसूत्रे (उत्तरार्ध)

पूर्वार्धात आपण योग्याला प्राप्त होणाऱ्या अनेक सिद्धीविषयी माहिती बघितली. संत चरित्रात त्यासंबंधीचे अनुभव आढळतात. भौतिकशास्त्राच्या दृष्टीने या सर्व गोष्टी अशक्यप्राय, अंधश्रद्धा अथवा भोंदूगिरी यातच गणल्या जातात. अनेकदा तसे असतेही; मात्र पातंजल योगशास्त्रात यासंबंधी विस्तृत स्पष्टीकरण मिळते. आपल्या ज्ञात क्षेत्रांपेक्षा अज्ञात विश्वाचे क्षितिज कितीतरी दूर आहे. उदाहरण म्हणून पूर्वार्धात वर्णन केलेल्या काही सिद्धींचे स्पष्टीकरण करता येते का ते पाहू. तत्पूर्वी योगसूत्रातील संयमशब्दाची व्याख्या पुन्हा सांगायची तर एकाच विषयावर सर्व मानसिक प्रवाह केंद्रित करून साधक, ध्यान आणि ध्येय यांच्यातील भेदाचा लय करणे.


**१) अदृश्य होणे-**

शरीर रूपांवर संयम करून, रूपग्रहणाच्या सामर्थ्यावर निरोध करून, चक्षू आणि प्रकाश यांचा वियोग करून योग्याला अंतर्धान होता येते. भौतिकशास्त्रानुसार एखादी गोष्ट दिसण्याकरिता एकतर ती स्वयंप्रकाशी असावी किंवा तिच्यावरून परावर्तित होणारा बाह्य प्रकाश निरीक्षकाच्या डोळ्यांवर पडायला हवा. भौतिकशास्त्रानुसार क्लोकिंग म्हणजे प्रकाशाला वस्तूभोवती गुंडाळणे. निरीक्षकाला वस्तू दिसेनाशी होते. योग्याच्या शरीरावरून अपवर्तित (रिफ्रेक्ट) होणारा प्रकाश निरीक्षकाच्या नेत्रांपर्यंत पोचतच नसावा किंवा तो हिप्नोटाईज होत असावा, असे म्हटले जाते. मात्र, वरील सिद्धीत या पलीकडील काही होत असते. दिसणे म्हणजे डोळ्यांनी बघणे इतकाच मर्यादित अर्थ नाही. दिसणे म्हणजे जाणवणे, ज्ञान होणे हाही अर्थ आहे. त्यामुळे योगी अंतर्धान होतो किंवा दर्शकाच्या ग्रहणशक्तीचे स्तंभन होते.

**२) क्षुधातृषानिवृत्ती -**

कंठावर संयम केल्याने तहान- भूकेची शांती होते. कंठ हे फक्त माध्यम. तेव्हा एक अत्यंत साधी शंका उपस्थित होते की, तहान आणि भूक हा कंठाचा विषय नाही. मग कंठावर संयमकेला काय आणि नाही काय, तहान- भूक तर लागणारच. येथे रामरक्षेतील 'कंठं भरत वंदितः' हा उल्लेख आठवतो. भृ धातूपासून भरत म्हणजे भरणपोषण हा शब्द येतो. क्षत्रियाला युद्धात कधी दीर्घकाळ अन्नपाण्याविना राहावे लागते. याकरिता विश्वामित्रांनी राम- लक्ष्मणांना बला आणि अतिबला या विद्या शिकविल्या होत्या. यांच्या विविध फलितांत क्षुधातृषा निवृत्ती आहे. त्यामुळे ज्याने आपल्या कंठावर म्हणजे पर्यायाने तहान- १ भूकेवर विजय मिळविला अशा रामाला वंदन; हा खरा अर्थ आहे.

आयुर्वेदानेही काही दिव्य वनस्पती सुचविल्या आहेत की, ज्यांच्या सेवनाने शरीराला दीर्घकाळ कृशता न येताही उत्साह कायमराहूनही अन्नपाण्याविना राहता येते. हिटलरनेही त्याच्या सैन्याला परव्हिटिन आणि क्रिस्टलमेथच्या करोडो टॅबलेटस् घेणे बंधनकारक केले होते. थोडक्यात हा विषय योग आणि आयुर्वेद दोघांनाही मान्य आहे.



वर फक्त दोनच सिद्धींचा उल्लेख केला आहे. पूर्वार्धात सांगितलेल्या सिद्धीपैकी एकही भौतिकशास्त्राच्या दृष्टीने शक्य नाही. अणिमा म्हणजे शरीर लहान करणे आणि महिमा म्हणजे वाटेल तितके मोठे करणे, गरिमा म्हणजे जड करणे तर लघिमा म्हणजे एकदम हलके करणे, हे कसे शक्य आहे? कारण यामुळे आकार आणि वस्तुमान यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दाढ्य (डेन्सिटी) या भौतिकशास्त्राच्या मूलभूत कल्पनेलाच तिलांजली द्यावी लागते. वाटेल तेथे क्षणात प्रकट होणे, भूत- भविष्याचे ज्ञान, दुसऱ्याचे अंतःकरण वाचणे, दिव्यदृष्टी, दूरस्थ शब्द ऐकणे, कशालाही स्पर्श न करता चालणे, नभोगमन, पंचमहाभूतांवर विजय, वाटेल त्या विषयाचे ज्ञान आणि कितीतरी. यावर विश्वास कसा ठेवावा? पण तरीही योगसिद्धींच्या समर्थनार्थ वरील स्पष्टीकरणे म्हणजे त्यांचे अवमूल्यन आहे. म्हणून निराळ्या दृष्टीने विचार करू...

१) हे खरे की, भौतिकशास्त्राची आणि योगशास्त्राची गृहितके, सिद्धांत, आयामभिन्न असले, तरी ज्या काही सिद्धी म्हणून सांगितल्या आहेत आणि अनेक संतचरित्रात ज्यांची उदाहरणे, अनुभव आढळतात त्यांची प्रतिती मात्र पंचमहाभूतांच्या भौतिक जगतातच येते. आपण व्यवहारात बघतो की का देशाचा कायदा दुसरीकडे चालत नाही. मग भौतिकशास्त्राला अमान्य म्हणून योगशास्त्रच खोटे असे का म्हणावे? दोघांची गृहितके, कल्पनाच निराळ्या.

२) स्वतः भौतिकशास्त्राचे नियमतरी कालातित आहेत का? कालचे सिद्धांत आज मोडकळीस आलेले दिसतात. पृथ्वी फिरते की सूर्य फिरतो या विषयावर पाश्चात्त्य विज्ञान जगतात २००० वर्षापूर्वी किती वाद होते.

आईन्टाईनने सापेक्षता तत्त्व सांगितले आणि न्यूटन वगैरेंचे ज्ञान खोटे जरी ठरले नसले तरी ढवळून निघाले. या नवीन ज्ञानावरही शंका आहेत. विश्वांची उत्पत्ती, बिग बँग सिद्धांत, स्टेडी स्टेट सिद्धांत, एक्सपांडिंग युनिव्हर्स कशाबद्दलच शास्त्रज्ञात एकमत नाही. अंतिमसत्य म्हणून काहीच नाही.

३) कालपर्यंत जे कल्पनेतही नव्हते, अशक्य किंवा अविश्वसनीय वाटायचे ते आज प्रत्यक्षात आल्याचे आपण बघतो. कदाचित हेही उद्या बदलेल आणि नवीन सिद्धांत पुढे येतील. मग आपण सावधपणे इतकेच म्हणूया की, आजच्या ज्ञात भौतिकशास्त्राला योगसिद्धी मान्य नाहीत. उद्याचे काय सांगावे?

योगशास्त्राची आणि भौतिकशास्त्राची तत्त्वेच निराळी. संयम, चित्त, वृत्ती, प्रकृती, परिणामही योगाची परिभाषा आहे. नाडी, संस्कार, प्राण, स्थूल शरीरापलीकडील सूक्ष्मशरीर या त्याच्या संकल्पना आहेत. त्यामागची सूक्ष्मऊर्जा, माहिती, पंचमहाभूतांपलीकडील चैतन्याचे विविध स्तरांवर प्रभुत्व मिळविणे हा त्याचा मार्ग आहे.

आपले आजचे विज्ञान या कशालाच ओळखत नाही म्हणून योगसिद्धी अशक्यप्राय वाटतात. योग आणि भौतिकशास्त्राच्या भाषांची मुळाक्षरेच निराळी, त्यांचे उच्चारच निराळे. त्यामुळे दोघांत इंटरफेस किंवा संवाद कसा व्हावा ? उत्तरोत्तर उन्नत होऊन पूर्णत्वास जाणारे आजचे अपुरे भौतिकशास्त्र पूर्वीच्या नियमांना नवीन आयामजोडत जाते.

नियमांच्या व्याख्या विस्तारतात. म्हणून योगसिद्धी भौतिकशास्त्राचे नियममोडताना दिसत असल्या तरी तसे होत नसावे. आपल्याला आज अज्ञात असलेल्या अनेक नियमांवर योगसिद्धी कार्य करतात. येथे केवळ ग्रंथोक्त म्हणून खरे म्हणावे असे नाही; पण समजत नाही म्हणून लगेच अमान्य करावे, असेही योग्य नाही. साधना करावी, चित्ताच्या उन्नत होणा अवस्थांचा अनुभव घ्यावा. नंतर विभूतिपाद साधनपाद यांचा प्रतिवाद करावा. त्यापेक्षा - **'ते ज्ञान पैं गा बरवे। जरी मनी आथी आणावे। तरी संतांते भजावे। सर्वस्वेसी।।'**

पर्यावरण **मिलिंद बेंडाळे**


# पर्यावरणाचीच नव्हे; उपजीविकेचीही लढाई

पृथ्वी सूर्याच्या वाढत्या तापाने होरपळून निघू लागते, तेव्हा केवळ ऋतू बदलत नाहीत, तर जीवनाचा संपूर्ण समतोल डळमळू लागतो. एकेकाळी वैशाख- ज्येष्ठातील कडक ऊन हे भारतीय उपखंडाच्या नैसर्गिक हवामानाचे वैशिष्ट्य मानले जात होते; परंतु आज त्याच उष्णतेने अभूतपूर्व संकटाचे स्वरूप धारण केले आहे. तापमानातील सातत्यपूर्ण वाढ, उष्णतेच्या लाटांची वाढती तीव्रता आणि बदलत्या हवामानाचा अनिश्चित स्वभाव यामुळे केवळ निसर्गच नव्हे, तर मानवी जीवनाचे सर्वच पैलू प्रभावित होत आहेत. शेतजमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत आहे. नद्या आणि जलाशय आक्रसत आहेत, झाडांची हिरवाई पिवळसर होत चालली आहे आणि शेतकऱ्यांच्या चेहऱ्यांवर भविष्याबद्दलची चिंता गडद होताना दिसत आहे.

भारतासारख्या कृषिप्रधान देशासाठी हे संकट अधिकच चिंताजनक आहे. देशातील कोट्यवधी नागरिकांचे जीवन आणि उपजीविका थेट किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहेत. शेती ही केवळ अन्नधान्य निर्मितीची प्रक्रिया नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया आहे. ती कुटुंबांच्या आशा-आकांक्षांना पोसते. गावांच्या सामाजिक रचनेला स्थैर्य देते आणि देशाच्या आर्थिक विकासालाही हातभार लावते. हवामान बदलामुळे शेतीवर होणारे परिणाम संपूर्ण समाजव्यवस्थेवर पडसाद उमटवतात. तापमान नेहमीपेक्षा वाढून सलग अनेक दिवस उष्णतेच्या लाटा सुरू राहतात, तेव्हा त्याचा सर्वप्रथम परिणाम जमिनीवर आणि पिकांवर होतो. जमिनीतील ओलावा कमी होऊ लागतो. पिकांच्या वाढीचा वेग मंदावतो आणि उत्पादन क्षमतेत घट येते. विशेषतः वाढत्या तापमानाबाबत अत्यंत संवेदनशील असलेली भातासारखी पिके भात उत्पादनासमोर गंभीर आव्हाने उभी करतात.

भारतामध्ये हवामान बदलाचे परिणाम आता स्पष्टपणे जाणवू लागले आहेत. काही दशकांपूर्वी मार्च आणि एप्रिल महिन्यांपर्यंत हवामान तुलनेने आल्हाददायक असे; आता मात्र फ ब्रुवारीच्या अखेरीपासूनच उष्णतेचा प्रभाव वाढू लागतो. अनेक राज्यांमध्ये तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या पुढे जात आहे. पंजाब, हयाणा, राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रासारख्या राज्यांमध्ये उष्णतेच्या लाटांची वारंवारता आणि तीव्रता सातत्याने वाढताना दिसत आहे. याचा सर्वाधिक परिणाम शेतीवर होत आहे. गव्हासारखी पिके अपेक्षेपेक्षा लवकर परिपक्व होतात. दाण्यांचा आकार कमी राहतो आणि एकूण उत्पादन घटते. भाताच्या शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवश्यकता असते; परंतु वाढते तापमान आणि अनियमित पर्जन्यमानामुळे जलसंकट तीव्र होत आहे. सिंचनासाठी आवश्यक पाणी उपलब्ध न झाल्यास काही दिवसांमध्येच शेतकऱ्यांची महिनोंमहिने केलेली मेहनत वाया जाऊ शकते.

एकेकाळी शेतकरी हवामानाच्या संकेतांवर आधारित शेती नियोजन करत असत. ऋतूंच्या चक्राचा अनुभव आणि परंपरागत ज्ञान यांच्या आधारे शेती व्यवस्थापित केली जात असे; परंतु आज हवामानातील अनिश्चिततेने या अनुभवांनाही आव्हान दिले आहे. परिणामी, शेती हा दिवसेंदिवस अधिक जोखमीचा व्यवसाय बनत चालला आहे. अत्याधिक उष्णतेचा परिणाम केवळ शेती उत्पादनांवरच मर्यादित राहात नाही. त्याचा थेट परिणाम श्रमबाजारावर आणि रोजगारावरही होतो.



जगभरात कामाचे कोट्यवधी तास वाढत्या उष्णतेमुळे नष्ट होत असल्याचे संशोधनातून स्पष्ट झाले आहे. भारतामध्ये ही समस्या अधिक गंभीर आहे. कारण येथे मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या खुल्या वातावरणात काम करते. शेतकरी, शेतमजूर, बांधकाम क्षेत्रातील कामगार आणि विविध असंघटित क्षेत्रांमधील श्रमिक यांना वाढत्या तापमानाचा सर्वाधिक फटका बसतो. उष्णता असह्य बनते, तेव्हा कामाचे तास कमी करावे लागतात. परिणामी उत्पादन क्षमता घटते आणि मजुरांच्या उत्पन्नावर परिणाम होतो. याचा सर्वाधिक फटका आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना बसतो. ग्रामीण अर्थव्यवस्थेत शेती हे केवळ उत्पन्नाचे साधन नाही, तर सामाजिक स्थैर्याची हमीदेखील आहे. शेती सतत तोट्यात जाऊ लागली, तर ग्रामीण भागात बेरोजगारी वाढेल आणि शहरांकडे स्थलांतराचे प्रमाणही वाढेल. गेल्या काही दशकांमध्ये भारतातील शहरांवर लोकसंख्येचा प्रचंड ताण निर्माण झाला आहे. पायाभूत सुविधांवरील दबाव, प्रदूषण, वाहतूक कोंडी आणि संसाधनांची कमतरता ही आधीच गंभीर समस्या बनली आहे. अशा परिस्थितीत ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाल्यास शहरी व्यवस्थेवरील ताण आणखी वाढेल. त्यामुळे हवामान बदलाचा प्रश्न केवळ शेतीपुरता मर्यादित नसून व्यापक सामाजिक आणि आर्थिक परिणाम घडवून आणणारा आहे. ग्रामीण भारतात पशुपालन हे शेतीइतकेच महत्त्वाचे उपजीविकेचे साधन मानले जाते; परंतु वाढत्या उष्णतेमुळे या क्षेत्रालाही गंभीर फटका बसत आहे. जनावरांची दूध उत्पादन क्षमता कमी होत आहे. चारा आणि पाण्याची कमतरता निर्माण होऊन पशुधनाच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होत आहे. कुक्कुटपालन उद्योगालाही समस्यांना सामोरे जावे लागत आहे. तापमान वाढल्याने पक्ष्यांच्या मृत्यूचे प्रमाण वाढते आणि उत्पादकतेत घट येते. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. फळे आणि भाजीपाला उत्पादनही या संकटापासून अलिप्त राहिलेले नाही. वाढत्या तापमानामुळे फळे वेळेआधी पिकतात आणि त्यांची गुणवत्ता घसरते. भाजीपाल्याचे उत्पादन कमी झाल्यामुळे बाजारातील किमती वाढतात. त्याचा थेट परिणाम महागाईवर होतो आणि सामान्य नागरिकांच्या घरगुती अर्थकारणावर अतिरिक्त भार पडतो. भारतातील भात उत्पादनावर घोंगावणारा धोका विशेषतः चिंताजनक आहे. कारण भात हे केवळ एक कृषी उत्पादन नाही, तर देशातील कोट्यवधी लोकांच्या अन्नसुरक्षेचा पाया आहे. पूर्व भारत हा भात उत्पादनाचा प्रमुख प्रदेश मानला जातो. या भागात तापमान सातत्याने वाढत राहिले आणि पाण्याची उपलब्धता कमी होत गेली, तर उत्पादनात मोठी घट होऊ शकते. अशा परिस्थितीत अन्नधान्याच्या किमती वाढतील, गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांवरील आर्थिक ताण वाढेल आणि सामाजिक विषमता गडद होईल. ग्रामीण भागातील लहान शेतकरी, शेतमजूर आणि लघुउत्पादक पर्यावरणाला सर्वात कमी हानी पोहोचवतात, तरीही हवामान बदलाचे दुष्परिणाम त्यांनाच सर्वाधिक सोसावे लागतात. दुसरीकडे औद्योगिकीकरणाच्या नावाखाली विकसित देशांनी दशकभर प्रचंड प्रमाणात कार्बन उत्सर्जन केले. आज पृथ्वी तापत असताना विकसनशील देशांना आणि गरीब समाजघटकांना परिणाम भोगावे लागत आहेत. त्यामुळे जागतिक पातळीवर हा प्रश्न अधिक महत्त्वाचा बनत आहे.

**संयुक्त राष्ट्र संघाच्या अलिकडील अहवालाने जगाचे लक्ष केवळ तापमानवाढीच्या मुद्याकडे वेधले नाही, तर हा इशारा मानवी सभ्यतेच्या सर्वात मूलभूत आधारस्तंभांपैकी एक असलेल्या शेती आणि अन्नसुरक्षेवर घोंगावत असलेल्या संकटाबाबतही आहे. उष्णतेच्या लाटा हा आता केवळ ऋतुमानाचा भाग राहिलेला नाही. ते हळूहळू समाज, अर्थव्यवस्था, रोजगार आणि मानवी आरोग्यासमोरील गंभीर आव्हान बनत आहे.**

आज भारताने आपल्या कृषी धोरणांचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. शेतकर्यांना हवामानाची अचूक माहिती, प्रभावी पीकविमा संरक्षण आणि आधुनिक तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. सौरऊर्जेवर आधारित सिंचन व्यवस्था, जलसंधारण, नैसर्गिक शेती आणि हवामानाशी सुसंगत कृषी पद्धती यांना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे; मात्र ही जबाबदारी केवळ सरकारची नाही. समाजालाही आपल्या जीवनशैलीचा पुनर्विचार करावा लागेल. संसाधनांचा अतिरेकाने वापर, उधळपट्टी आणि निसर्गाविषयीची असंवेदनशीलता यामुळेच आजची परिस्थिती निर्माण झाली आहे. पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे, ऊर्जा बचत करणे, हरित क्षेत्रांचे संवर्धन करणे आणि प्रदूषण कमी करणे या बाबतीत प्रत्येक नागरिकाची भूमिका महत्त्वाची आहे. आपण हे विसरून चालणार नाही की पृथ्वी ही केवळ संसाधनांचा साठा नाही, तर जीवनाचा आधार आहे. शेतांमधील हिरवाई ही केवळ शेतकऱ्यांची नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या अस्तित्वाची हमी आहे. आपल्या ताटातील प्रत्येक घास हा शेतातूनच येतो. त्यामुळे शेतीचे भविष्य सुरक्षि राहणे म्हणजे देशाचे भविष्य सुरक्षित राहणे होय. आजची वेळ केवळ चिंता करण्याची नाही, तर ठोस कृती करण्याची आहे. जगाने हवामान बदलाच्या संकटाकडे गांभीर्याने न पाहिल्यास भविष्यात कोरडी पडलेली जमीन, रिकामे जलाशय आणि अन्नटंचाई हे कठोर वास्तव ठरू शकते. त्यामुळे हा केवळ पर्यावरणाचा नाही तर मानवी अस्तित्वाचा प्रश्न आहे. पृथ्वीचे संरक्षण करणे ही आता कोणतीही आदर्शवादी कल्पना नसून मानवजातीच्या भविष्याच्या संरक्षणासाठी अपरिहार्य अट बनली आहे.

(लेखक पर्यावरणाचे अभ्यासक आहेत.)

पान १ वरून

## सजला आषाढ सोहळा

घटत चाललेल्या जंगलांमुळे दुष्काळाची भीषणता वाढते हे सत्य आहे. म्हणूनच पडत्या पावसात आरडाओरडा करत, अंगविक्षेप करून नाचून आनंद व्यक्त करण्यापेक्षा वृक्षारोपणाच्या कार्यक्रमांमध्ये कृतिशील सहभाग नोंदवत आपण निसर्गाचा हा भरलेला दरबार अधिक समृद्ध करू शकतो. आषाढ साजरीकरणाचं हे नवं स्वरूप आपल्याला आनंद देईलच; शिवाय काही तरी भरीव योगदान दिल्याची भावनाही संतुष्टता वाढवेल. कवी कालिदासाने आपल्या अजरामर काव्यामध्ये आषाढाच्या मेघालाच प्रियेपर्यंत सांगावा पोहोचवण्याचं साकडं घातलं आहे. तो मेघाला आपल्या प्रियेपर्यंत पोहोचण्याचा मार्ग सांगतो. हा 'जलद' आपल्या मनाची तगमग, आर्तता, आवेग, विरहव्याकुळता सर्व काही जाणेल असा विश्वास या कविराजाला आहे. आजही आषाढाच्या प्रथम दिवशी त्याच्या या तरल भावनांचा सन्मान केला जातो. त्याच्या काव्यप्रतिभेचा सन्मान केला जातो. एका व्यक्तीची आर्तता आणि विव्हळता जाणून घेणारा हा मेघ यावेळी अगदी आपला वाटतो. कवी कालिदासाचंच नव्हे तर आपल्या प्रत्येकाचं आषाढातल्या या गच्च जलदांशी अतूट नातं आहे. एरवी निळाशार दिसणारा हा डोईवरचा डोंब या दिवसात श्यामवर्णी होऊन जातो. त्यांचं ते गच्च आवरण चराचराला कवेत घेऊ पाहतं. संथ आणि शांत गतीने या मेघांमधून बरसणाऱ्या जलधारा अमृतसिंचन करतात. अशा या नादमधूर वातावरणात पानापानांतून मल्हाराची धून ऐकू येऊ लागते. डोंगरदऱ्यांमध्ये कोसळणारा, माळरानावर बरसणारा, कौलांमधून ठिबकणारा, पन्हाळीतून झेपावणारा... पावसाची ही रूपं डोळा भरून पाहावीशी वाटतात. हा सोहळा अनुपम आहे, मनोहर आहे, सर्जनशील आहे. हा मेघ तुमच्या-आमच्या प्रत्येकाच्या आशा- आकांक्षांच्या पूर्ततेसाठी धावून आला आहे. त्याच्या काळ्या छायेत उद्याची तेजोशलाका दडली आहे. चला, त्याच स्वागत करूया...घनघोर बरसणारा आषाढ मनसोक्त अनुभवू या. एकदा का या लोण्यासारख्या चिखलात पावलं भिजली की मनात आपोआप मांगल्याची कमळं फुलू लागतील आणि सृष्टीबरोबर मनाचा गाभाराही प्रसन्न होईल.

## पालख्या निघाल्या...

त्यात वातावरणातील चैतन्यही भर घालते. या सोहळ्यासाठी अवघी सृष्टी नटलेली असते. या सोहळ्यासाठी वारकरी पंढरीचे आमंत्रण आल्यासारखे सिद्ध होतात. तालभरल्या गतीने पंढरीची वाट धरतात. मोठी सज्जता करतात. नेहमीचे व्याप-ताप विसरून, उद्योगधंदे बाजूला सारून, हातात झांज-चिपळ्या घेऊन वारीला निघतात. डोईवर तुळशी वृंदावन, काखेत इवलुसे कपड्यांचे बोचकेघेऊन वारकरी स्त्रियाही तितक्याच उत्साहाने वारीच्या पदयात्रेत सामील होतात. कुणाच्या हाती एकतारी तर कुणाच्या गळ्यात मृदुंग! हातात दिंड्या-पताका घेऊन 'ग्यानबा तुकाराम'च्या गजरात पावले पंढरीची वाट चालू लागतात.

कोसळणारा पाऊस, दुथडी भरून वाहणारे नदी- नाले, खडकाळ वाट... कश्शाकश्शाचे अवघडपण यांना जाणवत नाही. यांच्या मनी-मानसी केवळ आनंदी-आनंद भरून राहिलेला असतो. 'अचपळ मन माझे नावरे विठुराया!' या उक्तीला साजेशी वारकऱ्यांची वाटचाल कोणत्याही अडचणीला जुमानत नाही. सूर्य कलला की मिळेल तिथे आसरा घ्यायचा, कधी एखाद्या देवळात, कधी एखाद्या खोपटात तर कधी एखाद्या रानातल्या झाडाखाली! तिथेच मिळेल तेवढी दोन-चार तास विश्रांती घ्यायची. अन्न-पाण्याच्या गरजा जमतील तशा पुरवायच्या. पहाटेच उठायचे. एखाद्या नाल्याच्या आश्रयाने, जुजबी आडोसा पाहून आंघोळी-पांघोळी उरकायच्या. जरा फटफटले की पुन्हा विठुनामाचा गजर करत दिंड्यांबरोबर प्रवास सुरू करायचा... हा वारकऱ्यांचा काही दिवसांचा दिनक्रम असतो.

पालखी सोहळ्याला प्रारंभ झाल्यानंतर आषाढी एकादशीपर्यंत वारकऱ्यांची विठ्ठलभेटीची आस वरचेवर दृढ होत जाते. ही अंतरीची आस महत्त्वाची असते. विशेष म्हणजे या भक्तगणातले बहुतेक जण प्रापंचिक असतात. प्रपंच, नोकरी- व्यवसाय सांभाळून आणि नित्यकर्म अनुसरून आपल्या सुख- दुःखासाठी विठ्ठलाला साकडे घालण्यास त्यांची मने उत्सुक असतात. प्रपंच सुखाचा व्हावा, जीवन आनंदी बनावे, व्यापार- उदीमात बरकत यावी ही मनोमन इच्छा-आकांक्षा त्यांच्याही ठायी असते. विठ्ठलनामाने अवघे जीवन सार्थकी लागावे, त्यासाठी वाचेने नाम घ्यावे आणि श्रवणी भक्ती-कीर्ती ऐकावी यासह कृतार्थ व्हावे हेच मागणे प्रत्येकाच्या ध्यानी-मनी असते. तो कृपाळू मायबाप भगवंत सर्वांवर कृपेची छाया धरतो. ही दृढ श्रद्धा-भावना त्यांच्या मनी असते.

प्रापंचिकतेला सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक संदर्भ असतातच. पण त्यात राहूनही पारमार्थिक वाटचालीची म्हणजे पंढरीच्या वारीची भक्तिपताका खांद्यावर घेऊन सन्मार्गावर चालत राहायच्या व्रतधर्माचे जागरण म्हणजे पालखी सोहळा होय. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउली आणि जगद्गुरू तुकाराम महाराज समतेचे आणि विश्वबंधुत्वाचेच वारकरी होते. निरामय शांततेची तीच वाट धरण्याचा हा प्रयत्न म्हणायला हवा. अपार सुखाची अनुभूती देणाऱ्या या सोहळ्याचे वर्णन संतांच्याच शब्दात '**जाईन गे माय, तया पंढरपुरा! भेटेन माहेरा, आपुलीया**' असे करता येईल. भक्तिरसात न्हालेला हा सोहळा आता सुरू झाला आहे.

## इंडो-पॅसिफिकमध्ये भारताचे ब्रह्मास्त्र

मुक्त व्यापाराचे महत्त्व मान्य करतात आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या चौकटीत समुद्रीवाद सोडविण्याच्या भूमिकेचे समर्थन करतात. त्यामुळे ही भागीदारी तत्कालिक राजकीय घडामोडींवर अवलंबून नाही. तिचा पाया समान हितसंबंध, परस्पर विश्वास आणि दीर्घकालीन धोरणात्मक उद्दिष्टांवर उभा आहे. म्हणूनच, भारत-इंडोनेशिया संबंधांकडे उदयोन्मुख आशियाई व्यवस्थेतील स्थैर्य निमर्ाण करणारी भागीदारी या दृष्टीने पाहणे अधिक योग्य ठरेल. एकूणच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा इंडोनेशिया दौरा हा भारताच्या व्यापक इंडो-पॅसिफिक धोरणाचा महत्त्वपूर्ण टप्पा ठरतो. ब्रह्मोस किंवा अस्त्र क्षेपणास्त्रांची निर्यात ही त्याची सर्वाधिक चर्चेत राहिलेली बाजू असली, तरी या दौर्याचे महत्त्व त्यापेक्षा व्यापक आहे. सांस्कृतिक वारशातून निर्माण झालेला विश्वास, संरक्षण सहकार्याने वाढलेली सामरिक जवळीक, आर्थिक भागीदारीतून निर्माण होणार्या नव्या संधी आणि मुक्त, सुरक्षित व नियमाधारित सागरी व्यवस्थेबाबतचा समान दृष्टिकोन या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे भारत-इंडोनेशिया संबंधांचे नवे रूप होय. आशियातील बदलते सत्ता-संतुलन, चीनची वाढती सक्रियता, पुरवठा साखळ्यांचे पुनर्संतुलन आणि सागरीसुरक्षेचे वाढते महत्त्व या पार्श्वभूमीवर भारत आणि इंडोनेशिया यांच्यातील भागीदारी आगामी दशकात निर्णायक ठरण्याची चिन्हे आहेत. बदलत्या जागतिक व्यवस्थेत ही भागीदारी इंडो- पॅसिफिक प्रदेशात स्थैर्य, समतोल आणि सहकार्याचा नवा अध्याय लिहू शकते, असे नक्कीच म्हणता येईल.

**प्रकृतीकडून संस्कृतीकडे किंवा विकृतीकडे वळण्याची क्षमता माणसाकडेच आहे. शिस्तीचं स्टेअरिंग मात्र त्याची वाटचाल ठरवत असतं. शिस्त आणि स्वातंत्र्य या दोन्ही कंसेप्ट अनेक लोकांना वेगळ्या वाटतात. शिस्त गिरवताना कसलं आलंय स्वातंत्र्य? असं अनेक मुलांना वाटत असतं. पण, स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नसून स्वातंत्र्य म्हणजे स्वयं नियमन!**

# शिस्तीचे धडे, उत्तम गडे!

नवचेतना **समिधा पाठक**

कुठल्याही देदीप्यमान कामगिरीने आपले डोळे दिपून जातात. पण, कुठलंही यश कुणालाही काही एका रात्रीतून मिळत नसतं. त्या यशामागे अनेक रात्रींची मेहनत असते. ही पडद्याआडची मेहनत म्हणजे जिद्द, चिकाटी आणि शिस्तीचा त्रिवेणी संगम! व्यक्तिगत आणि सामाजिक कार्यक्षमता वाढवण्यासाठी मान्य केलेले नियम, अटी, पद्धती व कायदे आणि त्यांचं पालन करणं म्हणजे अनुशासन! शिक्षणाच्या साहाय्याने चांगली वागणूक अंमलात आणणं म्हणजे शिस्त. साधनेचा मूळ पाया म्हणजे शिस्त. सुधारणा सुधारण्यासाठी स्वतःची सुधारणा किंवा सुनियमन म्हणजे शिस्त! भावनांवर नियंत्रण ठेवण्याची व आपल्या अक्षमतांवर मात करण्याची क्षमता म्हणजे शिस्त! शिस्तीचे धडे उत्तम गडे; कणकण शोधते कधीच न रडे...

साधारणतः वयाच्या तिसर्या-चौथ्या वर्षापासून प्रत्येकालाच शिस्तीचे धडे गिरवले जातात. पण, या धड्यांना कुणी गांभीर्याने घेतं, तर कुणी सहजतेने घेतं. पूर्वी आदिमानव गुहांमध्ये किंवा जंगलात राहायचा, आपलं अन्न तो स्वतः शोधायचा. मग हळूहळू माणूस समूहात राहू लागला. समूहात राहून त्याला टीमवर्कचं महत्त्व कळलं. मग सगळ्यांनी मिळूनमिसळून आनंदाने राहावं म्हणून तो नियम आखू लागला. या नियमांतून, कायद्यातून व रीतिभातीतून आपला समाज घडला. तर समाज हा निसर्गदत्त नसून माणसाने आपल्या विवेकबुद्धीने घडवला आहे. समाजात नांदण्यासाठी ज्याप्रमाणे नीतिनियम बनवले गेले, त्याचप्रमाणे माणसाने त्याला स्वतःला घडविण्यासाठीसुद्धा काही नियम बनवलेत. त्यातील काही युनिव्हर्सल नियम प्रत्येकाला लागू पडतात आणि हॅबिट्सच्या अंतर्गत ते प्रत्येकाला लहानपणी शिकवले जातात. जसं- रोज दात घासायला हवेत, स्वच्छ आंघोळ करावी इत्यादी. पण, याव्यतिरिक्त मोठं होत असताना विवेकबुद्धीचा आधार घेऊन, आपले नियम आपल्याला बनवायचे असतात आणि आपली स्वयंप्रज्ञा जोपासायची असते. आजकाल अनेक पालकांची गोंधळलेली मन:स्थिती बघायला मिळते. आपल्याला सहन होईपर्यंत मुलांना हवं ते आणि तसं करू द्यायचं आणि मग नाकातोंडाशी पाणी येऊ लागल्यावर आक्रमक पवित्रा घ्यायचा. हे योग्य आहे का? नक्कीच नाही. मग यावर तोडगा म्हणजे गोल्डन मिन किंवा सुवर्णमध्य! शिस्त जरूर असायला हवी, पण तिचा अतिरेकसुद्धा नको. प्राणिमात्र व कीटक यांचं वर्तन प्रकृतीच्या नियंत्रणात असतं, पण माणसाचं तसं नाहीय. प्रकृतीकडून संस्कृतीकडे किंवा विकृतीकडे वळण्याची क्षमता माणसाकडेच आहे. शिस्तीचं स्टेअरिंग मात्र त्याची वाटचाल ठरवत असतं. शिस्त आणि स्वातंत्र्य या दोन्ही कंसेप्ट अनेक लोकांना वेगळ्या वाटतात. शिस्त गिरवताना कसलं आलंय स्वातंत्र्य? असं अनेक मुलांना वाटत असतं. पण, स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नसून स्वातंत्र्य म्हणजे स्वयं नियमन! म्हणूनच स्वतःचं नियंत्रण करण्याचं तंत्र ज्यानं आजमावलं आहे, तो खर्या अर्थाने स्वतंत्र आहे. नुकत्याच घेण्यात आलेल्या एका सर्वेमध्ये आढळून आलं की, मुलं व पालकांमध्ये सुसंवाद होत नाहीय, तर काही पालकांनी कबूल केलं की, मुलांशी कसं वागावं हेच त्यांना कळतं नाहीय. मुलांना चांगलं वळण लावण्याचा अधिकार पालकांकडे व शिक्षकांकडे असतो. पण, मुलांना शिस्तीचे धडे देताना शिस्तीचं महत्त्व मुलांना पटवून देणं फार महत्त्वाचं असतं. शिक्षा टाळण्यासाठी शिस्त बाळगा, हे समीकरण त्यांना शिकवू नये. चांगल्या जीवनशैलीसाठी शिस्तीचं महत्त्व काय असतं, हे त्यांच्या मनात रुजवायला हवं. मुलाची मानसिकता ओळखून त्याच्या मानसिकतेच्या अनुरूप शिक्षण व संस्कार त्याला द्यायला हवे. म्हणजे स्वयंशिस्त कालानुरूप त्यांच्यात विकसित होत जाते. स्वयंशिस्त लक्ष्य आणि कर्तृत्व यांना जोडणारा पूल आहे. स्वयंशिस्तीची सुरुवात आपल्या विचारांवर प्रभुत्व मिळवण्यापासून सुरू होते. म्हणूनच म्हटलं जातं की, बुद्धी आणि प्रतिभेपेक्षा इच्छाशक्ती व स्वयंशिस्त अधिक प्रभावशाली असते. अणुसंहारानंतर बेचिराख झालेल्या जपानने केवळ शिस्त, कष्ट व वक्तशीरपणाच्या भांडवलावर 'फिनिक्स' झेप घेतली! आपला आनंदसुद्धा आपल्या आत्मशिस्तीवर अवलंबून असतो. शिस्तबद्ध मन आपल्याला आनंदाकडे ओढून नेतं. केवळ ध्येय ठरवून होत नसतं, ध्येयाचा दीपक हा शिस्त आणि चिकाटीच्या बळावर प्रज्वलित राहत असतो आणि शिस्तीचा धाक असण्यापेक्षा स्वयंशिस्त असावी. पण, मग स्वयंशिस्त कशी निर्माण करायची? तर सगळ्यात पहिली गोष्ट म्हणजे लहान प्रारंभ करायचेत. सहसा नववर्षी आपण अनेक दृढ संकल्प करतो. जसं कुणी ठरवतं, की मी उद्यापासून माझ्या आरोग्याची काळजी घेणार. मग एरवी सात वाजता उठण्याऐवजी आपण पाचला उठतो. पाच किलोमीटर जॉगिंग करायला जातो, आल्यावर थोडा व्यायाम किंवा योगा, मग प्रोटीन शेक आणि फ्रुट्स खायचे, डायट बदलवायचं... हे सगळं आपण फारतर चार दिवस करतो आणि मग पुन्हा जैसे थे! म्हणून लहान व थोड्या बदलांपासून सुरुवात करायची. एक चेकलिस्ट बनवायची. रोज रात्री झोपताना बघायचं की, आपण आपले टास्क पूर्ण केले आहेत की नाही. टास्क पूर्ण झाले असतील, तर स्वतःला बक्षीस द्यायचं आणि टास्क पूर्ण न झाल्यास सुधारणा करायची. अशाप्रकारे स्वयंशिस्तीचे धडे आपण गिरवू लागतो.



कीर्तिरूपांच्या आठवकथा
डॉ. रमा गोळवलकर

# सुलभा




महाभारतासारखा ग्रंथ हा आपला सांस्कृतिक ठेवा आहे, याचा सार्थ अभिमान वाटायला हवा. कारण त्यात या देशात होऊन गेलेल्या अशा विविध व्यक्तिरेखा, त्यांच्याशी निगडित प्रसंग आणि त्यातून मिळणारं मौल्यवान विचारधनाचा खजिना दडला आहे. महाभारतात नोंदलेल्या २०० हून अधिक आकाश वाचनाच्या नोंदींचा सखोल अभ्यास करून नीलेश ओकांनी पुरा- खगोलीय म्हणजे आर्किओ- अस्ट्रोनॉमी संशोधनातून महाभारताचं युद्ध आज म्हणजे २०२६ पासून ७५८७ वर्षांपूर्वी १६ ऑक्टोबरला सुरू झालं, असं प्रतिपादित केलं आहे. त्यामुळे महाभारतात ज्यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आलेला आहे अशी सगळी मंडळी त्या आधीच होऊन गेली, असं म्हणता येतं. त्यातल्या काही व्यक्ती ज्ञानी होत्या, काही चतुर, काही पराक्रमी, काही त्यागी तर काही शुद्ध आचरणाच्या! यांच्या वागण्यातून, बोलण्यातून, व्यवहारातून भारताच्या जडणघडणीचा इतिहास उलगडत जातो.

अशाच एका विदुषीची कथा येते महाभारत ग्रंथाच्या शांतिपर्वात. उत्तरायण सुरू होण्याची वाट बघत शरपंजरी विश्रांती घेणाऱ्या पितामह भीष्मांना राजा युधिष्ठिर गृहस्थाश्रमाचा त्याग न करता मोक्ष प्राप्त होऊ शकतो का, असा प्रश्न विचारतो. त्यावर पितामह एका ब्रह्मवादिनीचा संदर्भ देतात. हा प्रसंग शांतिपर्वाच्या ३२१ व्या अध्यायात वर्णन केलेला आहे. ती गोष्ट अशी की, मिथिला नगरीचा राजा धर्मध्वज जनक पंचशिख नावाच्या सांख्य तत्त्वज्ञ योग्याचा शिष्य होता. त्यांच्याकडून त्यानं वेद-वेदांत, मोक्ष शस्त्र आणि दंड नीतीचं ज्ञान प्राप्त केलं होतं. सर्व सांसारिक गोष्टींपासून निर्लिप्त होऊन तो राज्य कारभार करीत होता. म्हणून त्याला विदेह म्हणजे देहाची आसक्ती नसलेला हे विशेषनाम होतं. शिवाय त्याला नरेश्वर अशी उपाधी होती. त्या काळच्या सर्व पुरुष मंडळींसाठी तो आदर्श होता. त्याची ख्याती ऐकून सुलभा नावाच्या एका ब्रह्मवादिनी तस्वी योगिनीला त्याची परीक्षा घेण्याची इच्छा झाली. योगविद्येद्वारे अतिशय सुंदर स्त्रीचं रूप घेऊन ती राजा धर्मध्वजाच्या राजसभेत उपस्थित झाली.

धर्मध्वजाच्या मनाचा आणि बुद्धीचा ठाव घेण्यासाठी तिनं सूक्ष्मरूपात त्याच्यात प्रवेश करण्यास सुरुवात केली. याला योगशास्त्रात परकाया प्रवेश म्हणतात. सर्वसाधारणपणे हा प्रयोग मृतदेहात करतात, पण इथे मात्र सुलभानं जिवंत धर्मध्वजाच्या देहात प्रवेश केला. त्याची जाणीव होताच धर्मध्वजानं रागावून तिला प्रश्न केले की, ती कोण आहे? कुठून आली आणि कुठे जाणार आहे? इथे येण्याचा उद्देश काय? त्याच्या अनुमतीशिवाय त्याच्या शरीरात, मनात, बुद्धीत ती का प्रवेश करते आहे? त्यावर ती उत्तर देते की, ती का क्षत्रिय राजकुळात जन्माला आली असून तिच्या पित्याचे नाव प्रधान आहे. विद्याविभूषित आणि शास्त्र ज्ञाता झाल्यानंतर तिच्या योग्यतेचा वर न मिळाल्यामुळे तिनं ब्रह्मचर्याचंच पालन करण्याचा निश्चय केला. घरदार आणि संसारिक मोहमाया त्यागली आणि ती ज्ञानप्राप्तीसाठी सतत पायी प्रवास करणारी तपस्विनी म्हणजे परिव्राजक झाली. विविध ठिकाणी विविध लोकांशी संवाद साधून ध्यानधारणादि योगिक क्रियांचा सराव करून तिनं बरंच ज्ञान आत्मसात केलं आहे. तिला धर्मध्वजाची परीक्षा घ्यायची आहे.

एकाच शरीरात राहून धर्मध्वज राजा आणि साध्वी सुलभेचा संवाद हा भारतीय परंपरेतील सर्वोत्तम तत्त्वचर्चांपैकी एक आहे. त्यात तिचा पहिला प्रश्नच हा होता की, हे राजा तू जर स्वतःला विदेह म्हणवून घेतोस तर तुझ्या देहात मी प्रवेश केला म्हणून तुला राग का आला? या रागावर जर तुला नियंत्रण मिळविता आलं नाही तर तू स्वतःला ज्ञानी का म्हणवून घेतोस? तिनं त्याला समजावून सांगितलं की, राजा तू ज्ञानी आहेस हा देखील तू जोपासलेला अहंकार आहेस. त्यापासून जोवर तू मुक्त होणार नाहीस तोवर तुला ज्ञानही प्राप्त झालं नाही आणि मोक्ष तर फारच दूरची गोष्ट आहे. देहाला जरी लिंग असले तरी आत्म्याला लिंग नाही. त्यामुळे आत्म्याच्या पातळीवर स्त्री आणि पुरुष असा भेद करताच येत नाही. नेमकं तेच तू करतो आहेस तसंच ज्ञान प्राप्त करून पुरुषाला जसा मोक्षाचा मार्ग दिसू लागतो त्याचप्रमाणे स्त्रीला ज्ञान मिळविण्याचा आणि मोक्षाच्या मार्गानं प्रवास करण्याचा अधिकार आहे. कारण ज्ञान प्राप्ती आणि त्यातून मिळणारा मोक्ष हे आत्म्याच्या पातळीवर घडणार्या प्रक्रिया आहेत. त्या लिंगसापेक्ष नाहीत.

साध्वी सुलभाच्या या तर्कावर राजा धर्मध्वजाकडे काहीही उत्तर नव्हतं. त्यावर ती म्हणते, हा वादविवादही नाही आणि मी तुला त्यात पराभूतही केलं नाही. या सर्व संवादाचा उद्देश केवळ तथ्यांकडे तुझं लक्ष वेधून, तुझ्यात निर्माण झालेला अध्यात्म विषयक अहंकार दाखवून देणं आणि तो दूर होऊन तुझ्यातल्या आत्मतत्त्वाला मोक्षाची गती देणं हाच होता. हा सगळा संवाद अतिशय क्लिष्ट अशा बिंदूंना स्पर्श करतो. त्याचप्रमाणे भारतीय तत्त्वज्ञानाची प्रगल्भता आणि सखोलतेची झलकही देतो. एक परिव्राजक योगिनी ब्रह्मवादिनी थेट राजसभेत जाऊन राजाच्या आध्यात्मिक प्रगतीचा ठाव घेते. त्यात येऊ शकणारे अडथळे दूर करते आणि त्याला अधिकाधिक नम्र आणि सहनशील होण्याचा सल्ला देते, हा या भूमीचा विशेष गुण आहे, हे ध्यानात ठेवायला हवं. अन्यथा इतरत्र कोणत्याही भूमीवर सत्ताधीशांना शहाणपण न शिकवण्याचीच शिकवण दिली जाते. कारण 'सत्तेपुढे शहाणपण चालत नाही' अशीच ती प्रसिद्ध लोकोक्ती आहे.

साध्वी सुलभेचा राजा जनक धर्मध्वजाशी झालेला संवाद हा वाचत असताना का कोणास ठाऊक; पण संतश्रेष्ठ मुक्ताबाईंनी महान योगी चांगदेवांना पासष्ठ ओव्यांतून केलेल्या उपदेशाचीच आठवण येत होती. 'प्राचीन भारतात स्त्रियांचे स्थान' सारख्या विषयावर अद्वातद्वा लिहिणार्या स्वघोषित विद्वानांच्या सगळ्या प्रलापांना सुलभाही माहीत नसते आणि मुक्ताबाईही. त्यामुळे त्यांचा स्वार्थ साधणारी कथ्य प्रसृत करण्यात ते कोणतीही कसर बाकी ठेवत नाही. पण सुज्ञांना सुलभा मुक्ताबाई हा भारतीय स्त्रीशक्तीचा उत्कट आदर्श आहेत, हे आपण सनातनी भारतीयांनी लक्षात ठेवायला हवं. म्हणून महाज्ञानी, स्वतंत्र, ब्रह्मवादिनी, योगिनी तपस्वी सुलभेची ही आठवकथा!

बोली आणि संस्कृती
प्रा. अजय देशपांडे

# तुका म्हणे संत तुम्ही, बहु कृपावंत!



मराठी भाषेत 'संत' या शब्दाला सांस्कृतिक आणि सामाजिकदृष्ट्या मौलिक असा अर्थ आहे. महाराष्ट्रात संत हा शब्द ऋषी, मुनी, योगी, सिद्धपुरुष, बैरागी, संन्यासी, गोसावी, हरिदास, महंत, तीर्थंकर, फकीर, पीर, अवलिया, भीक्षू, बाबा, बुवा वा यांचेसह साध्वी, योगिनी, जोगीन यांच्याही संदर्भात प्रसंगपरत्वे सहज वापरला जातो. साधारणपणे बोलीतील संत या शब्दाला पर्यायी म्हणून वरील शब्द वापरताना काटेकोरपणे अर्थाचा विचार केला जात नाही.

संत हा शब्द प्राचीन काळापासून आजतागायत अत्यंत गंभीरपणे वापरला जातो. संत असणे म्हणजे जनकल्याणाची कृतिशील तळमळ अंगी बाळगणे आणि नीतिमान असणे होय. संतत्व ही फेसबुकसारख्या समाजमाध्यमांवर सतत स्वनामधन्य स्वसादरीकरण नव्हे. आणि मिरवण्याची गोष्टही नव्हे तर संतत्व हे जगण्याचे मूल्य होय. दयावंत, नीतिमान, बुद्धिमान असणे आणि जगाच्या कल्याणासाठी सतत अविरत प्रयत्न करीत राहणे म्हणजे संतत्व होय. संतत्व म्हणजे सज्जनपणाचे आदर्श रूप होय.

संत कबीर यांनी सज्जनाचे वर्णन करताना म्हटले आहे, 'सोना सज्जन साधुजन, टुटि जुरै सौबार' अनेकदा तुटूनही पुनः पुन्हा जुळण्याचे सामर्थ्य सोन्याच्या ठायी असते. सोने आगीत नष्ट होत नाही, जळून राख होत नाही तर ते उजळून निघते. सज्जनही तसाच असतो. कितीही आपत्ती आली तरी त्याचे मन स्थिर राहते. प्रत्येक आपत्तीने आयुष्य बेचिराख केले तरी संत सज्जनाचे मन राख होत नाही; उलट ते नव्या तेजाने उजळून निघते. तुटलेले मन आणि समाजमनही पुन्हा सांधण्याचे असाधारण कसब आणि सामर्थ्य संत सज्जनाचे ठायी असते. संत तुकारामांनी तर सज्जन माणसाच्या मनाची सुंदर व्याख्या केली आहे, 'मृदु सबाह्य नवनीत, तैसे सज्जनाचे चित्त' या ओळीत कबीरांना अपेक्षित असणारे संतपण सामावले आहे. 'आपण जेववुनि जेववी लोकां, संतर्पण करी तुका' या तुकारामाच्या शब्दांशी संत गाडगेबाबांच्या संतत्वाचे नाते आहे. संत दयावंत असतोच.

तुकारामांनी दयावंत असण्याचीही लक्षणे सांगितली आहेत. 'तुका म्हणे दयावंता, सदा चिंता दीनांची', संतत्वाचे नाते दीन दुबळ्यांशी आहे, माणसांच्या अश्रूंशी आहे. दीनदुबळ्या माणसांच्या डोळ्यांतले अश्रू पुसून त्यांच्या ओठावर हसू फुलवण्याचे कार्य म्हणजे संतत्व आणि सज्जनत्व होय. 'तुका म्हणे संत तुम्ही, बहु कृपावंत' असे म्हणणार्या तुकारामांनी संतांच्या समाजकार्याव अत्यंत नेमके वर्णन केले आहे-

'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति।
देह कष्टविती उपकारे।।
भूतांची दया हे भांडवल संता।
आपुली ममता नाही देही।
तुका म्हणे सुख पराविया सुखे।
अमृत हे मुखे स्त्रवतसे।।'

जगाच्या कल्याणाचा ध्यास बाळगून त्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत असते म्हणजे संतत्व. आपल्या सभोवताला विषयी कृपावंत असणे म्हणजे संतत्व. लोक संतांचा वाटेल तसा छळ करीत असतात, इतिहास आणि वर्तमानात या छळवादाचे पुरावे अनेक मिळतील. या छळवादाने संपून न जाता अभंग निष्ठेने कार्य करीत राहतो तो संत.

'हिरा ठेविता ऐरणी।
वांचे मारिता जो घणी।।
तोचि मोल पावे खरा।
करणीचा होय चुरा।
मोहरा होय तोच अंगे।
सूत न जळे ज्याचे संगे।।
तुका म्हणे तोचि संत।
सोसी जगाचे आघात।।'

समाजमनाने संतांना समजून न घेण्याचा इतिहास आहे. समाजाने छळ करायचा आणि संतांनी समाजाच्या हितासाठी प्राणपणाने प्रयत्न करीत राहायचे, हे अनेकदा घडले आहे. संत मुक्ताबाईने संतांच्या लोककल्याणकारी जगण्याचे सूत्र, संतांच्या व्यक्तिमत्त्वातील अभंग नैतिकतेचे मूल्य कसे असते, ते नेम सांगितले आहे.

'संत जेणे व्हावे। जग बोलणे सोसावे।। तरीच अंगी थोरपण। ज्या नाही अभिमान।।
थोरपण जेथे वसे। तेथे भूतदया असे।।
योगी पावन मनाचा। साहे अपराध जनाचा।।
विश्व झालिया वन्ही। संत सुखे व्हावे पाणी।।
शब्दशस्त्रे झाले क्लेश। संती मानावा उपदेश।।'

जगाचे सारे आघात सोसूनही जगाच्या कल्याणासाठीच अविरत प्रयत्न करीत राहणे म्हणजे संतत्व. सभोवतीचा समाज त्रास देत, छळ करीत असला तरीपण संत नैतिकता आणि सदाचार सोडत नाहीत; उलट सार्या छळवादाला आपल्या अभंग नैतिकतेने पराभूत करण्याचे सामर्थ्य संतांमध्येच असते. ज्याच्याठायी अवगुण शोधूनही सापडणार नाही तो संत.

'दीपा नाही पाठी पोटी अंधकार।
सर्वांगे साखर अवघी गोड।।
तुका म्हणे तैसे सज्जनापासून।
पाहता अवगुण मिळे चि ना।।'

दिव्याच्या उजेडाचे ठायी अंधार नसतो आणि साखर संपूर्ण गोडच असते. दिव्याच्या उजेडात अंधाराचे आणि साखरेच्या गोडपणात कडूपणाचे अस्तित्व असणारच नाही त्याप्रमाणे संतांच्या व्यक्तिमत्त्वात सारे सद्गुणच असतात तेथे अवगुणाचा लवलेशही नसतो. 'जे का रंजले गांजले त्यासि म्हणे जो आपुले तोचि साधू ओळखावा' या शब्दांत तुकारामांनी संतांची थोरवी गायली आहे. 'तुका म्हणे गुण चंदनाचे अंगी, तैसे तुम्ही जगी संतजन' असे संतत्व असते, हे सांगणाऱ्या तुकारामांचे 'तिर्थी धोंडापाणी, देव रोकडा सज्जनी' हे शब्दही आज समजून घेतले पाहिजेत. संत तुकारामांनी एका अभंगात कोण संत नसतात, तेही परखडपणे सांगितले आहे.

'नव्हती ते संत करिता कवित्व।
संताचे ते आप्त नव्हती संत।।'
येथे नाही वेश सरते आडनाव।
निवडे घावडाव व्हावा अंगी।।
नव्हती ते संत धरिता भोपळा।
करिता वाकळा प्रावरण।।
नव्हती ते संत करिता कीर्तन।
सांगता पुराणे नव्हती संत।।
नव्हती ते संत वेदाच्या पठणे।
कर्म आचरणे नव्हती संत।।
नव्हती संत करिता तप तीर्थाटणे।
सेविलिया वन नव्हती संत।।
नव्हती संत माळामुद्रांच्या भूषणे।
भस्म उधळणे नव्हती संत।।

(पान ६ वर)

उगवतीचे रंग
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

# मराठीचा घसरलेला टक्का !

परवा 'क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम' हा चित्रपट पाहिला. आजच्या गल्लाभरू चित्रपटांच्या दुनियेत एका वेगळ्या विषयावरचा हा चित्रपट पाहताना आनंद वाटला. मराठी शाळांची खालावत चाललेली धक्कादायक अवस्था आणि अस्तित्वाचा संघर्ष या चित्रपटाने अत्यंत ढळढळीतपणे समाजासमोर आणला आहे. हा चित्रपट पाहत असताना मला नुकताच काही दिवसांपूर्वी लागलेला इयत्ता दहावीचा निकाल आठवला. निकालानंतर वर्तमानपत्रात ठळक अक्षरांमध्ये एक मथळा (हेडलाईन) प्रसिद्ध झाला होता 'दहावीच्या परीक्षेत मराठी विषयात ९४,००० विद्यार्थी अनुत्तीर्ण!' आपल्याच मातृभाषेला दुय्यम स्थान दिल्यामुळे मुले चक्क मराठीत नापास झाली आहेत. ही संख्या थोडीथोडकी नाही.

मला सगळ्या विषयात चांगले मार्क आहेत पण फक्त मराठीत गेलो... दहावी उत्तीर्ण एका विद्यार्थ्याचे हे उद्गार! आम्हाला सगळ्या विषयात चांगले मार्क्स असले तरी आमच्या टॉप फाईव्ह मध्ये मराठी नसते. आमची उज्ज्वल यशाची परंपरा! आम्ही सर्व विषयांची उत्तम तयारी करून घेतो, असे मोठे मोठे बोर्ड लावणारे क्लासेस मराठी विषयाची तयारी करून घेताना कुठे जातात?

एका बाजूला मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला म्हणून आपण आनंदाने आणि अभिमानाने स्वतःची पाठ थोपटून घेत आहोत; अर्थात, यात वावगे काहीच नाही. पण खरंच माझी मराठी टिकावी, तिची समृद्धी आणखी वाढावी यासाठी आपण मुळापासून काही प्रयत्न करतो आहोत का? जेव्हा मुलांच्या मराठीतील नापासांचे हे धक्कादायक प्रमाण समोर येते, तेव्हा आपण क्षणभर गडबडतो, आपल्याला धक्काही बसतो. पण तो तेवढ्यापुरताच! या स्थितीला जबाबदार असलेला प्रत्येक घटक आपली जबाबदारी दुसऱ्यावर ढकलून मोकळा होतो. मुले म्हणतात, शाळेत मराठीचे तास नियमितपणे झालेच नाहीत. बऱ्याच वेळा मराठीचे तास दुसऱ्या विषयाला वापरले जातात. मराठी काय घरीही अभ्यासता येईल. अशी मानसिकता निर्माण केली जाते. दहावीचे शिक्षक म्हणतात, मुले आमच्याकडे येताना खालूनच कच्ची आली. प्रत्येकजण अशा सबबी देऊन आपली जबाबदारी दुसऱ्यावर ढकलून मोकळा होत असतो. पण या विषयावर आपण कधी मुळापासून यावर विचार करणार आहोत की नाही?

'असर'चा मागील एक अहवाल सांगतो की, जी मुले दहावीत होती, त्यांना इयत्ता तिसरीत असताना पहिलीचे मराठी धडे वाचता येत नव्हते; तर आठवीत असताना दुसरीच्या स्तरावरील उतारा वाचता येत नव्हता. आज इतक्या वर्षांनंतरही या परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही. आपल्या मुलांचे मार्कांचे एकूण टक्के वाढले असतीलही, पण ज्ञानाचा आणि मराठीचा खरा टक्का मात्र घसरला आहे. मराठी साहित्य संमेलनांचे भव्य आयोजन करणे, पुस्तक प्रदर्शने भरवणे किंवा



दुकानाच्या पाट्या मराठीत लिहायला लावणे या गोष्टी भाषेच्या प्रसारासाठी उपयुक्त असतीलही; पण जोपर्यंत आपण मूळ आजारावर उपाय करत नाही, तोपर्यंत ही परिस्थिती सुधारणार नाही. ज्यांनी 'शांतिनिकेतन'ची स्थापना केली, ते गुरुदेव रवींद्रनाथ टागोर बंगाली भाषेबाबत कमालीचे आग्रही होते. त्या काळात बंगालमधील सरकारी नोकरदार आणि मध्यमवर्गीय लोक आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत घालण्यात आणि इंग्रजी बोलण्यात धन्यता मानत होते. अशा विपरीत परिस्थितीत गुरुदेवांनी मातृभाषेतील शिक्षण हेच सर्वात उत्तम शिक्षण असल्याचा उद्घोष केला. केवळ बोलून न थांबता त्यांनी शांतिनिकेतनमध्ये केवळ बंगालीतूनच शिक्षण देण्यास सुरुवात केली आणि पाठ्यपुस्तकेही बंगालीत तयार केली. 'आमार जीवन, आमार बानी' (माझे जीवन, हीच माझी वाणी) हे त्यांचे घोषवाक्य होते. आम्ही मात्र आज स्वातंत्र्याला ऐंशी वर्षे होत आली, तरी इंग्रजी भाषेचे गोडवे गाण्यातच मग्न आहोत.

एकदा एका विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाला रवींद्रनाथांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते. त्या काळी असे समारंभ आणि त्यातील भाषणे केवळ इंग्रजीतूनच होत असत (जी आजही होतात). उपस्थितांचीही तीच अपेक्षा होती; पण गुरुदेवांनी तो सगळा इंग्रजी राजशिष्टाचार (प्रोटोकॉल) धुडकावून लावला आणि थेट बंगालीत भाषण करून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. आपल्या भाषेचा असा अभिमान आपल्यात कधी जागी होणार?

आपले सरकार इंग्रजी शाळांना धडाधड परवानग्या देत आहे आणि दुसरीकडे मराठी शाळांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. मराठी शाळांचा दर्जा खालावला आहे असा बागुलबुवा उभा करून पालकांनी आपल्या मुलांना मराठी शाळांमध्ये पाठवणे बंद केले. परिणामी, 'विद्यार्थी नाहीत' हे कारण पुढे करून शासनाने शाळा बंद करण्याचा सपाटा लावला आहे. ज्या काही शाळा आज कशाबशा सुरू आहेत, त्यांची अवस्था केविलवाणी आहे; कुठे छप्पर गळतेय, तर कुठे पुरेसे शिक्षक नाहीत.

'क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम' या चित्रपटात हेच विदारक वास्तव अचूक मांडले आहे. विद्यार्थीसंख्या कमी झाली म्हणून शासनाकडून शाळा बंद होण्याची टांगती तलवार जेव्हा मानेवर येते, तेव्हा त्या शाळेचे मुख्याध्यापक दिनकर शिर्के (सचिन खेडेकर) शाळा वाचवण्यासाठी माजी विद्यार्थ्यांना हाक मारतात. हा चित्रपट आपल्याला एक मोठा धडा देतो. सरकार शाळा बंद पाडत असले आणि समाज उदासीन असला, तरी ज्या शाळेने आपल्याला घडवले, तिच्या पडत्या काळात तिच्या पाठीशी उभे राहणे ही प्रत्येक माजी विद्यार्थ्याची आणि समाजाची नैतिक जबाबदारी आहे. हे दुष्टचक्र मोडून काढण्यासाठी समाज, शिक्षक, पालक, माजी विद्यार्थी आणि शासन या सर्वांनी आता एकत्र यायलाच हवे.

'मी मराठी, माझी शाळा मराठी' हे आता केवळ वाक्य न राहता आपले ब्रीदवाक्य व्हायला हवे. आमचा इंग्रजीला अजिबात विरोध नाही, ती काळाची गरज म्हणून महत्त्वाची भाषा आहेच आणि ती पुढेही शिकता येते. पण ज्या गोष्टी मातृभाषेतून आमचे मूल सहजपणे आणि आत्मविश्वासाने शिकू शकते, त्या गोष्टी सुरुवातीलाच परक्या भाषेतून लादून त्याच्यावर ताण का आणायचा? मराठी शाळांमधून केवळ कोरडे शिक्षण दिले जात नाही, तर आपली संस्कृती, शिष्टाचार आणि उत्तम संस्कार तिथे जोपासले जातात. जर आपल्याला आपली संस्कृती टिकवायची असेल आणि मुलांवर सुसंस्कार हवे असतील, तर मराठी शाळा आणि मराठी माध्यम अपरिहार्य आहे.

मुलांना मराठीची खरी गोडी शालेय स्तरापासूनच लागली पाहिजे; ती केवळ 'एक परीक्षा' म्हणून अभ्यासली जाऊ नये. ही गोडी निर्माण करण्याची जबाबदारी शिक्षक, पालक आणि संपूर्ण समाजाने उचलली पाहिजे. मुलांच्या पाठ्यपुस्तकातील धडे, कविता त्यांना मराठीची गोडी निर्माण होईल अशा असाव्यात.

(पान ६ वर)

# ग्रहसंकेत

(रविवार, १२ जुलै ते शनिवार, १८ जुलै २०२६)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार
'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो. कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र.९४२३७५८४०१)

✻ **रविवार, १२ जुलै-** शिवरात्री, प्रदोष, गोदावरीदास महाराज पुण्यतिथी कवठेमहांकाळ, बाबामहाराज बसनगौंड पुण्यतिथी दगवाड ✻ **सोमवार, १३ जुलै-** वीर शिवा काशीदं पुण्यदिन, सोमवती अमावास्या सायं. ६.५० नंतर ✻ **मंगळवार, १४ जुलै-** दर्शअमावास्या दु.३.१३ पर्यंत, गोपाळ गणेश आगरकर जयंती, जोगिण्योत्सव आष्टा (जि. सांगली), वीरभद्र रथोत्सव मिरज, अन्वाधान, अमावस्या प्रतिपदा श्राद्ध, चौडेश्वरी उत्सव पेठवडगाव ✻ **बुधवार, १५ जुलै-** चंद्रदर्शन (२०:२७ पर्यंत), श्री टेंबेस्वामी पुण्यतिथी, महाकवी कालिदास दिन, महादेव यात्रा रावळगोंडवाडी (ता.जत), आषाढ मासारंभ ✻ **गुरुवार, १६ जुलै-** श्री जगन्नाथ रथयात्रा पुरी, रवि कर्कत, गुरुवर्य मामा देशपांडे जयंती पुणे, धोंडीरामजी महाराज पुण्यतिथी मुकुंदवाडी ✻ **शुक्रवार, १७ जुलै-** विनायक चतुर्थी, गुरु लोप, अण्णाबुवा महाराज पुण्यतिथी मिरज, करिदिन ✻ **शनिवार, १८ जुलै-** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुण्यदिन, संत हरिहरबाबा पुण्यतिथी पंढरपूर, नाथभुजंग महाराज पुण्यतिथी परंडा (जि.धाराशिव), स्कंद पंचमी.

**मुहूर्त:-** ✻ **डोहाळ जेवण** - १५ जुलै ✻ **बारसे-** १५ जुलै (१२ नंतर) ✻ **जावळ-** १५ जुलै ✻ **गृहप्रवेश-** १५ जुलै

### मेष :- वाद टाळावेत

सोमवारी पराक्रमस्थानी होणारी रवि बुधाची युती अंगीकृत कार्यात मनासारखी प्रगती करणारी आहे. आर्थिक समस्या वाटली तरी वेळीच मार्गही निघत जाईल. गुंतवणूक विचारपूर्वक करावी. अनावश्यक खर्च टाळणं महत्त्वाचे, अनावश्यक खर्च टाळणे म्हणजेच बचत करणे होय. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. स्थावर बाबतीत सौख्य लाभेल. वाद टाळावेत. शुभ ता. १५, १८

### वृषभ:- नव्या विचारांना चालना

धनस्थानी रवि बुधाची युती होत आहे. त्यामुळे सरकारी कामे होतील. विनाकारण फार धावपळ, दगदग करू नका. कौटुंबिक जीवनात सामंजस्याची भूमिका ठेवावी. गृहनिर्माण, विधी, गुढ विद्येत प्रगती होईल. भावंडाबाबत सौख्याच्या घटना घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. सर्व बाबतीत विचाराने रहावे. कलागुणांचा विकास होईल. अडचणी सुटत जातील. शुभ ता. १६, १८

### मिथुन:- प्रगती साधता येईल

सोमवारी राशीतच रवि बुधाची युती होत आहे. अंगीकृत कार्यात मनासारखी प्रगती साधता येईल. आर्थिक चिंता राहिली, तरी समस्यातून वेळीच मार्ग निघत जाईल. ज्ञानदान, बँक, विमा, प्रशासन अशा क्षेत्रात असणार्यांना विशेष अनुकूलता राहील. कार्यक्षेत्रात चिकाटीने राहावे. प्रगती साधता येईल. कलेतून अर्थाजन घडेल. संततिशी मतभेदाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. १६, १८

### कर्क:- अडचणी कमी होतील

राशीतील गुरुच्या जोडीला रविही येत आहे. त्यामुळे आत्मविश्वासाने चांगली वाटचाल करू शकाल. आर्थिक बाबतीत विचाराने रहावे. वैद्यकीय, फार्मसी, मेकॅनिकल अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती होत जाईल. नव्या संधीचे स्वागत करावे. दूरच्या प्रवासाचे योग येतील. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील.. शुभ ता. १५, १८

### सिंह:- उत्साहवर्धक घटना

लाभस्थानात रवि- बुधाची युती होत आहे. सरकारी नोकरीत पदोन्नतीचे मार्ग लाभतील. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. कार्यक्षेत्रात उत्साहवर्धक घटना घडतील. नव्या संधीचे स्वागत करावे. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. समस्यातून मार्ग निघेल. अपेक्षित कामे होतील. संततीची प्रगती मनासारखी होईल. शुभ ता. १५, १८

### कन्या:- सुसंधी लाभतील

कर्म स्थानात सोमवारी रवि बुधाची युती होत आहे. त्यामुळे नोकरी व्यवसायात मनासारख्या घटना घडतील. आर्थिक उन्नतीचे मार्ग लाभल्याने समाधान वाटेल. विवाह विषयक कार्याला विलंब होईल. आहार, विहाराकडे दुर्लक्ष करू नका. अडचणीतून मार्ग निघत जाईल. स्पर्धांमध्ये भाग घ्यावा, यश मिळेल. सुसंधी लाभतील. शुभ ता. १६, १८

### तुला:- चिंता करू नका

भाग्यस्थानी रवि- बुधाची युती होत आहे. कर्मस्थ उच्च राशीतील गुरु मनासारखी प्रगती करणारा आहे. शारीरिक तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. कलागुणांचा गौरव होईल. दूरचे प्रवास व्यर्ज करावेत. अडचणी आल्या तरी चिंता करू नका. मार्गही निघत जाईल. सर्व प्रतिकूलतेवर मात कराल. जीवनसाथीदाराच्या प्रकृतीसाठी खर्च करावा लागेल. शुभ ता. १६, १८

### वृश्चिक:- सामंजस्याने रहावे

सप्ताह पूर्वार्ध थोडा प्रतिकूल वाटला तरी उत्तरार्धापासून सर्व काही मनासारखे घडत जाईल. सप्ताहातील मंगळ, हर्षल कौटुंबिक जीवनात भागीदारीच्या व्यवसायात समस्या वाढविणारे आहेत. सामंजस्याने रहावे. आर्थिक प्रगती चिकाटीने होईल. नव्या संधी विचारपूर्वक स्वीकाराव्यात. कलागुणांचा विकास होईल. स्थावर प्रश्न रेंगाळतील. शुभ ता. १६, १८

### धनु:- सौख्याच्या घटना

सप्तमात रवि- बुधाची युती होत आहे. त्यामुळे कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. नव्या विचारांना विचारपूर्वक चालना द्यावी. जुने येणे वूसल करून घ्यावे. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष होऊ देऊ नका. स्थावर प्रश्न सध्या लांबणीवर टाकावेत. सध्या सुटणार नाहीत. तिखट, तामसी पदार्थ जास्त खाऊ नका. त्रास संभवतो. शुभ ता. १५, १६

### मकर:- मनासारखी प्रगती

षष्ठात होणारी रवि- बुधाची युती कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती करणारी आहे. कौटुंबिक जीवनात शुभ घटना घडतील. नव्या कामांना गती देता येईल. संततीच्या हितसंबंधाकडे दुर्लक्ष करू नका. अपेक्षित घटना घडल्याने समाधान वाटेल. प्राप्तीचे प्रमाण परिश्रमानेच वाढणार आहे. चिंता कमी झाल्याने समाधान वाढेल. शुभ ता. १५, १६

### कुंभ:- वितंडवाद टाळावा

सोमवारी पंचमात रवि- बुधाची युती होत आहे. त्यामुळे आर्थिक समाधानकारक घटना घडतील. घरातील वातावरण शांततेचे ठेवण्याचा प्रयत्न करावा. विनाकारण वितंडवाद टाळायला हवा. शेजार्यांशी वादाचे प्रसंग टाळावेत. मानसिक त्रास संभवतो. स्पर्धांमध्ये यश मिळेल. नवीन गुंतवणूक विचाराने करावी. विलंबाने प्रगती. शुभ ता. १५, १८

### मीन:- स्पर्धांमध्ये यश

सोमवारी सुखस्थानी रवि- बुधाची युती होत आहे. एखादे काममनासारखे झाल्याने समाधान वाटेल. उत्साहवर्धक घटना घडतील. स्पर्धांमध्ये यश मिळवू शकाल. अपेक्षित संधी चालून येतील. लाभ उठवावा. उत्तरार्धात अपेक्षित कामे होतील. चिंता नको. वित्तीय संस्था, प्रशासकीय क्षेत्रात अनुकूलता वाढेल. शुभ ता. २३, २४

!! शुभ भवतु !!

पान २ वरून

## प्रतिरोधाचे पुनर्लेखन

**बदलते भू-राजकारण आणि भारताचा मार्ग**

भारतासमोरील सुरक्षा आव्हाने अलीकडे अधिकच गुंतागुंतीची होत चालली आहेत. बांगलादेश पाकिस्तानची जवळीक, नेपाळचे चीनकडे झुकणे, चीनच्या मदतीने विकसित होणारा पाकिस्तानचा अंतराळ आणि चीन- रशिया भागीदारी ही सर्व भारतासाठीची दीर्घकालीन आव्हाने ठरणार आहेत. तर दुसरीकडे अमेरिका चीनच्या प्रभावाला रोखण्यासाठी 'क्वाड' च्या माध्यमातून भाताशी सहकार्य वाढवत आहे. या बदलत्या वातावरणात भारतासाठी सर्वांत योग्य मार्ग म्हणजे सतत सज्ज राहणे, आत्मसंरक्षणात वृद्धी करणे आणि प्रतिरोध क्षमता टिकवून ठेवणे.

**निष्कर्ष:** 'सिप्री'च्या ताज्या अहवालातून स्पष्ट होते की, भारताच्या अणू धोरणामध्ये एक ऐतिहासिक परिवर्तन घडते आहे. 'साठा' असलेल्या अण्वस्त्रांपासून 'सक्रिय तैनाती' पर्यंतचा हा प्रवास, भारताच्या बदलत्या सुरक्षा गरजांचे प्रतिबिंब आहे. वाढत्या चिनी अणू क्षमतेला, पाकिस्तानच्या अणू धमक्यांना आणि बदलत्या जागतिक भू-राजकीय समीकरणांना उत्तर म्हणून, भारतही त्याची अणुसज्जता अधिक सक्षमकरत आहे. विश्वासार्ह 'सेकंड स्ट्राईक' क्षमता, वाढता अणुसाठा आणि सक्रिय सज्जतेतून भारताने हे स्पष्ट केले की, कोणत्याही शत्रूने भारतावर अण्वस्त्र हल्ला केल्यास, त्याला विनाशकारी परिणामांना सामोरे जावे लागेल. अखेरीस, सामर्थ्य आणि जबाबदार अणुशक्ती या दोन्हींचा समतोल राखणे, हेच भारताच्या दीर्घकालीन राष्ट्रीय सुरक्षेचे मुख्य सूत्र राहणार आहे.

पान २ वरून


## दुहेरी संघर्षाचं अदृश्य वास्तव

'मी रडलो तर आईला त्रास होईल', 'मी हट्ट केला तर बाबांना वाईट वाटेल' अशा विचारांमुळे अनेक मुलं स्वतःच्या भावनांनाच दाबून टाकतात. सामाजिक पातळीवरही या मुलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. दिव्यांग पालक म्हणजे अक्षम पालक नव्हेत. अपंगत्व म्हणजे पालकत्वाची क्षमता संपली असा अर्थ नाही. लाखो दिव्यांग पालक अत्यंत प्रेमाने, जबाबदारीने आणि जिद्दीने आपल्या मुलांचं संगोपन करीत आहेत. अनेक मुलांसाठी त्यांच्या आई- वडिलांचा संघर्ष हा प्रेरणेचा स्रोत असतो. समस्या अपंगत्वात नाही; समस्या त्या व्यक्तीभोवती उभ्या राहणाऱ्या सामाजिक आणि प्रशासकीय अडथळ्यांमध्ये आहे. आपल्या देशात दिव्यांग व्यक्तींसाठी अनेक योजना अस्तित्वात आहेत. दिव्यांग हक्क कायदा, पेन्शन योजना, शिष्यवृत्ती, सहायक उपकरणं, कौशल्य विकास कार्यक्रम यांसारख्या सुविधा उपलब्ध आहेत. मात्र, कुटुंबातील मुलांच्या गरजांकडे स्वतंत्रपणे पाहणारी व्यवस्था अद्याप मर्यादित आहे.

आज आपण 'समावेशक विकास' आणि 'सर्वांसाठी समान संधी' यांविषयी बोलतो. पण जर लाखो मुलांना लहान वयातच स्वतःच्या स्वप्नांपेक्षा परिस्थितीच्या ओझ्याला प्राधान्य द्यावं लागत असेल, तर विकासाच्या आपल्या संकल्पनेत काहीतरी अपूर्ण राहिलं आहे. एखाद्या समाजाची संवेदनशीलता ही तो आपल्या सर्वात दुर्बल व्यक्तींशी कसा वागतो यावर मोजली जाते आणि त्या मोजपट्टीवर पाहिलं, तर अपंग पालकांची मुलं ही केवळ एका कुटुंबाची जबाबदारी नसून आपल्या सामूहिक सामाजिक उत्तरदायित्वाची खरी कसोटी आहेत. कारण काही मुलं स्वतःचं बालपण जगण्यापूर्वीच दुसऱ्यांच्या आयुष्याचा आधार बनतात आणि जेव्हा लहान खांद्यांवर दोन आयुष्यांचं ओझं येतं, तेव्हा प्रश्न केवळ अपंगत्वाचा राहत नाही तर तो बालपणाच्या हक्काचा बनतो.

## गीतेतील कर्मविचार

तत्वदर्शन **डॉ. राजेंद्र डोळके**



गीतेच्या निर्मितीची पृष्ठभूमी ही विलक्षण काव्यमय आहे. सर्वसाधारणपणे कुठल्याही तत्त्वज्ञानपर ग्रंथाची निर्मिती ही एकांतात होत असते. परंतु या ग्रंथाची निर्मिती रणांगणावर युद्ध सुरू होण्याच्या ऐनवेळीस झाली आहे. अर्थात या ग्रंथाचे स्वरूप एकाने दुसऱ्यास रणांगणावर सांगितलेले तत्त्वज्ञान असे आहे. त्यामुळे असा तत्त्वज्ञानात्मक ग्रंथ निर्माण करण्याची आणि त्याची चर्चा करण्याची मानसिक स्थिती या दोघांची असेल काय? आणि हा जो चर्चा करण्यासाठी प्रचंड वेळ लागला तेवढा वेळ दोन्हीकडली सैन्ये ताटकळत कशी काय बसली असेल, अशी व्यावहारिक शंका अनेकांच्या मनात उपस्थित होणे शक्य आहे.

शिवाय दुसरी गोष्ट अशी की, युद्धभूमीवर सांगितलेल्या तत्त्वज्ञानात युद्ध कसे करावे म्हणजेच युद्धशास्त्रावर चर्चा यावयास हवी होती; पण येथे तसे नसून त्यात ब्रह्म, आत्मा, जीव, सृष्टी इत्यादी गहन विषयांवर विवेचन आले आहे. त्यामुळे हीही एक फार मोठी विसंगती लोकांस वाटणे साहजिक आहे. परंतु सूक्ष्मपणे पाहता वरील दोन्ही शंकेत काहीही विसंगती नसून सुसंगतीच आहे, असे आपल्या लक्षात येते. कारण मनुष्याच्या मनात युद्ध हे रात्रंदिवस चालू असते. रणांगणावरील युद्ध हे भौतिक, युद्धभूमीवर आणि कधीकधी खेळले जाणारे असते. म्हणून रणांगणावरील युद्धाच्या निमित्ताने श्रीकृष्णाने व्यक्तीच्या मनात चाललेल्या युद्धाची ओळख म्हणजेच आत्म्याची ओळख अर्जुनाला रणांगणावर करून देणे हे पूर्णपणे सुसंगत आहे आणि अर्जुनाला स्वधर्माची म्हणजेच क्षात्र धर्माची आठवण देऊन आत्म्याच्या अमरत्वाचा बोध करून देणे म्हणजेच आत्मज्ञानसंपन्न करणे हेही युद्ध ह्या विषयाशी पूर्णपणे सुसंगत आहे. एकदा मन युद्धाला तयार झाले की मग भौतिक युद्ध खेळणे हे त्याच्यासाठी सोपे असते.

भगवद्गीतेत ज्ञान, भक्ती, योग, कर्म वगैरेंवर विवेचन आलेले असले, तरी विशेष महत्त्व कर्मयोगाला दिलेले आहे. सुरुवातीपासून शेवटपर्यंत गीतेत कर्म हे कुठे कुठे डोकावतेच. कर्म हा शब्द 'कृ' धातूपासून (मूळ शब्द कर्मन्) तयार झाला आहे. या धातूचे अनेक अर्थ दिले आहेत. काम, कृत्य, क्रिया, उद्योगधंदा, नशीब, परिश्रम, धडपड वगैरे. या सर्व शब्दांसाठी एकच शब्द किंवा अर्थ सांगता येईल, तो म्हणजे 'काहीतरी करणे'. म्हणजेच स्वस्थ न बसणे. मनुष्य काही ना काहीतरी (हालचाल) केल्याशिवाय क्षणभरदेखील राहू शकत नाही. काहीही न करता केवळ बसून राहणे हे देखील एक कर्मच आहे. कारण त्यावेळी त्याचे चिंतन, ध्यान, योग, एखाद्या विषयाचा विचार चालू असतो. फक्त हे कर्म शारीरिक नसून मानसिक असते.

झोप हेही एक कर्मच आहे. दिवसभर श्रम केल्यानंतर मनुष्याला रात्री झोपेची नितांत आवश्यकता असते. त्यामुळे निद्रेत मन आणि शरीर यांद्वारा कोणतेही क्रिया चालू नसताना निद्रा हेही एक आवश्यक कर्म ठरते. एकंदरीत मनुष्य आपले कर्म सोबत घेऊनच जन्माला येतो आणि मरेपर्यंत प्रत्येक क्षणी त्याला ते सोबत करीत असते. गीतेत तिसऱ्या अध्यायात- 'कर्मावीण कधी कोणी न राहे क्षण मात्र ही प्रकृतीच्या गुणी सारे बांधिले करितात ची। (गीताई- विनोबा, ३-५) असे म्हटले आहे. याचा अर्थ 'कोणी झाला तरी कर्म केल्यावाचून क्षणभर केव्हाही राहात नाही. प्रकृतीचे गुण परतंत्र झालेल्या प्रत्येकास कर्म करण्यास लावीत असतात. त्याचप्रमाणे १८ व्या अध्यायात 'अशक्य देहवंतास सर्वथा कर्म सोडणे (११)' असे म्हटले आहे.

एकंदरीत जिवंत देहाचा कर्म हा स्वभाव आहे. श्वासोच्छवास, नेत्रांची उघडझाप, आहारविहार इ. कर्मे कोणत्याही देहधाऱ्याला टळत नाहीत. देहधारणार्थ विविध कर्मे करावीच लागतात. ज्ञानेश्वरांनी आपल्या टीकेत अनेक समर्पक दृष्टांतांच्या सहाय्याने हा अर्थ अधिक स्पष्ट करून दाखविला आहे. इतकेच नव्हे तर आग्रहपूर्वक प्रतिपादिला आहे. ते म्हणतात-

'परि त्याजिता कर्म न त्यजे। निभ्रांत मानी (३-५२)
जंव प्रकृतीचे अधिष्ठान। तंव सांडी मांडी हे अज्ञानचे
चेष्टा ते गुणाधीन। आपैसी असे' (३-५३)

ज्ञानेश्वर विचारतात, विहित कर्माचा त्याग केला तरी इंद्रियांचे स्वभाव नाहीसे होतात काय? श्रवणांचे ऐकणे, डोळ्यांचे पाहणे, चरणांचे चालणे थांबते काय? क्षुधातृषा यांची पीडा नाहीशी होते काय? श्वासोच्छवास थांबतात की जन्ममृत्यू चुकतात? हे सर्वही कर्मच होय. म्हणून देहवंताला कर्म सहज आहे. त्याचा त्याग शक्य नाही. जी गोष्ट बाह्य असते, संपादित असते. तिचा त्याग शक्य असतो, पण जी अंगभूत असते, सहज असते ती कशी टाकता येणार? तात्पर्य देहाच्या रूपाने कर्मच उभे आहे. तेव्हा देह असेपर्यंत देहवंताला कर्माचा त्याग शक्य नाही. अंगभूत कर्मे केली नाहीत तर जीवन अशक्य आहे.

कर्माचे अनेक प्रकार सांगितले आहेत. नित्य, नैमित्तिक, काम्य, निषिद्ध वगैरे. नित्य कर्मे म्हणजे दैनंदिन आचरावयाची कर्मे होत. उदा. प्रातः स्नान, देवांची व पितरांची पूजा, संध्यावंदन, ईश्वरप्रार्थना वगैरे. आश्रम भेदाप्रमाणे काही नित्य कर्मे भिन्न असतात. अग्निहोम, गुरूंचे अभिवादन इ. ब्रह्मचर्यांचे नित्य धर्म होत. वैश्वदेव, पितृतर्पण, अन्नदान वगैरे गृहस्थाश्रमाची नित्यकर्मे होत. नैमित्तिक कर्मे ही विशिष्ट निमित्त झाले असता करावयाची असतात.

उदा. विवाहयोग्य वय होणे हे निमित्त; शिक्षणास योग्य वय होणे हे निमित्त; नातलगांपैकी कोणी मृत झाल्यावर वर्षांनी आलेली मरणतिथी हे निमित्त; अशा या निमित्तांची प्राप्ती झाली असता विवाह, उपनयन व श्राद्ध करणे प्राप्त होते. ही नैमित्तिक कर्मे होत. सगळे संस्कार ही नैमित्तिक कर्मे होत. निरनिराळी व्रते प्रतिवर्षी त्या त्या देवतांच्या निमित्ताने विहित तिथीस करावी लागतात. यादृष्टीने सर्व सण व उत्सव ही नैमित्तिक कर्मे होत.

यानंतरची कर्मे म्हणजे काम्य कर्मे. काम्य कर्मे म्हणजे पुत्रप्राप्ती, धनप्राप्ती, रोग निवारण, विविध प्रकारच्या फफलांच्या कामनेने प्रेरित होऊन संकल्पपूर्वक केलेली व्रते, होम, यज्ञ, पूजा, तीर्थयात्रा ही कर्मे होत. निषिद्ध कर्मे म्हणजे धर्मशास्त्र जी कर्मे करू नये असे सांगतात ती. परंतु पाप-पुण्य याचा विचार न करता, कर्म चांगले की वाईट हे परिणामावरून न ठरता कर्त्याची वासनात्मक बुद्धी शुद्ध की अशुद्ध यावरून ठरते, असे गीता म्हणते.

'समत्व बुद्धी ही थोर कर्म तीहूनी हीन चि
बुद्धीचा आसरा घे तू मागती फळ दिन ते' (२-४९)

कर्माहून समत्वबुद्धी ही थोर असते. म्हणून कर्म सोडून बुद्धीचा आश्रय घ्यावा, असे या श्लोकात सांगितले आहे. कार्याकार्याचा निर्णय करणारी व्यवसायात्मक बुद्धी स्थिर नसेल तर मनुष्य नाना प्रकारच्या वासनांनी (इच्छांनी) व्यग्र होऊन जातो.

पान ३ वरून

## यी जिंग: एक दुर्लक्षित मुसाफिर

अजिंठा- वेरूळ आणि नालंदाच्या कोरीव शिल्पकामात साम्य होते का, याचा अभ्यास झाला पाहिजे. यी जंगच्या आत्तापर्यंतच्या प्रवासात अनेक ग्रंथ गोळा झाले होते. त्यांची भाषांतरे त्याला करायची होती. त्यामुळे श्रीभोजमध्येच (सुमात्रा) तो राहिला. येथील भोज नदीच्या मुखाजवळ एक व्यापारी गलबत उभे होते. यी जंग कागद आणि शाईच्या वड्या घेण्यासाठी जहाजावर चढला. चढल्या क्षणीच खलाश्यांनी शिडे उभारून गलबताला हाकारले. त्यांना त्या क्षणी वारा अनुकूल झाला होता. यी कॅन्टन बंदरात पोहोचला. सुमात्रामध्ये ठेवलेले मौल्यवान ग्रंथ परत आणायला पाहिजे होतेच; आता तो थकला होता. कॅन्टन बंदरातील गावकऱ्यांनी त्याला मदत केली आणि चेन-कू या तरुण सहायकाबरोबर तो पुन्हा सुमात्राला गेला. तेथे ते दोन महान ग्रंथ लिहिले आणि चीनला पाठविले. त्याचे उर्वरित आयुष्य त्याने चीनमध्ये धर्मग्रंथांचे भाषांतर करण्यातच घालवले.

पान ३ वरून

## पंगुं लंघयते गिरिम्

दिवसभराच्या धावपळीमुळे थकवा येऊन ती मांडवाच्या एका टोकाला एकटीच खुर्चीवर बसली. मंडपाच्या बाहेर पडताना माझे तिच्याकडे लक्ष गेले. पाहतो तर काय ? आरती मान खाली घालून रडत होती. दिवसभर तिने रोखून ठेवलेला मनाच्या वेदनेचा बांध फुटला होता. तिला रडताना बघून आम्ही काही जण आणि तिची एक मावशी तिच्याजवळ पोहोचलो. मावशीने तिला जवळ घेतले. आरती मोठ्याने रडायला लागली. बहुदा तिला मोठ्याने ओरडायचे होते. पायाने अपंग असूनही हा भावनांचा डोंगर तिने मोठ्या धिराने चढून पार केला होता. पाहुण्यांसमोर तिने अजिबात जाणवू दिले नाही; आता मात्र ती कोसळली होती. बहुदा देवाचा आणि तिला सहानुभूती दाखविणार्यांचा तिला राग आला होता. त्या सगळ्या रागाला तिने अश्रूंद्वारे वाट मोकळी करून दिली. सर्वांना वाटत होते की, अबोलीच्या लग्न होऊन जाण्यामुळे किंवा पायाच्या वेदनेमुळे ती इतकी रडते आहे. तिच्या रडण्याचा खरा अर्थ कुणालाच कळला नव्हता.

पान ५ वरून

## मराठीचा घसरलेला टक्का!

घरातही मराठी पुस्तके, वर्तमानपत्रे यावीत. पालकांनी देखील मुलांसमोर दर्जेदार अशी मराठी पुस्तके स्वतः वाचावीत. सुरुवात नेहमी स्वतः पासून करावी लागते. नुसते वाचन करा म्हणून सांगितले तर मुले ऐकणार नाहीत. यासोबतच, भविष्यातील स्पर्धा परीक्षांमध्ये आणि नोकऱ्यांमध्येही मराठीला मानाचे व अनिवार्य स्थान मिळाले पाहिजे. मराठी शिकल्याशिवाय आपल्याला पर्याय नाही हे जेव्हा मुलांच्या आणि पालकांच्या लक्षात येईल, तेव्हाच मराठीच्या अभ्यासाला खऱ्या अर्थाने प्राधान्य मिळेल.

आपल्याला केवळ गणित, विज्ञान, इतिहास किंवा भूगोल येऊन उपयोग नाही; आपल्याला आपली मातृभाषाही उत्तम लिहिता, बोलता आणि वाचता आली पाहिजे. माझा मराठाचि बोलू कौतुके। परी अमृततेही पैजा जिंके। या माउलींच्या उद्गाराची अनुभूती आमची मुले केव्हा घेणार? जेव्हा त्यांना मराठी भाषेत खरोखर रस वाटू लागेल तेव्हाच ना! आणि याच मराठी मातीतून उद्याचे उत्तम साहित्यिक, वक्ते, शास्त्रज्ञ आणि समाजाला दिशा देणारे समाजसेवक निर्माण होतील. तेव्हाच आपण खऱ्या अर्थाने आणि गर्वाने म्हणू शकू...

पान ५ वरून

## तुका म्हणे संत तुम्ही बहु कृपावंत!

तुका म्हणे नाही निरसला देहे। तो अवघे हे संसारिक।।

संतत्वाचे मूल्य समजून घेतले की संतत्वाची बुंथी घालून असलेले असंत प्रवृत्तीचे लोकही लक्षात येतात. खरा संत कसा असतो? ज्याने क्रोध अभिमान पावटणी केला आहे, जो वर्णाभिमान याती विसरला आहे तो खरा संत होय.

'जे का रंजले गांजले। त्यासि म्हणे जो आपुले।।
तोचि साधु ओळखावा। देव तेथे चि जाणावा।।
मृदु सबाह्य नवनीत। तैसे सज्जनाचे चित्त।।
ज्यासि आपंगिता नाही। त्यासि धरी जो हृदयी।।
दया करणे जे पुत्रासी। ते चि दासा आणि दासी।।
म्हणे सांगू तो चि भगवंताची मूर्ती।।

संत म्हणजे नीतिमत्तेचा, सदाचाराचा, मानवतेचा, बंधुभावाचा, समतेचा अक्षय प्रकाश होय.

'अवघे जन मज झाले लोकपाळ
सोईरे सकळ प्राणसखे'

ही विश्वबंधुत्वाची भावना मनात व कृतीत निरंतर तेवत असणे म्हणजे संत असणे होय. उद्याच्या सुंदर दिवसासाठी संतांचे शब्द विधायक विचार आणि कृतीची ऊर्जा देतच राहणार आहेत.

वर्तमानकाळात काही नाठाळ व असंत प्रवृत्तीचे गल्लाभरू लोक अंधश्रद्धांचा बाजार मांडून कोट्यवधीची माया गोळा करीत संत हा शब्दही बदनाम करीत आहेत, हे समजून घेत 'सावज' ठरण्याआधीच आ 'सावध' होण्याची वेळ आली आहे.

# 'फ्लेक्स- फ्युएल' धोरण यशस्वी ठरणार?

**कच्च्या तेलाच्या आयातीवरचे प्रचंड अवलंबित्व, जागतिक बाजारातील अस्थिर दर, भू- राजकीय संघर्ष आणि पर्यावरणीय बांधिलकी या सर्वांचा विचार करता केंद्र सरकारने इथेनॉल मिश्रित पेट्रोल आणि 'फ्लेक्स – फ्युएल' वाहनांना प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले आहे. मात्र, कोणतेही नवे तंत्रज्ञान स्वीकारताना त्यातील संधी जितक्या महत्त्वाच्या असतात, तितकीच त्यातील व्यावहारिक आव्हानेही समजून घेणे आवश्यक असते.**

आकलन
महेश जोशी

फ्लेक्स- फ्युएल' वाहन म्हणजे असे वाहन, जे पेट्रोल आणि इथेनॉलच्या विविध प्रमाणातील मिश्रणावर चालू शकते. उदाहरणार्थ, ई- २०, ई- ३०, ई- ५० किंवा ई- ८५ अशा वेगवेगळ्या मिश्रणाचा वापर वाहन कोणत्याही अतिरिक्त बदलांशिवाय करू शकते. वाहनातील सेन्सर इंधनातील इथेनॉलचे प्रमाण ओळखून इंजिनचे कार्य त्यानुसार आपोआप समायोजित करतात. त्यामुळे चालकाला वेगवेगळ्या प्रकारच्या इंधनाची चिंता करावी लागत नाही. ब्राझीलमध्ये ही संकल्पना अत्यंत यशस्वी ठरली असून तेथील नवीन वाह 'फ्लेक्स- फ्युएल' तंत्रज्ञानावर आधारित आहेत.

भारतातही याच दिशेने वाटचाल सुरू आहे; मात्र ब्राझीलचा अनुभव भारतात जसाच्या तसा लागू होईल, असे गृहीत धरणे योग्य ठरणार नाही. कारण दोन्ही देशांची कृषी व्यवस्था, इंधन वितरण प्रणाली, वाह बाजारपेठ आणि ग्राहकांची आर्थिक क्षमता यात मोठा फरक आहे. केंद्र सरकारच्या धोरणाम ागील प्रमुख उद्देश स्पष्ट आहेत. भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी ८५ टक्क्यांहून अधिक तेल आयात करतो. त्यामुळे दरवर्षी लाखो कोटी रुपयांचे परकीय चलन खर्च होते. इथेनॉलचे मिश्रण वाढल्यास पेट्रोलचा वापर कमी होईल आणि आयातीतही घट होईल. त्याचबरोबर देशांतर्गत इथेनॉल उद्योगाला चालना मिळेल, शेतकऱ्यांना अतिरिक्त बाजारपेठ उपलब्ध होईल आणि कार्बन उत्सर्जनात काही प्रमाणात घट घडवून आणता येईल. या धोरणाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे साखर उद्योगाला मिळणारे बळ. अनेकदा अतिरिक्त साखर उत्पादनामुळे साखर कारखान्यांसमोर आर्थिक संकट निर्माण होते. अशा वेळी त्याच ऊसापासून इथेनॉल तयार करून पर्यायी उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध होतो. त्यामुळे शेतकरी, कारखाने आणि जैवइंधन उद्योग यांना एकाच वेळी फायदा होऊ शकतो; मात्र धोरण जाहीर करणे आणि ते यशस्वीपणे अंमल आणणे या वेगळ्या गोष्टी आहेत.

आजही देशातील बहुतांश पेट्रोल पंपांवर ई-२० पेट्रोल उपलब्ध असले, तरी ई-८५ किंवा त्यापेक्षा जास्त इथेनॉल मिश्रित इंधन अत्यंत मर्यादित ठिकाणी उपलब्ध आहे. 'फ्लेक्स- फ्युएल' वाहनांची संख्या नगण्य आहे. अशा परिस्थितीत ग्राहकांनी 'फ्लेक्स- फ्युएल' वाहन खरेदी केले, तरी त्यांना आवश्यक इंधन सहज उपलब्ध होईल, याची खात्री नाही. इंधन उपलब्धतेतील ही असमानता ग्राहकांच्या विश्वासाला धक्का देऊ शकते. एखाद्या शहरात ई- ८५ उपलब्ध असेल; पण दुसऱ्या शहरात नसेल, तर वाहनचालक पुन्हा पारंपरिक पेट्रोलवरच अवलंबून राहतील. त्यामुळे फ्लेक्स- फ्युएल वाहनांचा खरा फायदा मिळण्यासाठी देशव्यापी इंधन वितरण व्यवस्था उभारणे ही सरकार आणि तेल कंपन्यांसमोरील सर्वात मोठी जबाबदारी आहे. वाहन उद्योगासमोरील आव्हानेही कमी नाहीत. अनेकांना वाटते की, 'फ्लेक्स फ्युएल' वाहन म्हणजे विद्यमान पेट्रोल वाहनात किरकोळ बदल करून तयार होणारे वाहन; प्रत्यक्षात तसे नाही. इथेनॉलचे रासायनिक गुणधर्म पेट्रोलपेक्षा वेगळे असल्यामुळे इंजिनमधील अनेक भाग बदलावे लागतात. इंधन पंप, इंधन वाहिन्या, इंजेक्टर, सील, गॅस्केट, सेन्सर आणि इलेक्ट्रॉनिक कंट्रोल युनिट यामध्ये विशेष बदल आवश्यक असतात. इथेनॉलमध्ये पाणी शोषून घेण्याची क्षमता जास्त असल्याने गंजरोधक साहित्याचा वापर करावा लागतो. इंजिनचे कॅलिब्रेशनही नव्याने करावे लागते. या सर्व प्रक्रियेसाठी वाहन उत्पादकांना मोठ्या प्रमाणावर संशोधन आणि विकासावर खर्च करावा लागतो. नवीन इंजिन विकसित करणे, चाचण्या घेणे, उत्सर्जन मानके पूर्ण करणे, प्रमाणपत्रे आणि उत्पादन साखळी बदलणे, या प्रत्येक टप्प्यावर मोठी गुंतवणूक करावी लागते.

भारतासारख्या किमतीबाबत अत्यंत संवेदनशील बाजारपेठेत हा अतिरिक्त खर्च ग्राहकांवर टाकणे सोपे नाही. 'फ्लेक्स-फ्युएल' वाहनांची किंमत सुरुवातीला पारंपरिक वाहनांपेक्षा काहीशी जास्त असू शकते. ग्राहक त्यासाठी तयार असतील का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. इंधनाच्या वापरातून दीर्घकालीन बचत झाली, तर ग्राहक हा अतिरिक्त खर्च स्वीकारतील; मात्र त्यासाठी इंधनाचे दर, उपलब्धता आणि वाहनाची कार्यक्षमतामध्ये संतुलन आवश्यक आहे. इथेनॉलबाबत समाजात अनेक गैरसमज पसरलेले आहेत. काही जणांच्या मते, इथेनॉल इंजिन खराब करते. काहींना वाटते की, इथेनॉलमुळे वाहनाचे आयुष्य कमी होते तर काहींच्या मते इथेनॉल वापरल्यास वाहनाची शक्ती मोठ्या प्रमाणात घटते. या सर्व गोष्टी अर्धसत्य आहेत. प्रत्यक्षात, इथेनॉलमिश्रित इंधनासाठी रचना करण्यात आलेल्या वाहनांमध्ये अशा प्रकारच्या समस्या उद्भवत नाहीत. उलट, इथेनॉलचा ऑक्टेन क्रमांक जास्त असल्यामुळे इंजिनची दहन प्रक्रिया कार्यक्षम होऊ शकते; मात्र जुनी वाहने किंवा त्यासाठी डिझाईन न केलेली इंजिने उच्च प्रमाणातील इथेनॉलवर चालविल्यास काही तांत्रिक अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे वाहन उत्पादकांच्या सूचनांनुसारच इंधनाचा वापर करणे आवश्यक आहे.

आणखी एक गैरसमज म्हणजे इथेनॉल हे पूर्णपणे प्रदूषणमुक्त इंधन आहे. इथेनॉल कार्बन उत्सर्जन कमी करण्यास मदत करीत असले, तरी त्याचे उत्पादनही पर्यावरणावर परिणाम करणारे असू शकते. विशेषतः ऊसापासून इथेनॉल तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. त्यामुळे इथेनॉलचे पर्यावरणीय फायदे आणि त्याच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या नैसर्गिक संसाधनांचा समतोल साधणे तितकेच आवश्यक आहे. भारतातील इथेनॉल उत्पादन सध्या मोठ्या प्रमाणावर ऊस आणि मळीवर आधारित आहे; मात्र भविष्यात मका, खराब धान्य, कृषी अवशेष आणि दुसऱ्या पिढीतील जैवइंधन तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे आवश्यक ठरेल. अन्यथा, इथेनॉल उत्पादनासाठी शेतीवर अतिरिक्त दबाव येण्याची शक्यता आहे.

धोरणात्मक सातत्य हा या संपूर्ण प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. वाहन उद्योगाला नवीन तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी किमान पाच ते सात वर्षांचा कालावधी लागतो. सरकारने वारंवार इंधन मानके बदलली किंवा लक्ष्यांमध्ये अचानक बदल केले तर उद्योगाच्या गुंतवणुकीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे स्पष्ट रोडमॅप, निश्चित कालमर्यादा आणि दीर्घकालीन धोरणात्मक स्थैर्य आवश्यक आहे.

ई- २०, ई- ८५, फ्लेक्स- फ्युएल, बायोफ्युएल यासारख्या संज्ञा अजूनही सामान्य वाहनचालकांसाठी नवीन आहेत. कोणते इंधन कोणत्या वाहनासाठी योग्य आहे, त्याचे फायदे-तोटे काय आहेत, इंधनाचा खर्च आणि मायलेज यांचा संबंध काय आहे, याबाबत व्यापक माहिती देण्याची गरज आहे. अन्यथा, अफवा आणि गैरसमज यामुळे चांगले तंत्रज्ञानही लोकांपर्यंत पोहोचू शकणार नाही. यासंदर्भात ब्राझीलचा अनुभव भारतासाठी प्रेरणादायी असला, तरी भारताने स्वतःच्या परिस्थितीनुसार मार्ग निवडला पाहिजे. देशातील कृषी व्यवस्था, हवामान, जलसंपत्ती, वाहन उद्योग आणि ग्राहकांची क्रयशक्ती लक्षात घेऊनच पुढील वाटचाल ठरवावी लागेल. केवळ एका देशाचे मॉडेल तंतोतंत स्वीकारून अपेक्षित परिणाम साध्य होणार नाहीत. आज भारत इलेक्ट्रिक वाहने, इथेनॉल, संपीडित जैववायू, हरित हायड्रोजन आणि इतर पर्यायी इंधनांवर एकाच वेळी काम करत आहे. हीच योग्य दिशा आहे. कारण भविष्यातील ऊर्जा व्यवस्था एका इंधनावर आधारित नसून विविध पर्यायांच्या संतुलित वापरावर आधारित असेल. फ्लेक्स-फ्युएल वाहने त्यातील एक घटक ठरू शकतात. सरकारने धोरण आखले आहे, उद्योग संशोधन करत आहे आणि इथेनॉल उत्पादनही वाढत आहे. आता खरी गरज आहे ती या तिन्ही घटकांमध्ये प्रभावी समन्वय साधण्याची. या धोरणाचे यश देशभरात इंधन उपलब्ध करणे, वाहन उत्पादकांना स्थिर धोरणात्मक वातावरण देणे, ग्राहकांना विश्वासात घेणे आणि पर्यावरणीय शाश्वततेची काळजी घेणे या चार बाबींवर अवलंबून आहे.







# गुलाबी ग्रहांवर मिठाचे ढग...



अनंतवेध
सुजाता बाबर

जीजे ५०४ बी' ही वस्तू, पृथ्वीपासून केवळ ५७ प्रकाशवर्षे दूर आहे. ती सूर्यसदृश ताऱ्याभोवती फिरते; पण तिचे स्वरूप नेमके ग्रह म्हणून मोजायचे की 'तपकिरी बटू' या वर्गात ठेवायचे, याबाबत अजूनही चर्चा सुरूच आहे. नव्या विश्लेषणानुसार, तिचे वस्तुमान गुरूच्या सुमारे २५ पट असू शकते.

एवढे मोठे वस्तुमान, सामान्यतः वायुराक्षस ग्रहांच्या पलीकडे जाते. म्हणूनच, संशोधक तिला 'ग्रह- वस्तुम ानाचा सहचर' असे संबोधतात. याच कारणामुळे, 'जीजे ५०४ बी' खगोलशास्त्रज्ञांसाठी विशेष महत्त्वाची ठरते. ती ग्रह आणि 'तपकिरी बटू' यांच्या सीमारेषेवर असलेली वस्तू आहे. या वस्तूला 'गुलाबी ग्रह' हे नाव तिच्या रंगछटेमुळे मिळाले. हा गुलाबीपणा प्रत्यक्ष पृष्ठभागाचा नसून वातावरणातील धूसर थर, उष्णतेचे उत्सर्जन आणि विशिष्ट तरंगलांबीवरील प्रकाश यांच्या एकत्रित परिणामातून दिसतो.

महत्त्वाचे म्हणजे 'जीजे ५०४ बी' ही, थेट प्रतिमांकनाने दिसणाऱ्या बाह्य-ग्रहांमध्ये तुलनेने थंड वस्तू मानली जाते. तिचे तापमान जवळपास २९० अंश सेल्सिअस असल्याचे दिसते. पृथ्वीच्या दृष्टीने हे अत्यंत उष्ण असले, तरी महाकाय बाह्य-ग्रहांच्या तुलनेत ते कमीच आहे. म्हणूनच, तिच्या वातावरणात उष्ण वायुराक्षसांपेक्षा, वेगळ्या प्रकारचे रसायनशास्त्र आणि ढगरचना असतील, अशी अपेक्षा होती. 'जीजे ५०४ बी' चा शोध २०१३ मध्ये, थेट प्रतिमांकन पद्धतीने लागला. बहुतेक बाह्यग्रहांचा शोध त्यांच्या ताऱ्याच्या प्रकाशातील सूक्ष्म बदलांवरून लागतो. पण, 'जीजे ५०४ बी' पालक ताऱ्यापासून इतकी दूर आहे की, तिला स्वतंत्रपणे टिपणे शक्य झाले. ती आपल्या ताऱ्यापासून सुमारे ४३.५ खगोलीय एकक अंतरावर आहे. म्हणजे गुरू- सूर्य अंतराच्या जवळजवळ नऊपट! एवढ्या दूरवर इतका मोठा ग्रह किंवा ग्रहसदृश सहचर कसा तयार झाला, हा प्रश्नही अजून अनुत्तरितच आहे. या वस्तूचे वातावरण समजून घेण्यात 'जेम्स वेब' अवकाश दुर्बिणीने, निर्णायक भूमिका बजावली. तिच्या 'निअर- इन्फ्रारेड स्पेक्ट्रोग्राफ'च्या साहाय्याने २.९ ते ५.३ मायक्रॉन या पट्ट्यात, या वस्तूचा तपशीलवार वर्णपट मिळवण्यात आला. वर्णपट म्हणजे, त्या ग्रहाच्या वातावरणाचे रासायनिक हस्ताक्षर.

ग्रहाच्या वातावरणातून येणाऱ्या प्रकाशात कोणत्या तरंग लांबी शोषल्या गेल्या आहेत, यावरून वातावरणात कोणते रेणू आहेत, याचा अंदाज लावता येतो. या अभ्यासात पाण्याची वाफ, मिथेन, कार्बन डायऑक्साईड, अमोनिया, कार्बन मोनॉक्साईड आणि हायड्रोजन सल्फाईड यांसारख्या संयुगांच्या खुणाही दिसल्या. या रेणूंमुळे ग्रहाचे तापमान, रासायनिक संतुलन, उभ्या दिशेने पदार्थांची हालचाल आणि त्याची निर्मिती कशी झाली, याविषयीची माहिती मिळते. मात्र, इथेच एक महत्त्वाची अडचण समोर आली. मिळालेला वर्णपट कोणत्याही साध्याच्या वातावरणीय नमुन्याशी जुळत नव्हता.

तापमान, दाब आणि रासायनिक रचना यांचे अनेक नमुने तपासूनही, योग्य उत्तर मिळत नव्हते. शेवटी संशोधकांनी वातावरणातील ढगांकडे लक्ष केंद्रित केले. पृथ्वीवरील ढग मुख्यतः पाण्याचे असतात; पण बाह्य- ग्रहांवर तापमानानुसार ढगांचे स्वरूप पूर्णपणे वेगळे असू शकते. काही ग्रहांवर खडकांच्या वाफांचे ढग, काही ठिकाणी लोह किंवा सिलिकेटचे ढग; तर तुलनेने थंड वातावरणात विविध क्षारांचे किंवा धातू- संयुगांचे ढग तयार होऊ शकतात.

'जीजे ५०४ बी' च्या बाबतीतही असेच घडले. संशोधकांनी विविध ढगरचना असलेले वातावरणीय नमुने तयार केले. त्यात मिठाच्या ढगांचा समावेश असलेले नमुने, निरीक्षणांशी सर्वाधिक जुळले. याचा अर्थ, या ग्रहाच्या वातावरणात क्षाराधारित सूक्ष्म कणांचे ढग असू शकतात. हे मिठाचे ढग म्हणजेच स्वयंपाकघरातील मीठ हवेत उडत आहे, असा अर्थ नाही. येथे मीठ म्हणजे विशिष्ट धातू आणि अधातूंच्या संयुगांपासून तयार झालेले संघनित कण! तापमान आणि दाब योग्य पातळीवर आले की, ही संयुगे वायुरूप अवस्थेतून सूक्ष्म कणांमध्ये बदलतात आणि ढग तयार करतात.

या मिठाच्या ढगांचे महत्त्व काय? सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, ते ग्रहाच्या वर्णपटात हस्तक्षेप करतात. ते खोल थरांतील रेणूंच्या खुणा दाबून टाकू शकतात, प्रकाशाचे प्रकीर्णन बदलू शकतात. तसेच, ग्रहाच्या बाह्यरूपावरही परिणाम करू शकतात. त्यामुळे जर ढगांचा विचारच केला नाही, तर ग्रहाच्या तापमानापासून ते रासायनिक रचनेपर्यंत अनेक निष्कर्ष चुकीचे निघू शकतात. म्हणूनच, 'जीजे ५०४ बी'वरील मिठाचे ढग हा शोध, बाह्य-ग्रहांच्या हवामानशास्त्रासाठी महत्त्वाचा टप्पा ठरतो. तो स्पष्टपणे सांगतो की, एखादा ग्रह समजून घ्यायचा असेल, तर त्याच्या आकाशातील ढगांचे रसायनशास्त्र समजून घ्यावे लागेल.

या ग्रहाच्या वातावरणात मिथेन आणि अमोनियाचे संकेत दिसणेही तितकेच महत्त्वाचे आहे. गुरू आणि शनीसारख्या थंड वायुराक्षसांमध्ये, मिथेन हा महत्त्वाचा घटक असतो. अमोनियाचे प्रमाण वातावरणातील तापमान, दाब आणि उभ्या दिशेच्या मिश्रण प्रक्रियांविषयी माहिती देते.

नव्या अभ्यासात 'जीजे ५०४ बी' च्या वातावरणात, रासायनिक असमतोल असल्याचेही संकेत आहेत. याचा अर्थ, वातावरणातील वायू वर- खाली मोठ्या प्रमाणात मिसळत असावेत. पृथ्वीवर संवहन, ढग आणि पर्जन्य या प्रक्रिया हवामान ठरवतात; तसाच काहीसा गुंतागुंतीचा खेळ या दूरच्या जगावरही चालू असावा.

'जीजे ५०४ बी'चे वयही महत्त्वाचे आहे. ही वस्तू सुमारे २.५ ते ४ अब्ज वर्षे वयाची असू शकते. मोठे वायुराक्षस आणि 'तपकिरी बटू' जन्माला येताना प्रचंड उष्ण असतात; पण कालांतराने ते थंड होत जातात. त्यामुळे त्यांचे तापमान आणि तेज यावरूनच, त्यांचे वय आणि वस्तुमान यांचा अंदाज बांधता येतो.

'जीजे ५०४ बी' तुलनेने जुनी आणि थंड असल्यामुळे, तिचे वातावरण महाकाय उष्ण बाह्य ग्रहांपेक्षा वेगळ्या प्रकारच्या हवामानशास्त्राचे दर्शन घडवते. येथे धातूंच्या वाफांऐवजी मिथेन, अमोनिया आणि क्षारकणांचे ढग महत्त्वाचे ठरतात. यावरूनच एक महत्त्वाची गोष्ट समोर येते ती म्हणजे, बाह्य- ग्रह हवामानशास्त्र एकसुरी नाही. तापमानाच्या वेगवेगळ्या पट्ट्यांमध्ये, पूर्णपणे वेगवेगळ्या प्रकारचे ढग, रासायनिक प्रक्रिया आणि हवामान नमुने असू शकतात.

या शोधाचा ग्रहनिर्मितीच्या सिद्धांतांवरही परिणाम होऊ शकतो. नव्या विश्लेषणानुसार, 'जीजे ५०४ बी' मध्ये, हायड्रोजन- हेलियमपेक्षा जड मूलद्रव्यांचे प्रमाण तुलनेने जास्त असण्याची शक्यता आहे. जर हे पुढील निरीक्षणांनी सिद्ध झाले, तर या वस्तूची निर्मिती ताऱ्यासारख्या थेट वायू-कोसळ्यातून झाली नसून, ग्रहांसारख्या पदार्थसंचय प्रक्रियेतून झाली असावी, असा युक्तिवाद बळकट होऊ शकतो. मात्र, हा प्रश्न अजून खुलाच आहे. कारण, इतके प्रचंड वस्तुम ान असलेली एखादी वस्तू एखाद्या ग्रहाप्रमाणे तयार झाली असेल, असे मानणे सोपे नाही. म्हणूनच, 'जीजे ५०४ बी' ही हवामानशास्त्र आणि ग्रहनिर्मिती, या दोन्ही क्षेत्रांच्या सीमेवर उभी असलेली महत्त्वाची वस्तू ठरते.

बाह्य- ग्रहांचा अभ्यास आता ग्रह सापडला, या टप्प्यावर थांबत नाही. पुढचा प्रश्न असा की, त्या ग्रहाच्या आकाशात काय आहे? कोणते ढग आहेत? वातावरणातील रासायनिक संतुलन कसे आहे? उष्णता खोल थरांतून वर कशी येते? आणि या सर्वांतून त्या ग्रहाची निर्मिती कशी झाली, हे कसे उलगडते? 'जेम्स वेब' अवकाश दुर्बीण या प्रश्नांची उत्तरे देण्यास सुरुवात करत आहे.

'जीजे ५०४ बी'वरील मिठाचे ढग म्हणूनच केवळ कुतूहल वाढवणारी बातमी नाहीत; ते बाह्य- ग्रहांच्या वातावरणातील ढगांना केंद्रस्थानी आणतात. ते थंड, फिकट आणि दूरच्या जगांचे हवामान समजून घेण्याचा नवा मार्ग दाखवतात. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, विश्वातील ग्रहांची विविधता आपल्या कल्पनेपेक्षा कितीतरी अधिक आहे. उद्या 'जेम्स वेब' किंवा पुढील पिढीच्या दुर्बिणी आणखी थंड, आणखी सूक्ष्म आणि कदाचित, अधिक पृथ्वीसदृश बाह्य- ग्रहांचे वातावरण उघड करतील; तेव्हा 'जीजे ५०४ 'वरील मिठाचे ढग हा शोध बाह्य-ग्रहांच्या हवामानशास्त्राच्या नव्या पर्वाची सुरुवात म्हणून लक्षात राहू शकतो.



# एक वर्तुळ अपूर्ण राहिले...

**फुटबॉलच्या इतिहासात पेले... मॅराडोना... एम्बाप्पे... आणि मेस्सी ही चार नावे केवळ महान खेळाडू म्हणूनच अमर नाहीत, तर त्यांनी आपल्या देशाला विश्वविजेतेपद मिळवून देत स्वतःच्या महानतेवर सुवर्णमुकुटही चढवला. वैयक्तिक कौशल्यापासून संघाच्या सर्वोच्च यशापर्यंतचा प्रवास त्यांनी पूर्ण केला. या पंक्तीत स्थान मिळवण्याचा जीवापाड प्रयत्न पोर्तुगालच्या क्रिस्टियानो रोनाल्डोने तब्बल दोन दशके केला. विक्रमामागून विक्रम रचले. सर्वाधिक गोल करणारा खेळाडू ठरला. लब फुटबॉलमध्ये जवळपास प्रत्येक मोठी ट्रॉफी जिंकली. पण... विश्वचषकाची ट्रॉफी मात्र त्याच्या हातातून कायम निसटत राहिली.**

क्रिडांगण **संदीप चव्हाण**




डॅलसमध्ये स्पेनविरुद्ध अंतिम शिट्टी वाजली आणि त्या आवाजासोबत रोनाल्डोच्या विश्वचषक स्वप्नाचाही शेवट झाला. मैदानावर गुडघे टेकले नाहीत, पण डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रूंनी एक सत्य स्वीकारले... एक वर्तुळ अपूर्ण राहिले. २००६ मध्ये जर्मनीत सुरू झालेला त्याचा विश्वचषक प्रवास २०२६ मध्ये संपला. सहा विश्वचषक, असंख्य संस्मरणीय क्षण, हजारो मिनिटांचा संघर्ष... पण शेवटी हातात विश्वचषक नव्हता. हा पराभव केवळ पोर्तुगालचा नव्हता; तो फुटबॉलच्या सर्वांत मोठ्या स्वप्नाचा होता.

विडंबना अशी की, जगातील सर्वाधिक आंतरराष्ट्रीय गोल करणाऱ्या खेळाडूला शेवटच्या सामन्यात रोखून धरले, स्पेनचा गोलरक्षक उनाय सिमोन याने! पहिल्या सत्रात रोनाल्डोचे दोन अप्रतिम प्रयत्न त्याने हाणून पाडले. विशेषतः हवेत झेपावत दोन्ही हातांनी वाचवलेला फटका हा त्या सामन्याचा टर्निंग पॉईंट ठरला. आणि मग, भरपाई वेळेत मिकेल मेरिनोने केलेल्या एका गोलने स्पेनला उपांत्यपूर्व फेरीचे तिकीट मिळवून दिले. स्पेनने विजय मिळवला, पण त्याचबरोबर इतिहासही घडवला. सलग सहा विश्वचषक सामने एकही गोल न स्वीकारण्याचा नवा विश्वविक्रम त्यांच्या नावावर जमा झाला. इटली आणि स्वित्झर्लंडचा जुना विक्रम मागे पडला. उनाय सिमोननेही सलग ६०९ मिनिटे गोल न स्वीकारत इटलीच्या महान गोलरक्षक वाल्टर झेंगाचा विक्रम मोडला. मात्र, त्या सर्व विक्रमांवर डॅलसच्या मैदानावर एकच दृश्य भारी पडले, अश्रूंनी भरलेले रोनाल्डोचे डोळे! काही पराभव स्कोअरबोर्डवर दिसतात, काही इतिहासात नोंदले जातात आणि काही थेट चाहत्यांच्या हृदयावर कोरले जातात! हा तिसऱ्या प्रकारचा पराभव होता. रोनाल्डोला कदाचित फुटबॉलच्या सर्वोच्च ट्रॉफीला स्पर्श करता आला नाही. पण एका गोष्टीची नोंद इतिहास कायम ठेवेल, विश्वचषक जिंकणारे अनेक झाले; पण विश्वचषक न जिंकताही जगभरातील कोट्यवधी चाहत्यांच्या हृदयावर अधिराज्य गाजवणारे फारच थोडे झाले. क्रिस्टियानो रोनाल्डो त्यांपैकीच एक. म्हणूनच, डॅलसमध्ये संपलेला तो सामना हा फक्त 'राऊंड ऑफ ६' नव्हता, तो फुटबॉलच्या एका महान पर्वाचा भावूक उपसंहार होता.

# अस्तित्वाचा संघर्ष आणि परंपरेचे भवितव्य

## माहेश्वरी समाजासमोरील लोकसंख्याशास्त्रीय आव्हान


वेध **अरुणकुमार मुंदडा**

**एखाद्या समृद्ध आणि वैभवशाली समाजाचा इतिहास जेव्हा आकड्यांच्या आरशात पाहिला जातो, तेव्हा कधी कधी ते चित्र अस्वस्थ करणारे असते. 'अखिल भारतीय माहेश्वरी महासभा, सांख्यिकीय अहवाल.' ने समोर आणलेली माहेश्वरी समाजाची आकडेवारी केवळ एका समाजाची कथा नाही, तर ती एका संपूर्ण संस्कृतीच्या अस्तित्वावर उभ्या ठाकलेल्या प्रश्नचिन्हाची जाणीव करून देणारी आहे. गेल्या वीस वर्षांत माहेश्वरी समाजाची लोकसंख्या १५ लाखांवरून ९ लाखांवर येणे, ही केवळ सांख्यिकीय घट नाही; तर ती एका संपन्न वारशाच्या संकोचाची नांदी आहे. राजस्थानच्या वाळवंटातून फुललेला आणि देशभर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारा हा समाज आज एका अशा वळणावर उभा आहे, जिथे आधुनिकता आणि परंपरा यांच्यातील संघर्षाने अस्तित्वाचाच पेच निर्माण केला आहे.**

या भीषण घटनेचे मूळ कारण 'विवाहास होणारा विलंब' हे सांगण्यात आले आहे. आजचा माहेश्वरी युवक-युवती करिअर, उच्च शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबनाच्या शर्यतीत इतके गुंतले आहेत की, आयुष्यातील महत्त्वाचे टप्पे मागे पडत चालले आहेत. ३० ते ३२ वर्षे हे विवाहाचे वय होणे, ही आता एक सर्वसाधारण बाब झाली आहे. परंतु, या विलंबाचे परिणाम जैवशास्त्रीय आणि सामाजिक अशा दोन्ही स्तरांवर दिसून येत आहेत. वयोमानानुसार येणारी वंध्यत्वाची समस्या २५ टक्क्यांनी वाढली आहे, हे वास्तव डोळ्यांत अंजन घालणारे आहे.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'एक अपत्य' ही मानसिकता. उच्च शिक्षण आणि आधुनिक जीवनशैलीच्या ओझ्याखाली दबलेल्या तरुण जोडप्यांना दुसरे अपत्य नकोसे वाटते. 'मुलांना वाढवणे आणि त्यांना योग्य शिक्षण देणे आजच्या काळात कठीण आहे,' हा युक्तिवाद वरकरणी योग्य वाटत असला, तरी तो समाजाच्या भविष्यासाठी घातक ठरत आहे. जेव्हा एखादा समाज स्वतःच्या पुनरुत्पादनाच्या दरापेक्षा खाली येतो, तेव्हा तो समाज हळूहळू विस्मृतीच्या गर्तेत जाण्याची भीती असते. माहेश्वरी समाजाची ही स्थिती केवळ त्या समाजापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर ती इतर अनेक प्रगत समाजांसाठी एक धोक्याची घंटा आहे.

स्त्री-पुरुष गुणोत्तरातील तफावत हा आणखी एक चिंतेचा विषय आहे. १००० पुरुषांमागे ९२५ स्त्रिया, हे प्रमाण माहेश्वरीसारख्या सुशिक्षित समाजात असणे, हे विचारांना प्रवृत्त करणारे आहे. जो समाज लक्ष्मीची पूजा करतो, त्या समाजात लेकींचे प्रमाण कमी असणे, हे एक प्रकारचे सांस्कृतिक वैगुण्यच म्हणावे लागेल. अखिल भारतीय माहेश्वरी महासभेने तिसऱ्या अपत्यासाठी ५१ हजार रुपयांची मुदत ठेव देण्याची योजना सुरू केली आहे, ही बाब स्वागतार्ह असली तरी, प्रश्न केवळ पैशांचा नाही, तर मानसिकतेचा आहे.










भिलवाडा हा माहेश्वरी समाजाचा गड मानला जातो. येथे ८०९४ कुटुंबांतील ३६ हजार सदस्य राहतात. देशात सर्वाधिक माहेश्वरी राजस्थानात आहेत. परंतु, या गडालाही आता लोकसंख्या घटीची ओहोटी लागली आहे. समाजाच्या नेत्यांनी आणि विचारवंतांनी यावर उपाय म्हणून विवाहाचे वय कमी करण्याचे आवाहन केले आहे. अखिल भारतीय माहेश्वरी महासभेचे अध्यक्ष संदीप काबरा यांनी मांडलेले विचार महत्त्वाचे आहेत. त्यांनी म्हटले आहे की, माहेश्वरी समाजाच्या योजनांची नक्कल आता सरकारेही करत आहेत. याचा अर्थ असा की, समाजाने स्वतःहून आपल्या समस्या ओळखल्या आहेत आणि त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला आहे. मग ती आरोग्यसेवा असो, शिक्षण असो वा विधवा आणि निराश्रितांना आधार देणे असो; माहेश्वरी समाज नेहमीच अग्रेसर राहिला आहे. ७ हजार लोकांना ८८ कोटी रुपयांचे उद्योग कर्ज देणे, महिलांना ८ कोटींचे कर्ज देणे, हे समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणाचे दर्शन घडवते. परंतु, ही आर्थिक समृद्धी जर लोकसंख्येच्या अभावामुळे टिकणार नसेल, तर त्या संपत्तीला काय अर्थ उरतो? दक्षिणी राजस्थान प्रादेशिक माहेश्वरी महासभेचे अध्यक्ष राधेश्याम चेचाणी यांनी मार्मिकपणे सांगितले आहे की, 'विवाहास विलंब आणि वाढते शिक्षण हे लोकसंख्या घटीचे कारण आहे.' शिक्षण हे माणसाला प्रगल्भ करते, पण जर ते शिक्षण आपल्याला आपल्या नैसर्गिक जबाबदाऱ्यांपासून दूर नेत असेल, तर त्या शिक्षणाच्या व्याख्येचा फेरविचार करण्याची वेळ आली आहे. करिअर आणि कुटुंब यांच्यात संतुलन साधणे, ही आजच्या काळाची गरज आहे. केवळ एकच अपत्य असणे आणि त्यानंतर कुटुंब नियोजन करणे, यामुळे पुढच्या पिढीला भाऊ- बहिणीच्या प्रेमापासून वंचित राहावे लागत आहे, हे सामाजिक वास्तव नाकारता येणार नाही.

या लेखाचा उद्देश केवळ आकडेवारी मांडणे हा नाही, तर समाजाला विचार करायला लावणे हा आहे. माहेश्वरी समाज हा उद्योजकता, दानशूरपणा आणि सांस्कृतिक निष्ठेसाठी ओळखला जातो. आज या समाजासमोर आपल्या लोकसंख्येचे रक्षण करण्याचे मोठे आव्हान आहे. जर आपण आज आपल्या जीवनशैलीत बदल केला नाही, जर आपण विवाहाच्या योग्य वयाला महत्त्व दिले नाही आणि जर आपण मुलींच्या जन्माचा खऱ्या अर्थाने उत्सव साजरा केला नाही, तर भविष्यातील पिढ्या आपल्याला माफ करणार नाहीत.

लोकसंख्या घटणे ही केवळ एक संख्यात्मक समस्या नसून ती एक गुणात्मक समस्याही आहे. कमी होणारी लोकसंख्या म्हणजे कमी होणारी प्रतिभा, कमी होणारे मनुष्यबळ आणि अखेरीस क्षीण होणारी संस्कृती. माहेश्वरी समाजाने या संकटावर मात करण्यासाठी जे प्रयत्न सुरू केले आहेत, ते केवळ त्या समाजापुरते मर्यादित न राहता, संपूर्ण देशासाठी एक आदर्श ठरावेत. समाजाच्या प्रत्येक घटकाने, विशेषतः तरुणांनी, या विषयावर गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. आपले करिअर महत्त्वाचे आहेच, पण ज्या समाजाच्या जोरावर आपण उभे आहोत, त्या समाजाचे अस्तित्व टिकवणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. शेवटी, 'अखिल भारतीय माहेश्वरी महासभा, सांख्यिकीय अहवाल'च्या या वृत्ताने जे सत्य समोर आणले आहे, ते कटू असले तरी वास्तव आहे. १५ लाखांवरून ९ लाखांवर आलेला हा समाज पुन्हा एकदा भरभराटीला यावा, अशीच प्रत्येकाची इच्छा असेल. पण त्यासाठी केवळ योजना पुरेशा नाहीत, तर समाजाच्या मानसिकतेत आमूलाग्र बदल घडवणे गरजेचे आहे. जुन्या परंपरांमधील जे चांगले आहे ते जपणे आणि आधुनिकतेतील जे पोषक आहे ते स्वीकारणे, हाच या समस्येवरील खरा उपाय आहे. माहेश्वरी समाज आपल्या प्रखर इच्छाशक्तीच्या जोरावर या संकटातून नक्कीच बाहेर पडेल आणि पुन्हा एकदा आपल्या कर्तृत्वाने जगाला दिपवून टाकेल, हीच अपेक्षा.



# अमन की आशा नव्हे, वतन की निराशा!

**एकीकडे ११७ भारतीय आणि पाकिस्तानी नागरिकांनी संयुक्त पत्रातून दोन्ही देशाच्या पंतप्रधानांना संवादातून द्विपक्षीय संबंध पुनर्प्रस्थापित करण्याचे आवाहन केले, तर दुसरीकडे पाकने सिंधू जलवाटप करार परिषदेतून भारतालाच धमकावले. त्यामुळे अमन की आशासारख्या या नव्या प्रयोगातूनही पुन्हा वतन की निराशाच होईल, हे निश्चित!**

विदेश निती **विजय कुलकर्णी**

संपुआ-२ च्या काळात २०१० साली अमन की आशा ही दोन्ही देशांमध्ये शांतता, सलोख्याचे नागरी संबंध प्रस्थापित करणारी मोहीम प्रचंड चर्चेत आली. भारतातील टाईम्स ऑफ इंडिया आणि पाकिस्तानातील जंग या माध्यमसमूहांनी मिळून ही मोहीम सुरू केली. दोन्ही देशांमधील तणाव कमी करणे, संवाद वाढवणे, व्यापार- उदीम वृद्धिंगत करणे आणि सीमावत भागातील नागरिकांना एकमेकांच्या जवळ आणणे, हा यामागचा मुख्य हेतू. मग या मोहिमेंतर्गत संगीत मैफिली, आर्थिक परिषद, कलाप्रदर्शन आणि क्रिकेटविषयक देवाणघेवाण यांसारखे अनेक सांस्कृतिक कार्यक्रमदेखील साहजिकच काँग्रेस सरकारच्या आशीर्वादाने राबविले गेले. नंतर याच माध्यमसमूहांनी दिलेल्या बातम्यांनुसार, अमन की आशामुळे भारतातील पाकविरोधी फोबिया ७५ टक्क्यांवरून ४२ टक्क्यांवर, तर पाकिस्तानींच्या मनातील भारतविरोधी फोबिया हा ५४ टक्क्यांवरून २९ टक्क्यांवर आला. आता नेमके जनमताचे हे मोजमाप कसे आणि कुणी केले? त्यासाठी किती सॅम्पलिंग केले? हे प्रश्न म्हणा अनुत्तरितच.

क्षणभरासाठी का होईना, आपण या टक्केवारीवर विश्वास ठेवला, तरी मग २०१० ते २०१४ दरम्यान खरेच दोन्ही देशांमध्ये अमन प्रस्थापित झाले का? तर उत्तर आहे, नाही! २००८च्या मुंबईवरील भीषण दहशतवादी हल्ल्यानंतरही पाकच्या कुरापती थांबल्या नाहीत. त्यानंतर दोनच वर्षांनी दि. १ जानेवारी २०१० रोजी अमन की आशा मोहिमेचा शुभारंभ झाला. पण, लगेचच पुढच्या महिन्यात दि. १३ फेब्रुवारी रोजी पुण्यातील जर्मन बेकरी येथे आयईडी स्फोट झाला, ज्यामध्ये १८ जण मृत्युमुखी पडले, तर ६० नागरिक गंभीररीत्या जखमी झाले. त्याच्याच पुढच्या वर्षी दि. १३ जुलै २०११ मध्ये मुंबईत तीन ठिकाणी स्फोट झाले, ज्यामध्ये २६ जणांचा मृत्यू झाला आणि १३० लोक गंभीर जखमी झाले. त्याच वष सप्टेंबरमध्ये दिल्ली उच्च न्यायालयाबाहेर स्फोट होऊन १५ नागरिकांना जीव गमवावा लागला. पुढे दि. २१ फेब्रुवारी २०१३ साली हैदराबाद येथील स्फोटात १८ नागरिक मृत्यमुखी पडले, तर १३१ लोक जखमी झाले. म्हणजेच काय, तर काँग्रेस सरकारच्या आशीर्वादाने एकीकडे अमन की आशा अंतर्गत शांततेची कबुतरे उडविण्याचे कार्यक्रम सुरू होते, तर दुसरीकडे पाकपोषित दहशतवाद्यांच्या हल्ल्यांत शेकडो भारतीयांनी आपले प्राण गमावले. त्यामुळे सांगायचा मुद्दा एवढाच की, अमन की आशा हे अभियान तेव्हाही सर्वस्वी वतन की निराशा करणारेच ठरले. मग अशा फसलेल्या प्रयोगाचा, पाकिस्तानसारख्या बेभरवशाच्या शेजाऱ्याचा तब्बल ७९ वर्षांचा पूर्वानुभव गाठीशी असताना, पुन्हा तशाच प्रकारच्या प्रयत्नांना कोण आणि कशासाठी प्रोत्साहन देऊ इच्छिते, हाच प्रश्न त्या ११७ भारतीय-पाकी नागरिकांच्या संयुक्त पत्रामुळे उपस्थित होतो.

खरेतर भारतातून ज्या ६१ कथित मान्यवरांनी या पत्रावर स्वाक्षऱ्या केल्या, त्यांच्या यादीवर नजर टाकली असता, आपसूकच ही तीच काश्मिरी फुटीरतावाद्यांची, पुरोगाम्यांची असंतुष्ट टोळी असल्याचे सहज लक्षात येते. फारुख, ओमर अब्दुल्ला, मेहबुबा मुफ्ती, मनोज झा, ए. एस. दुल्लत, जवाहर सरकार, मोहम्मद युसूफ, मणी शंकर अय्यर इत्यादी. पण, या नेहमीच्याच भारत- पाक संबंधांचे गोडवे गाणाऱ्यांच्या यादीतील शेवटचे भारतीय नाव हे खरेतर महत्त्वाचे. हे नाव आहे, ओ. पी. शहा यांचे. कोलकातास्थित शहा पेशाने चार्टर्ड अकाऊंटंटफ आणि दिल्लीच्या सेंटर फॉर पीस ॲण्ड प्रोगेसचे संस्थापक. सीए असले, तरी शहा सामाजिक कार्यकर्ते आणि भारत- पाक संबंधांचे जुनेच समर्थक. १९९१ साली इंडिया इंटरनॅशनल सेंटरमध्ये शहा यांनी पहिल्या भारत- पाक संवादाचे आयोजनही केले होते. त्यानंतर १९९१ आणि १९९२ मध्ये त्यांनी पाकिस्तानला गेलेल्या दोन शिष्टमंडळांचे नेतृत्वही केले. त्यांच्या नेतृत्वाखालील द्विपक्षीय मुद्द्यांवर अनेक चर्चासत्रे आयोजित केली गेली, ज्यामध्ये जम्मू-काश्मीरच्या मुद्द्यावर विशेष भर होता. आताच्याही या संयुक्त पत्रांतून दोन्ही देशांनी द्विपक्षीय संवाद पुन्हा सुरू करणे, जम्मू- काश्मीरबाबत चर्चा पुन्हा सुरू करणे, लष्करी तणाव कमी करण्याच्या दिशेने पावले उचलणे आणि सामान्य संबंध पुनर्स्थापित करण्याचा सल्ला दोन्ही देशांच्या पंतप्रधानांना ओ. पी. शहा देतात. पण, त्याच वेळी या पत्रात पहलगाम किंवा दहशतवादावरून पाकिस्तानचा साधा निषेधही नोंदवण्यात आलेला नाही. तसेच जम्मू-काश्मीरबाबत पाकिस्तानशी भारताने चर्चा करावी, अशी अपेक्षा व्यक्त करून पाकिस्तानच्या काश्मीरवरील दाव्यालाच आपण अप्रत्यक्ष समर्थन देत आहोत, याचेही भान शहा यांना राहिलेले दिसत नाही. असो.

एकीकडे शहा यांचे हे संयुक्त पत्र जाहीर झाले, तर त्याचदरम्यान सिंधू जलवाटप करार परिषद आयोजित करून पाकिस्तानच्या चार- पाच मंत्र्यांनी भारताला फुटकळ धमक्याही दिल्या. पाकिस्तानच्या हवामानबदल मंत्र्यांनी तर आमचे पाणी रोखणार्यांचे हात कापू, अशी कापाकापीची भाषा केली. त्यावरही भारताने रक्त आणि पाणी एकाच वेळी वाहू शकत नाही याचा पुनरुच्चार करीत, पाकिस्तान जोपर्यंत दहशतवादी कारवाया थांबवणार नाही, तोपर्यंत त्यांच्याशी कोणताही संवाद शक्य नसल्याचीच रोखठोक भूमिका घेतली.

रा. स्व. संघानेही पाकिस्तानशी चर्चा व्हायला हवी. चर्चेची दारे बंद व्हायला नकोतफ अशी भूमिका मागे मांडली होती. निश्चितच संवादातून, चर्चेतून मार्ग निघतो. प्रश्नही सोडवता येतात, याबद्दल दुमत असायचे कारण नाहीच. परंतु, त्यासाठी दोन्ही देश एक समान पातळीवर असणे, त्यांचा परस्परांवर विश्वास असणे आणि प्रत्यक्ष चर्चेचे रूपांतर कृतीत होणेही तितकेच आवश्यक. पण, दुर्दैवाने पाकिस्तान हा कधीही विश्वासार्ह देश नव्हता, नाही आणि भविष्यातही नसेल, हेही तितकेच खरे!

अटलजी पंतप्रधान असताना, फेब्रुवारी १९९९ मध्ये दिल्लीहून बसने लाहोरला रवाना झाले आणि त्यानंतर मे महिन्यातच कारगील युद्धाला तोंड फुटले. पण, तरीही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी २०१४ साली सत्तेत आल्यानंतर पाकिस्तानला मैत्रीचा हात पुढे केला. तत्कालीन पंतप्रधान नवाझ शरीफ यांना शपथविधीसाठी आमंत्रित करण्यापासून ते पाकिस्तानात जाऊन त्यांच्या कौटुंबिक सोहळ्यात सहभागी होईपर्यंत मोदींनीही संवादाची पहल केलीच. पण, पाकिस्तानकडून पठाणकोट, उरी, पहलगाम अशा दहशतवादी हल्ल्यांतून भारताच्या विश्वासावरही वेळोवेळी आघातच केला. त्यामुळे आता भारताने सिंधू जलवाटप करार रद्द करून तोंडचे पाणी पळविल्यानंतर पाकड्यांचा जळफळाट होणे साहजिकच. सर्जिकल स्ट्राईक, एअर स्ट्राईक आणि ऑपरेशन सिंदूरमधून भारताने पाकला जशास तसे उत्तर देऊन वठणीवर आणले आहेच. त्यामुळे यापुढे गोळीचे उत्तर गोळीतूनच मिळणार!

## ओला ऋतू...

ओली झाडे ओली रस्ते
ओली पायवाट ती...
ओला सुगंध ओली फुले
ओली वनराई ती....
ओली पाने ओली माती
ओली पांदण वाट ती...
ओली सल ओला ऋतू
ओल्या मातीनं स्वागत करती.

**सुधाकर मानवतकर**

## आषाढ

त्या ढगांचा भार थोडा आधार
सांगून वाकला ती कथा मग प्रे
विरह शब्द स्थापून गाजला.
ती मेघ वाणी उरात संगीत
सांगून लाजली पावसाची ती
कथा ना आषाढस्य वाटली.
ती प्रवाही प्रे गीते घेऊन पानांवर
थाटले दूर मातीच्या कणांवर
विरह घेऊन आटले.
उष्ण व्याप्त कडा तिच्याशी
तृप्त धारा वेढल्या मग कविता
पाऊस होऊन आषाढस्य
गाजल्या. ती लिहिली मेघवाणी
सरींच्या आशेत सुख हिरवळीवर
प्रे लिहून कविता विरही सन्मुख.
त्या सरींचा आधार होऊन
आभाळ आझेत वाहिले
मातीत कृष्ण कांतीतले मज
विठू दर्शन भावले.
विठू दर्शन भावले.

**श्रद्धा राऊत बुरले**